१०३ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ

• पुणे, सोमवार २ मार्च, २०२६ • वर्ष-५, अंक-१६३, पाने-८, किंमत: ₹ ७ NAVAKAL

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 163 Marathi - Daily - Pune, 2 March, 2026 Page- 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे  24x7 : www.navakal.in  Email- contact@navakal.in




# शिया मुस्लीम भडकले! लाखोंचे रस्त्यावर उग्र आंदोलन

## जम्मू, काश्मीरही पेटले! कराचीत अमेरिकी दुतावासावर हल्ला

■ कराची

**इस्त्रायलने** आज दुसऱ्या दिवशी इराणवर हल्ले सुरूच ठेवलेले असताना इराणच्या नासिरिया, झंजन, रश्त, तेहरान, इस्फहान अशा अनेक शहरात लाखो शिया मुस्लीम रस्त्यावर उतरले आणि त्यांनी अमेरिका व इस्त्रायलच्या विरोधात जोरदार घोषणा दिल्या. तेहरान शहरात असे आंदोलन सुरू असताना हल्ल्याच्या इशाऱ्याचे सायरन वाजत होते. पण त्याला न जुमानता लोक आपल्या नेत्याला श्रद्धांजली वाहत होते. मशाद शहरात इमाम रझा दर्ग्याजवळ हजारो मुस्लीम एकत्र आले होते. इराणमध्ये हा निषेध सुरू असतानाच

**इराणचे शिया धर्मातील अत्युच्च नेते आयातुल्ला खामेनी हे अमेरिका, इस्त्रायलच्या हल्ल्यात ठार झाल्याचे वृत्त पसरताच जगभरातील शिया मुस्लीम चवताळून रस्त्यावर उतरले. इराणच्या तेहरान शहरातील जमकरन मशिदीवर लाल झेंडा फडकावत त्यांनी बदला घेण्याचा इशारा दिला. अमेरिका आणि इस्त्रायल मुर्दाबादच्या घोषणा देत लाखो शिया मुस्लीम आज रस्त्यावर उतरले. पाकिस्तानच्या कराची आणि लाहोर शहरात संतप्त आंदोलकांनी अमेरिकी दूतावास आणि संयुक्त राष्ट्राच्या कार्यालयावर चाल करीत प्रचंड तोडफोड केली. त्यांना थांबवण्यासाठी अमेरिकन सुरक्षा रक्षकांनी केलेल्या गोळीबारात कराचीत १२ आंदोलक ठार झाले. शिया मुस्लिमांच्या या संतापाचे हिंसक परिणाम आगामी काळात दिसतील हे निश्चित आहे.**

अफगाणिस्तानात बगदाद शहरातील अमेरिकी दुतावासावर हल्ला करण्यात आला. तिकडे पाकिस्तानात कराची शहरात अमेरिकी दुतावासावर हल्ला करीत आंदोलकांनी दुतावासाची प्रचंड तोडफोड केली. यावेळी दुतावासाच्या संरक्षणासाठी तैनात अमेरिकी सैनिकांनी गोळीबार केला. यात बारा नागरिक ठार झाल्याने अधिकच संताप उफाळला. शेवटी अश्रूधूर सोडून परिस्थिती आटोक्यात आणली. लाहोर शहरातही आंदोलकांनी अमेरिकी दूतावास कार्यालयावर हल्ला चढविला. आज अमेरिकेच्या न्यूयॉर्क शहरातील टाईम्स स्क्वेवर मधेही शिया मुस्लिमांनी आंदोलन केले. भारतातही शिया मुस्लिमांनी लाखोंच्या संख्येने एकत्र येत आंदोलन करीत अमेरिका व इस्त्रायलचा निषेध केला. आम्ही पोरके झालो अशी भावना त्यांनी व्यक्त केली. काश्मीरच्या लाल चौकात सकाळीच शिया मुस्लिमांनी एकत्र येत मोर्चा काढला. श्रीनगर शहरात संयुक्त राष्ट्राच्या कार्यालयाबाहेर मुस्लीम बांधव मोठ्या संख्येने एकत्र येऊन निषेध करीत होते. लेह-लडाख, कर्नाटकच्या बंगळुरु शहरात, मुंबईत, दिल्लीच्या जंतरमंतर परिसरात, लखनौच्या इमामवाडा परिसरातही शिया मुस्लिमांनी जोरदार आंदोलन केले. यात महिलांची संख्या लक्षणीय होती.

लखनौ येथेही खामेनी यांच्या मृत्यूचे तीव्र पडसाद उमटले. लखनौतील शिया समुदायाने मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरून निषेध आंदोलन केले. जुन्या लखनौमधील सादतगंजसह अनेक भागांत काळे कपडे परिधान करून नागरिकांनी अमेरिका आणि इस्त्रायलविरोधात घोषणाबाजी केली. शिया धर्मगुरू, मौलाना कल्बे जवाद पान ७ वर


(काश्मीर - लाल चौक)

### अत्यंत सुरक्षित परिसरात सर्वोच्च नेते खामेनी यांची हत्या कशी झाली?

**तेहरान-** अमेरिका आणि इस्त्रायल यांच्यात घनिष्ठ गुप्तचर सहकार्य आहे. अमेरिकेच्या मदतीने इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी आणि ४० वरिष्ठ अधिकाऱ्यांना लक्ष्य करण्यात आले. सर्वांचा खातमा करण्यात आला. अमेरिकन गुप्तचर संस्था सीआयएने अनेक महिन्यांपासून खामेनी यांच्यावर नजर ठेवली होती. त्यांनी इराणवर हल्ला करण्याची तयारी केली होती, वेळ ठरली होती. पण त्याचवेळी तेहरानमध्ये एका महत्त्वाच्या बैठकीत खामेनी आणि ४० महत्त्वाचे अधिकारी एकत्र येणार असल्याची माहिती मिळली. हे कळताच अमेरिका आणि इस्त्रायलने हल्ल्याची वेळ बदलून या संधीचा फायदा घेतला. खामेनीसोबत आयआरजीसी प्रमुख, संरक्षण मंत्री आणि लष्करी परिषदेचे प्रमुख हेही लक्ष्य झाले. या बैठकीच्या ठिकाणावर सुमारे ३० बॉम्ब टाकून हा परिसरच उद्ध्वस्त केला.



सीआयएने या कारवाईत अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. अनेक महिन्यांपासून खामेनी यांच्या हालचालींवर लक्ष ठेवत त्यांच्या दिनचर्येचा सखोल अभ्यास पान ७ वर

## नागपूरजवळ स्फोटक कारखान्यात भीषण स्फोट! १७ कामगारांचा मृत्यू

■ नागपूर

**नागपूर** जिल्ह्यातील काटोल तालुक्यातील राऊळगाव येथे असलेल्या स्फोटकांच्या निर्मिती कारखान्यात आज पहाटे भीषण स्फोट झाला. या दुर्घटनेत १७ कामगारांचा मृत्यू झाला असून, १८ कामगार जखमी झाले आहेत. स्फोटाची तीव्रता इतकी होती की, इमारतीचा ढिगारा आणि स्फोट झालेल्या परिसरातील साहित्य सुमारे ५०० ते ७०० मीटरपर्यंत दूर फेकले गेले. विशेष म्हणजे,



गेल्या वर्षी १६ फेब्रुवारी रोजीही याच कंपनीत स्फोटाची घटना घडली होती.

कळमेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या एसबीएल एनर्जी लिमिटेड या औद्योगिक स्फोटके तयार करणाऱ्या कंपनीत खाणकाम आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी लागणारी स्फोटके, डिटोनेटर आणि पान ७ वर

## इराण-इस्त्रायल युद्धाचा फटका सोन्या-चांदीचे भाव कडाडले

■ मुंबई

**अमेरिका** आणि इस्त्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर मध्य पूर्वेत तणाव वाढला असून, संघर्ष चिघळण्याची शक्यता व्यक्त होत आहे. प्रत्युत्तरादाखल इराणने काही ठिकाणी अमेरिकेच्या तळांवर हल्ले केल्याचे वृत्त आहे. या पार्श्वभूमीवर गुंतवणूकदार सुरक्षित पर्याय म्हणून सोन्या-चांदीकडे वळल्याने दरात अचानक उसळी आली आहे.

वाढत्या मागणीमुळे सोन्याच्या दरात सुमारे ११ हजार रुपयांची वाढ होऊन तो १,७५,५०० रुपयांवर पोहोचला आहे. तर चांदीचे दर सुमारे २५ हजार रुपयांनी वाढून ३,०३,००० रुपयांवर गेले आहेत. अवघ्या काही तासांत झालेल्या या वाढीमुळे सराफा बाजारात खळबळ उडाली असून, युद्धस्थिती कायम राहिल्यास दर आणखी वाढू शकतात, असा अंदाज व्यक्त होत आहे.

## मिठी नदीच्या स्वच्छतेसाठी आता पालिकेची ३० कोटींची नवी निविदा

■ मुंबई

**मिठी** नदीतील गाळउपसा घोटाळ्यानंतर रखडलेल्या कामांना गती देण्यासाठी मुंबई महापालिकेने नव्याने निविदा काढली. पुढील एका वर्षात मिठी नदीतील गाळ काढण्यासाठी ३० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. तसेच एल आणि एम पूर्व या दोन वॉर्डमधील नालेसफाईची कामेही या प्रक्रियेत समाविष्ट करण्यात आली आहेत.

मिठी नदीतील गाळ काढण्यासाठी पालिकेने २०२४ मध्ये ३ कंत्राटदारांशी करार केला. त्यानंतर मार्च २०२५मध्ये त्यांच्याशी दोन वर्षांचा नवा करार करण्यात आला. मात्र गाळउपसा घोटाळ्यात कंत्राटदारांची नावे आल्यानंतर त्यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करून त्यांना काळ्या यादीत टाकण्यात आले. उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी पुन्हा नव्याने निविदा जारी करण्यात आली. ही निविदा एक वर्षासाठी असून, त्यानंतर २ वर्षे कालावधीसाठी स्वतंत्र निविदा काढण्याचा पालिकेचा विचार आहे. पालिकेने २०२५ साठी मुंबईतील नाल्यांमधून ९ लाख ७९ हजार ७२४ मेट्रिक टन गाळ काढण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. यामध्ये पावसाळ्यापूर्वी ८० टक्के, पावसाळ्यात १० टक्के व पावसाळ्यानंतर १० टक्के गाळ व तरंगता कचरा काढण्याची योजना होती. गेल्या वर्षी नदीतून २ लाख १४.३१५ मेट्रिक टन गाळ काढण्याचे उद्दिष्ट होते. मात्र, त्यातील ६० टक्केच कामे झाली.

## तेजस एक्स्प्रेस सात तास उशिराने रवाना! शिमग्यात रेल्वेचा खोळंबा

■ मुंबई

**शिमगा** आणि होळी सणासाठी कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची मोठी गर्दी असतानाच तेजस एक्स्प्रेस तब्बल सात तास उशिराने सुटल्याने रेल्वे प्रवाशांचे हाल झाले. सकाळी ५.५० वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) येथून सुटणारी तेजस एक्स्प्रेस दुपारी १२.५८ वाजता रवाना झाली. त्यामुळे सीएसएमटीसह दादर, ठाणे आणि पनवेल स्थानकांवर प्रवाशांची प्रचंड गर्दी झाली होती.



कोकण रेल्वे मार्गावर सुरू असलेल्या मान्सूनपूर्व देखभाल कामांमुळे अनेक गाड्यांच्या वेळापत्रकावर परिणाम झाला. मडगावहून मुंबईकडे येणारी तेजस एक्स्प्रेसच उशिराने पोहोचल्याने तिची साफसफाई व तांत्रिक तपासणी करण्यास अतिरिक्त वेळ लागला. परिणामी हीच गाडी पुन्हा कोकणाकडे रवाना होण्यास तब्बल सात तासांचा विलंब झाला. सध्या शिमगोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

## ५० हजार 'उमरा' यात्रेकरू सौदीत अडकल्याची भीती

■ मुंबई

महाराष्ट्रातील सुमारे ५० हजार ते १ लाख मुस्लीम बांधव रमजानच्या पवित्र महिन्यात 'उमरा' या धार्मिक विधीसाठी सौदी अरेबियात गेले आहेत. युद्धजन्य परिस्थितीत ते अडकले असल्याची अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी व्यक्त केली आहे. आयोगाने तातडीने हालचाली सुरू केल्या असून, सर्व यात्रेकरूंना सुरक्षित परत आणण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे.

हज यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांची सरकारकडे अधिकृत नोंद असते. मात्र 'उमरा'साठी अशी कोणतीही केंद्रीकृत व्यवस्था नाही. बहुतांश यात्रेकरू खासगी टूर अँड ट्रॅव्हल्स ऑपरेटर्समार्फत प्रवास करतात. राज्यातील सुमारे ५०० हून अधिक ऑपरेटर्सनी यंदा यात्रेकरूंना पाठवले आहे.

## मेळघाटासाठी बच्चू कडू मैदानात २५० किमी पदयात्रेला सुरुवात

■ अमरावती

**मेळघाटातील** शेतकरी, शेतमजूर आणि आदिवासी बांधवांच्या प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी आजपासून मेळघाट संघर्ष पदयात्रेला सुरुवात केली. सुमारे २५० किलोमीटरची ही पदयात्रा मेळघाटातील दुर्गम आणि आदिवासी भागातून मार्गक्रमण करत ९ मार्च रोजी चिखलदरा येथे होणाऱ्या महाअंतिम सभेने यात्रेचा समारोप होणार आहे.

बच्चू कडू यांनी सांगितले की, या यात्रेद्वारे गावागावात जाऊन नागरिकांशी थेट संवाद साधणे, स्थानिक समस्या जाणून घेणे आणि त्या शासनापर्यंत पोहोचवणे हा मुख्य उद्देश आहे. शासनाच्या विविध योजना कागदावर न राहता प्रत्यक्ष गरजूंपर्यंत पोहोचल्या पाहिजे यासाठी ही पदयात्रा काढली आहे. यात्रेदरम्यान शेतकरी कर्जमाफीचा मुद्दा प्रमुख राहणार आहे. शासनाने कर्जमाफीबाबत दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी तातडीने करावी, असे कडू म्हणाले.

### वाचकांना सूचना

होळी सणानिमित्त दै. 'नवाकाळ'चे कार्यालय सोमवार २ मार्च रोजी बंद राहणार असल्याने मंगळवार ३ मार्च रोजीचा दै. नवाकाळ प्रसिद्ध होणार नाही. याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

**संपादक, नवाकाळ**

## लॉटरी विक्रेत्यांवर अन्याय होणार नाही मुंबई महापौर रितू तावडे यांचे आश्वासन

■ मुंबई

**मुंबई** पालिकेच्या सुरू असलेल्या अतिक्रमण विरोधी कारवाईत परवानगीधारक राज्य शासनाच्या अधिकृत लॉटरी विक्रेत्यांवर कदापि अन्याय होणार नाही. कारण शासनाच्या विकासकामांसाठी त्यातून महसूल जमा होत आहे, असे आश्वासन मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी लॉटरी विक्रेत्यांच्या शिष्टमंडळाला दिल्याने लॉटरी विक्रेत्यांना दिलासा मिळाला.

महाराष्ट्र लॉटरी विक्रेता संघटनेचे अध्यक्ष विलास सातार्डेकर यांनी मुंबईच्या महापौर तावडे यांची भेट घेऊन लॉटरी विक्रेत्यांच्या प्रश्नांवर वाचा फोडली. त्यावेळी महापौरांनी लॉटरी विक्रेत्यांच्या विक्री केंद्रांना अभय दिले.

पालिकेच्या नव्या कारवाईत नाहक लॉटरी विक्रेत्यांचा बळी जात आहे, शासनाची अधिकृत लॉटरी विकणाऱ्या विक्रेत्यांचा रोजगार बंद होत असून, पालिकेने एक फूट बाय एक फूट दिलेल्या स्टॉलवर कारवाई करण्यात येऊ नये. विक्रेते मराठी असून ते परप्रांतिय नव्हेत, असेही लॉटरी विक्रेत्यांचे नेते विलास सातार्डेकर यांनी महापौरांना सांगितले. त्यावर महापौरांनी तत्काळ दिलासा दिला आणि कारवाईचा फटका ज्यांना बसला आहे त्या लॉटरी विक्रेत्यांकडे सहानुभूतीने बघण्यात येईल. त्यांना त्रास होणार नाही, याची दक्षता घेण्यात येईल', असे स्पष्ट केले.



**अमेरिका आणि इस्त्रायल यांनी इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर जागतिक बाजारपेठेत तीव्र पडसाद उमटू लागले आहेत. कच्च्या तेलाच्या आंतरराष्ट्रीय दरांवर मोठा दबाव निर्माण झाला असून, जगभरात इंधन दरवाढीची भीती व्यक्त होत आहे. पेट्रोल-डिझेल दर वाढण्याची चर्चा रंगली असली तरी मुंबई आणि आसपासच्या उपनगरांतील पेट्रोल पंपांवर दर सध्या स्थिर आहेत. आजही मुंबईत पेट्रोलचा भाव १०३.५० रुपये प्रति लीटर इतकाच कायम आहे.**

## जागतिक तणावाचा परिणाम पेट्रोल-डिझेल दरवाढीची चर्चा

■ नवी दिल्ली

**तेल** कंपन्यांनी किरकोळ दरात कोणताही बदल केलेला नसल्याने वाहनचालकांना तात्पुरता दिलासा मिळाला आहे. जागतिक बाजारातील चढ-उतार लक्षात घेता येत्या काळात दरवाढ होण्याची शक्यता कायम असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. जागतिक तणावाचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवरही होऊ शकतो. कच्च्या तेलाच्या आयात खर्चात वाढ झाल्यास महागाई वाढण्याची तसेच रुपयाचे अवमूल्यन होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सध्या तरी तेल कंपन्यांनी दर स्थिर ठेवल्याने सर्वसामान्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे. मात्र आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत हालचाल वाढल्यास दरवाढ टाळणे कठीण ठरू शकते.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

## राज्यसभेच्या सातही जागांवर उमेदवार द्या! शहांच्या सूचना

■ नवी दिल्ली

**भाजपाचे** ज्येष्ठ नेते तथा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी महाराष्ट्रातील राज्यसभेच्या सर्व सात जागांसाठी महायुतीने उमेदवार उतरवावेत, अशी सूचना दिल्याची माहिती आहे. त्यामुळे सत्ताधारी महायुतीने अतिरिक्त २० मतांची जुळवाजुळव सुरू केली असून, विरोधी महाविकास आघाडीच्या हाती एकही जागा लागू नये, अशी रणनीती आखली जात आहे.

राज्यसभेच्या सात जागांसाठी १६ तारखेला मतदान होणार आहे. त्याच दिवशी मतमोजणी होईल. विद्यमान संख्याबळानुसार चार जागा भाजपाला, तर अजित पवार गट आणि शिंदे गटाला प्रत्येकी एक जागा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र आता सातव्या जागेसाठीही उमेदवार देण्याच्या सूचनेनंतर राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे आहेत. भाजपाला सातवा उमेदवार विजयी करायचा असल्यास सुमारे २० अतिरिक्त मतांची गरज भासणार आहे. महाविकास आघाडीला सातवी जागा मिळण्याची शक्यता सध्या कमी मानली जात आहे.

नवाकाळ
Email- contact@navakal.in www.navakal.in /navakalofficial


# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

इमिटेशन पॅकिंग कामासाठी मुली पाहिजेत, पगार- १३,०००/- वयोमर्यादा ३० वर्षे, कामाची वेळ ९ ते ६.३०. भद्रेशभाऊ, ११, स्वस्तिक इंडस्ट्रीज, कामगार स्टेडियमसमोर सेनापती बापट मार्ग, दादर (वेस्ट) फोन - 9819353631 / 8356983848 {NC254252}

इमिटेशनच्या कामासाठी मुली पाहिजेत परेल, एलफिन्स्टन, भाईंदर, घाटकोपर. 9619060333/ 8928858045 {NC254300}

अंधेरी येथे सुरक्षारक्षक पाहिजेत, पगार- 27,500/- (12 तास) 8291917060 / 9819191361 {NC254354}

पाहिजे हॉस्पिटलसाठी लेडीज गोरेगाव मावशी / हाऊसकिपिंग जेन्ट्स सिक्युरिटी गार्ड-राममंदिर, अंधेरी, तुर्भे- 8097507698 {NC254351}

सिक्युरिटी गार्ड, हाउसकिपिंग, सुपरवायझर, ड्रायव्हर पाहिजे.१४,०००/- - २५,०००/-, राहण्याची सोय गणेश- 9834753672 {NC254308}

वसई/मालाडमध्ये हॅन्डप्रेसच्या कामासाठी मुले पाहिजेत प. 17,500/- 9833730360 {NC254307}

अनुभवी PVC welder चेंबूरस्थित फॅक्टरीला त्वरित पाहिजे Tarpaulin welding येणे आवश्यक संपर्कः 7977316601 {NC254356}

इमिटेशन कंपनीमध्ये कामासाठी मुली पाहिजेत. वय पस्तीसपर्यंत. मालाड पूर्व, स्टेशनजवळ- 9819999006 {NC254056}

## पाहिजेत

ठाणे, कोलशेत परिसरात किमान ५ वर्षे अनुभवी ड्रायव्हर आवश्यक आहे. लवकरात लवकर. संपर्कः- 9322259537 {NC254379}

ॲल्युमिनियम विंडो कॅनोपी, कायडींग, रुफिंग, फॅब्रिकेटरचे काम करणारे कॉन्ट्रॅक्टर कारागिर व हेल्पर अर्जंट पाहिजेत. उत्तम वेतन. संपर्क 9324804795 {NC254384}

सीएसटी मुंबई येथील पेस्ट कंट्रोल कंपनीला ऑफिस कामासाठी मुली फवारणी करणारी माणसे आणि ड्रायव्हर पाहिजेत. पगार 12,000/- + गाडीभाडे + कमिशन 8356824867 {NC254304}

आयुर्वेदीक शाम्पु आणि हेअरऑईल विक्रीकरीता १५०००/- फिक्स पगारावर मुली/स्त्रिया पाहिजेत. विक्रोळीः 8169558670/ 7718810732 {NC254200}

मावशी, वॉर्डबॉय, कुक, नर्स, पेशंटकेअर, (Male+ Female) पाहिजेत (राहणे+ खाणे+ पगार) वीकेअर होम (महिला आश्रम) ठाणे 9136404828 {NC254294}

10/24 तास होम पेशंटड्युटी साठी वॉर्डबॉय पाहिजे. चांगला perday. 8451091740 / 9867539635 {NC254310}

निराधार महिला आणि पुरुषांसाठी केअर टेकर नोकरी (पगार+जेवण+निवास मोफत) घरकूल केअर सेंटर : 9819426634 / 9969529162 {NC254380}

## पाहिजेत

ठाणे मुंबईमध्ये बेबीकेअरसाठी १०/२४ तास बाई मुलगी पाहिजे. 7977530720 / 8850329548 {NC254309}

बँक लिलाव मालमत्तेसाठी सेल्स एक्झिक्युटीव्ह पाहिजे. पगारः रु. १०,०००/-फिक्स+ इन्सेंटिव्ह + प्रवास भत्ता कार्यक्षेत्र : सेंट्रल लाईन, हार्बर लाईन, वेस्टर्न लाईन, संपर्क- 9067507490 {NC254355}

कल्याणमध्ये दवाखान्यात हेल्दी निर्व्यसनी अनुभवी तरुण मुले, वॉर्डबॉय, मसाजिस्ट 24 तासांसाठी. पगार 10,000- 15,000, जेवणाची सोय. 8097915773 {NC254363}

स्त्री, पुरुष वृद्धाश्रमात कामासाठी पाहिजेत. मोफत राहण्याची खाण्याची सुविधा 7040206848 {NC254222}

दादर प्रभादेवी येथे फक्त लॉजिंग हाऊसमध्ये हाऊसकिपिंग, रुम बॉय करिता कामगार पाहिजे. वय कमाल मर्यादा-४५ वर्ष, शिक्षणाची अट नाही. पुढील नंबर वर बायोडेटा पाठवावा- 9820846727 {NC254391}

कोकणात कुडाळयेथे फार्महाऊस मधील बंगले साफसफाईसाठी, इतर कामासाठी महिला व पुरुष कामगार पाहिजे. वय ५० च्या आत. राहण्याची मोफत सोय. 9867354944 / 9820382343 {NC254394}

पॉवरप्रेस ऑपरेटर आणि पॅकिंगसाठी मुले व मुली पाहिजेत. जय गणेश मेटलप्रिंट, गाळा नंबर-६, बबन मिश्रा कंपाऊंड, सोनावाला क्रॉस रोड नंबर-२, गोरेगांव (पूर्व)- 9820382105 / 8879772701 {NC254392}

प्रिंटिंग प्रेसमध्ये Cutting मशीन operator आणि punching मशीन operator पाहिजे (भायखळा)- 9820080776 / 9819551478 {NC254395}

कमी शिकलेल्या महिला मुली १५,०००/- पगारावर चहा, नाश्ता, जेवण फ्री दोन पाळ्यात काऊंटरवर स्वयंपाकिणी मदतनीस कॅशियर्स क्लार्क 8657438844 / 9869783714 {NC254348}

## Situation Vacant

REQUIRED PEON / OFFICE BOY AT PRABHADEVI MINIMUM 10TH STANDARD, MUST BE ABLE TO SPEAK ENGLISH AND MARATHI. 9167308260 / 022-35728341 {NC254386}

Wanted courier Boys at Khar. Apply with bio data Call : 9930011100 {NC254396}

## शेअर्स

45+ नागरिक / निवृत्तांसाठी विशेष संधी, स्मार्टफोन आवश्यक. १२ वी पासः 9870231322 {NC254347}

## गुंतवणूक विषयक

फक्त ६ महिन्यात कर्ज कमी करणारे जीवनविमा गुंतवणूक साक्षरता अभियान- 9373956687/ 9326367944 {NC254009}

## व्यवसायविषयक

सुवर्णसंधी! स्वतःचा व्यवसाय करून दिवसा, 3,000/- कमविण्याची. अनिरुद्धा ग्रुप दादर- 8652643434 / 9076403434 {NC25324}


-: वाचकांना सूचना :-
दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - मॅनेजर, 'नवाकाळ'

# असेही अयातोल्ला अली खामेनी! इराणचा लोखंडी मनाचा नेता



**अयातोल्ला अली खामेनी, इराणचा लोखंडी मनाचा सर्वोच्च नेता मृत्यूमुखी पडला. त्यांच्या निधनाने इस्लामी प्रजासत्ताकासाठी एक युग संपल्याचे मानले जात आहे. याआधी अमेरिका आणि इस्त्रायलकडून त्यांच्या मृत्यूच्या बातम्या आल्या होत्या. परंतु तेहरानने त्यांचे खंडन केले होते. मात्र, आता इराणच्या सरकारी माध्यमांनी त्यांच्या मृत्यूची अधिकृत पुष्टी दिली आहे. खामेनींच्या मृत्यूमुळे मध्य पूर्वेतील राजकीय आणि सामरिक परिस्थितीवर मोठा प्रभाव पडेल.**

१९३९ मध्ये शिया धर्मीयांचे पवित्र शहर माशहदमध्ये खामेनी यांचा जन्म झाला. ते शिया धर्मशास्त्रज्ञ होते. खामेनी यांनी इराणच्या शाहच्या विरोधात क्रांतिकारी आंदोलन केले. शाहच्या गुप्तहेरांनी त्यांना अनेक वेळा अटक केली. तरी खामेनी लढा देत राहिले. १९७९ च्या इस्लामी क्रांतीनंतर इराणमध्ये नवे प्रजासत्ताक स्थापन झाले. १९८०च्या दशकात झालेल्या इराण-इराक युद्धाने त्यांच्या विचारसरणीवर खोल परिणाम केला. युद्धादरम्यान त्यांनी पाहिले की, देशाला वाचवण्यासाठी फक्त धार्मिक तत्त्वज्ञान पुरेसे नाही. आधुनिक लष्करी साधने आणि स्वावलंबी धोरण आवश्यक आहे.

१९८९ मध्ये अयातोल्ला खामेनींच्या मृत्यूनंतर खामेनींना सर्वोच्च नेता म्हणून नियुक्त केले गेले. त्यावेळी त्यांचा धार्मिक दर्जा तुलनेने कमी होता, तरी त्यांनी आपल्या नेतृत्वात इस्लामी क्रांतिकारी गार्ड कॉर्प्सला आर्थिक, लष्करी आणि प्रादेशिक सामर्थ्याचे एक महत्त्वपूर्ण साधन बनवले. त्यांनी फक्त देशाची सुरक्षा सुनिश्चित केली नाही, तर प्रादेशिक पातळीवर इराणच्या प्रभावाचा विस्तारही केला. खामेनींच्या धोरणानुसार, देशाच्या संरक्षणासाठी आणि प्रतिस्पर्धी शक्तींवर दबाव ठेवण्यासाठी प्रादेशिक मित्र राष्ट्रांचे जाळे तयार केला गेला, ज्याला ते फॉरवर्ड डिफेन्स धोरण म्हणत.

त्यांनी देशात रेझिस्टन्स इकॉनॉमी सुरू केली, ज्याद्वारे पश्चिमी निर्बंध सहन करून देशाची आर्थिक स्वावलंबन वाढवण्याचा प्रयत्न केला गेला. २०१५ मध्ये त्यांनी अणुशक्ती करार केला. अमेरिका नंतर या करारातून बाहेर पडल्यावर त्यांनी युरेनियम समृद्धी आणि प्रादेशिक आव्हाने स्वीकारली, ज्यामुळे इराणच्या नीतिमत्तेत अधिक कट्टरपणा आला.

खामेनींच्या शेवटच्या वर्षांत इराणमध्ये अस्थिरता वाढली. २००९ मध्ये ग्रीन मूव्हमेंटपासून ते २०२२ मध्ये माहसा अमिनीच्या मृत्यूनंतर झालेल्या आंदोलनांपर्यंत, आंतरिक विरोध झाला. मात्र परकीय हस्तक्षेपाने हे घडवून आणले असे म्हटले जाते. त्यांनी हा असंतोष आणि आंदोलने कठोर उपाययोजना करून दाबली. ज्यामुळे मोठा ताण निर्माण झाला.

२०२४-२५ मध्ये रेझिस्टन्स अक्षचा पतन, सिरियातील असद शासनाचा पाडाव आणि हिजबुल्लाच्या घटनांचा इराणवर परिणाम झाला. जून २०२५ मध्ये इस्त्रायलने थेट इराणी भूभागावर हल्ला केला, पण खामेनींनी प्रतिकार केला. तरीही, आर्थिक संकट आणि घरगुती अस्थिरतेमुळे राज्य संकटात आले. २०२६ च्या सुरुवातीला अमेरिकेने युद्ध सुरू केले.

अयातोल्ला अली खामेनी हे त्यांच्या कट्टर विश्वासासाठी शहीद झाले असे मानले जात आहे. खामेनींचा वारसा बहुआयामी आहे - ते धार्मिक शास्त्रज्ञ, युद्धकाळातील राष्ट्राध्यक्ष, प्रादेशिक रणनीतिकार आणि सुरक्षा-केंद्रित धोरणकर्ते होते. त्यांच्या कार्यकाळात इराणने स्वतःला मध्य पूर्वेतील एक महत्त्वपूर्ण राजकीय शक्ती म्हणून ओळख निर्माण केली. त्यांच्या निधनानंतर हा देश नवीन आव्हानांना सामोरे जात आहे.

# पार्थ व जय पवार यांची पहाटे बारामतीत विकासकामांची पाहणी

■ बारामती



**आज** पहाटे पार्थ पवार व जय पवार यांनी बारामती शहरात सुरू असलेल्या विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी केली. या दौऱ्यात त्यांनी बारामती क्रीडा संकुलासह शहरातील महत्त्वाच्या विकास प्रकल्पांना भेट देत कामांची प्रगती तपासली.

यावेळी त्यांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करत कामे दर्जेदार व वेळेत पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. नागरिकांच्या सोयी-सुविधांना प्राधान्य देत कोणतीही ढिलाई न करता कामे बारकाईने आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करावीत, असे निर्देश त्यांनी दिले. पाहणीदरम्यान संबंधित विभागाचे अधिकारी व पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# ठाण्यातील ज्येष्ठ नागरिकांच्या डिजिटल पाससाठी मुदतवाढ



■ ठाणे

**ठाणे** परिवहन उपक्रमाच्या बसेसमधून ६० वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत बस प्रवास योजना राबविली जात आहे. परंतु आता याच प्रवाशांना डिजिटल पास वितरित केले जात आहेत. या नवीन योजनेला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे हे डिजिटल पास पास काढण्यासाठी ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती ठाणे परिवहनचे व्यवस्थापक भालचंद्र बेहरे यांनी दिली.

या नवीन योजनेअंतर्गत आतापर्यंत २,५०० हून अधिक डिजिटल पास वितरित करण्यात आले आहे. तर सुमारे ३० हजार अर्ज प्राप्त झाले आहेत. मोठ्या प्रमाणावर होत असलेली गर्दी आणि वाढलेली नोंदणी प्रक्रिया लक्षात घेता प्रशासनाने ही मुदत ३१ मार्चपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी डिजिटल बसपाससाठी २८ फेब्रुवारीपर्यंत मुदत दिली होती. मात्र योजनेला ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. विविध केंद्रांवर दररोज मोठ्या संख्येने अर्ज दाखल होत आहेत. डिजिटल बसपासमुळे ज्येष्ठ नागरिकांना बस प्रवास अधिक सोयीस्कर, सुरक्षित आणि पारदर्शक पद्धतीने करता येणार आहे. उर्वरित पासचे वितरण टप्प्याटप्प्याने करण्यात येणार आहे. त्यामुळे अद्याप पास न काढलेल्या ज्येष्ठ नागरिकांनी वाढीव मुदतीत नोंदणी करून या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

-: वाचकांना सूचना :-
दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. -मॅनेजर, 'नवाकाळ'

# फोर्टमध्ये मॉन्टे हाऊस इमारतीच्या गच्चीवर आग

**मुंबई** - मुंबईतील फोर्ट परिसरातील वालचंद हिराचंद मार्ग येथील मॉन्टे हाऊस इमारतीच्या गच्चीवर मध्यरात्री साडेबारा वाजताच्या सुमारास आग लागली होती. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाने घटनास्थळी पोहोचत चार फायर इंजिन, चार टँकरच्या सहाय्याने आगीवर नियंत्रण मिळवले.

# आजचे राशी भविष्य

सोमवार ता. २ मार्च २०२६

ज्योतिष पंडीत अर्चना तारू

| | |
|---|---|
| मेष | कामे पूर्ण होण्यासाठी पाठपुरावा करत राहणे गरजेचे असेल. चिंता आणि अस्वस्थता टाळा. नातेसंबंधात भावनांवर नियंत्रण ठेवणे महत्त्वाचे ठरेल. |
| वृषभ | संयम आणि कठोर मेहनतीने यश मिळवता येईल. जोडीदाराशी बेबनाव संभवतो. आर्थिक प्रतिकूलता जाणवेल. |
| मिथुन | आशादायक आणि आनंदी दिवस आहे. कुटुंबासाठी खर्च होईल, मात्र त्यातून समाधान लाभेल. पैसा हाती खेळता राहील. |
| कर्क | दिवस फारसा अनुकूल नाही. संभ्रमामुळे चुकीचे निर्णय घेतले जाण्याची शक्यता आहे. थंड पदार्थ टाळा. |
| सिंह | मानसिक अस्वस्थतेचे सावट दिवसावर राहील. उपासना, ध्यानधारणा समाधान देईल. पैसा जपून हाताळा. कामाचे दडपण वाढेल. |
| कन्या | संयमाने आणि धैर्याने वागण्याचा दिवस आहे. जोडीदाराबरोबर विसंवादाची शक्यता आहे. आर्थिक नुकसान संभवते. कामात चुका टाळा. |
| तूळ | यशदायक आणि आनंदी दिवस आहे. कामे वेळेत पूर्ण होतील. जोडीदाराला खूश ठेवा. |
| वृश्चिक | आरोग्य उत्तम राहील. आत्मविश्वासाने दिवसाला सामोरे जा. मित्र तसेच सहकाऱ्यांबरोबरचे नाते सुधारेल. वरिष्ठांकडून प्रशंसा लाभेल. |
| धनु | दिवस ठीकठाक आहे. शांतता आणि संयमाने वाटचाल सुकर होईल. खिलाडूपणाने परिस्थिती हाताळा. जोडीदाराबरोबर गैरसमज टाळा. |
| मकर | खर्चिक दिवस आहे. आज ठरवल्याप्रमाणे कामे होणे अवघड आहे. एकटेपणा जाणवेल. |
| कुंभ | दिवस अनुकूल आहे. पैशाचा ओघ वाढणार आहे. वरिष्ठ तुमच्या कामाने प्रभावित होतील. वैवाहिक नात्यात संस्मरणीय क्षण लाभतील. |
| मीन | आत्मविश्वास वाढवणारा दिवस आहे. कामाचे चीज होईल. लक्षणीय आर्थिक लाभ मिळेल. प्रवासाचे योग आहेत. |

# मुंबईत आता ७०० चौरस फूट मालमत्तांना मिळणार करमाफी

■ मुंबई

**मुंबईतील** ५०० चौरस फुटापर्यंतच्या घरांना मालमत्ता कर माफ केल्यानंतर आता ७०० चौरस फुटांपर्यंतच्या निवासी सदनिकांना मालमत्ता करातून पूर्णपणे माफी देण्याचा ठराव महापालिका सभागृहात मंजूर करण्यात आला. विशेष म्हणजे हा ठराव उबाठाचे माजी स्थायी समिती अध्यक्ष यशोधर फणसे यांनी मांडला आणि उबाठाच्या या प्रस्तावाला सत्ताधारी भाजपाने मंजुरी दिली आहे. वास्तविक अशा प्रकारचा प्रस्ताव हा सत्ताधारी पक्षाकडून मांडला जाणे आणि त्याला मंजुरी मिळणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात उबाठाने मांडलेल्या प्रस्तावाला महापौर रितू तावडे यांनी मंजुरी देत याचे श्रेय उबाठाच्या झोळीत अलगद टाकल्याची चर्चा सुरू झाली आहे. वाढत्या आर्थिक भारामुळे अनेक कुटुंबांना आपली घरे विकून मुंबईबाहेर स्थलांतर करावे लागत आहे.

**उबाठाचा प्रस्ताव भाजपाने मंजूर केला**

त्यामुळे मूळ मुंबईकरांनी मुंबईतच राहावे आणि त्यांना शहर सोडण्याची वेळ येऊ नये यासाठी सध्या असलेली ५०० चौरस फुटांपर्यंतची करमाफी मर्यादा वाढवून ७०० चौरस फुटांपर्यंत करमाफी देण्याची मागणी ठरावाच्या सूचनेद्वारे उबाठाचे नगरसेवक यशोधर फणसे यांनी केली होती. या ठरावाच्या अनुषंगाने या संदर्भात राज्य शासनाकडे योग्य ते निवेदन सादर करण्याची विनंती महापौरांना करण्यात यावी, अशी मागणीही ठरावात करण्यात आली होती. याबाबतचा ठरावाच्या सूचनेला महापालिका सभागृहात मंजुरी देण्यात आली. आता हा प्रस्ताव राज्य सरकारच्या मंजुरीसाठी पाठवण्यात आला आहे. प्रामुख्याने ७०० चौरस फुटांच्या घरांना मालमत्ता कर माफ करण्याचे वचन उबाठा आणि भाजपा या दोन्ही पक्षांनी आपापल्या निवडणूक वचननाम्यात दिले होते. दरम्यान, या करमाफीमुळे पालिकेला सुमारे ५०० कोटी रुपयांच्या उत्पन्नावर पाणी सोडावे लागणार आहे.

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजलक्ष्मी रवि विकली लॉटरी

सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 09 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 01/03/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- : GL-03 : 8489

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 2184 | 2326 | 3430 किशोर लॉटरी सेंटर, सांगली | 4074 विराग एन्टरप्रायझेस, नाशिक | 4220 श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई | 5397 | 5849 | 6215 | 7083 | 9528 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1040 | 1863 | 2156 | 3038 | 3529 | 3592 | 4233 | 4900 | 6015 | 9298 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 2705 | 2897 | 3579 | 5301 | 5959 | 6189 | 7729 | 8237 | 8689 | 9778 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0123 | 0405 | 2431 | 2747 | 3515 | 4063 | 7340 | 8734 | 9026 | 9947 |

सहावे बक्षिस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1631 | 2248 | 3177 | 4430 | 5266 | 5948 | 6776 | 7619 | 8148 | 9291 |
| | | 1814 | 2267 | 3222 | 4441 | 5270 | 6059 | 6778 | 7635 | 8223 | 9295 |
| 0001 | 0842 | 1831 | 2274 | 3293 | 4484 | 5291 | 6326 | 6854 | 7647 | 8262 | 9319 |
| 0016 | 0955 | 1832 | 2284 | 3331 | 4497 | 5328 | 6338 | 6942 | 7657 | 8268 | 9375 |
| 0027 | 1071 | 1837 | 2292 | 3368 | 4506 | 5340 | 6369 | 6975 | 7665 | 8286 | 9415 |
| 0081 | 1111 | 1861 | 2326 | 3484 | 4538 | 5456 | 6379 | 6979 | 7695 | 8304 | 9490 |
| 0102 | 1128 | 1878 | 2430 | 3512 | 4541 | 5492 | 6425 | 7013 | 7718 | 8378 | 9528 |
| 0199 | 1142 | 1916 | 2435 | 3552 | 4593 | 5506 | 6443 | 7077 | 7740 | 8466 | 9530 |
| 0202 | 1151 | 1919 | 2469 | 3623 | 4648 | 5540 | 6457 | 7130 | 7772 | 8570 | 9565 |
| 0222 | 1155 | 1922 | 2482 | 3738 | 4740 | 5569 | 6471 | 7143 | 7777 | 8628 | 9566 |
| 0302 | 1241 | 1927 | 2525 | 3772 | 4834 | 5570 | 6472 | 7172 | 7778 | 8650 | 9590 |
| 0394 | 1281 | 1942 | 2529 | 3913 | 4874 | 5577 | 6509 | 7191 | 7779 | 8782 | 9599 |
| 0420 | 1297 | 1991 | 2552 | 3933 | 4904 | 5581 | 6539 | 7233 | 7787 | 8827 | 9677 |
| 0480 | 1305 | 2021 | 2571 | 3945 | 4994 | 5586 | 6546 | 7246 | 7797 | 8836 | 9694 |
| 0490 | 1353 | 2037 | 2609 | 3946 | 5028 | 5588 | 6556 | 7268 | 7870 | 8881 | 9712 |
| 0502 | 1391 | 2044 | 2630 | 4041 | 5035 | 5660 | 6576 | 7271 | 7951 | 8903 | 9838 |
| 0530 | 1445 | 2104 | 2700 | 4042 | 5038 | 5712 | 6634 | 7292 | 7973 | 8972 | 9870 |
| 0548 | 1467 | 2125 | 2802 | 4046 | 5090 | 5759 | 6640 | 7343 | 8008 | 9036 | 9879 |
| 0587 | 1512 | 2180 | 2886 | 4054 | 5131 | 5794 | 6645 | 7371 | 8041 | 9059 | 9942 |
| 0671 | 1513 | 2181 | 2908 | 4143 | 5186 | 5823 | 6659 | 7463 | 8098 | 9063 | 9955 |
| 0690 | 1515 | 2215 | 3024 | 4232 | 5228 | 5882 | 6669 | 7490 | 8125 | 9121 | 9989 |
| 0701 | 1541 | 2220 | 3164 | 4345 | 5234 | 5909 | 6774 | 7536 | 8132 | 9146 | 9995 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. • अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पाहावे. • प्रस्तुतकर्ता : महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र मोहिनी विकली लॉटरी

सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 09 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 01/03/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : MO-06 : 2147

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0402 | 0631 | 1855 श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई | 2421 श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई | 3867 | 4622 | 5560 | 6026 | 8358 | 8726 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1276 | 1318 | 1884 | 2797 | 4816 | 5199 | 7210 | 8136 | 8823 | 9582 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1636 | 4605 | 5873 | 6340 | 7652 | 7943 | 8245 | 8857 | 9263 | 9959 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0830 | 1620 | 2578 | 3951 | 5753 | 7075 | 7739 | 8727 |
| | 0928 | 1624 | 2690 | 3994 | 5895 | 7130 | 7780 | 8728 |
| 0026 | 1045 | 1644 | 2790 | 4086 | 5995 | 7212 | 7787 | 8956 |
| 0039 | 1078 | 1810 | 3078 | 4198 | 6055 | 7269 | 7874 | 8969 |
| 0068 | 1095 | 1915 | 3143 | 4400 | 6082 | 7481 | 8189 | 8981 |
| 0136 | 1104 | 1994 | 3283 | 4740 | 6086 | 7485 | 8198 | 9000 |
| 0204 | 1134 | 2021 | 3313 | 4744 | 6175 | 7531 | 8208 | 9254 |
| 0341 | 1145 | 2045 | 3371 | 5003 | 6352 | 7575 | 8243 | 9287 |
| 0352 | 1164 | 2051 | 3380 | 5040 | 6481 | 7577 | 8259 | 9899 |
| 0447 | 1311 | 2052 | 3514 | 5154 | 6652 | 7607 | 8382 | 9904 |
| 0570 | 1374 | 2222 | 3560 | 5521 | 6672 | 7629 | 8424 | 9953 |
| 0606 | 1481 | 2252 | 3563 | 5575 | 6860 | 7657 | 8546 | 9959 |
| 0773 | 1580 | 2571 | 3768 | 5581 | 6959 | 7726 | 8600 | 9964 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. • अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पाहावे. प्रस्तुतकर्ता : महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — गणेशलक्ष्मी वैभव विकली लॉटरी

सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 09 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 01/03/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : MG-02 : 0714

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- : 6677 (ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे)

तिसरे बक्षिस रु. 2000/- : 2768

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0744 | 1310 | 4031 | 4138 | 4877 | 7827 | 7909 | 8056 | 9060 | 9402 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 2353 | 2583 | 2942 | 3856 | 4188 | 6280 | 8633 | 8984 | 9127 | 9702 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 2891 | 4155 | 5749 | 6198 | 7492 | 7749 | 8231 | 8297 | 9435 | 9958 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1960 | 2938 | 3717 | 4486 | 5085 | 6333 | 7343 | 8247 | 9014 |
| | | 1972 | 3015 | 3720 | 4487 | 5106 | 6369 | 7361 | 8275 | 9039 |
| | | 1992 | 3030 | 3722 | 4493 | 5158 | 6457 | 7424 | 8282 | 9047 |
| 0011 | 0905 | 2122 | 3034 | 3734 | 4591 | 5199 | 6472 | 7485 | 8308 | 9096 |
| 0017 | 1040 | 2126 | 3235 | 3741 | 4627 | 5377 | 6480 | 7539 | 8421 | 9098 |
| 0047 | 1071 | 2158 | 3300 | 3774 | 4645 | 5496 | 6521 | 7635 | 8448 | 9129 |
| 0104 | 1091 | 2186 | 3301 | 3853 | 4688 | 5508 | 6544 | 7653 | 8509 | 9173 |
| 0165 | 1112 | 2209 | 3307 | 4044 | 4708 | 5509 | 6576 | 7655 | 8550 | 9247 |
| 0262 | 1128 | 2356 | 3318 | 4064 | 4731 | 5544 | 6665 | 7678 | 8598 | 9292 |
| 0350 | 1149 | 2379 | 3319 | 4104 | 4748 | 5550 | 6690 | 7702 | 8600 | 9300 |
| 0377 | 1150 | 2443 | 3437 | 4138 | 4797 | 5564 | 6835 | 7723 | 8681 | 9378 |
| 0401 | 1195 | 2456 | 3441 | 4142 | 4800 | 5570 | 6857 | 7746 | 8701 | 9399 |
| 0430 | 1242 | 2508 | 3519 | 4170 | 4844 | 6000 | 6869 | 7766 | 8707 | 9454 |
| 0572 | 1283 | 2527 | 3520 | 4244 | 4848 | 6051 | 6930 | 7773 | 8740 | 9537 |
| 0693 | 1326 | 2587 | 3553 | 4400 | 4891 | 6103 | 6978 | 7917 | 8757 | 9579 |
| 0709 | 1516 | 2615 | 3567 | 4407 | 4989 | 6152 | 6984 | 8118 | 8793 | 9671 |
| 0720 | 1553 | 2632 | 3572 | 4435 | 5004 | 6166 | 7056 | 8130 | 8824 | 9829 |
| 0810 | 1662 | 2787 | 3593 | 4438 | 5015 | 6191 | 7147 | 8166 | 8889 | 9867 |
| 0813 | 1716 | 2796 | 3619 | 4440 | 5019 | 6269 | 7167 | 8177 | 8921 | 9909 |
| 0835 | 1736 | 2824 | 3656 | 4446 | 5065 | 6298 | 7243 | 8181 | 8948 | 9933 |
| 0853 | 1790 | 2880 | 3706 | 4464 | 5080 | 6302 | 7302 | 8188 | 8980 | 9938 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. • अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पाहावे. • प्रस्तुतकर्ता : महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी ता. २/३/२०२६

| | | |
|---|---|---|
| ७ | ९ | ६ |
| ७० | १४ | ६४ |
| ७५ | १९ | ६९ |
| १२४ | १३७ | २४० |
| ३६८ | २३६ | ३४९ |

# पेटत्या होमातून धावताना संकासुराचा अडूरमध्ये थरार

■ गुहागर

**तालुक्यातील** पारंपरिक शिमगोत्सवाच्या निमित्ताने अडूर गावात ग्रामदेवता श्री सुंकाई देवी यांच्या होलिकोत्सवातील पेटत्या होमातून धावणाऱ्या संकासुराचा थरार यंदाही हजारो भाविकांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.

फाल्गुन पंचमीपासून हा शिमगा उत्सव सुरू झाला आहे. या शिमगोत्सवात चतुःसीमेतील कोंडकारूळ, बोऱ्या, बुधल, पालशेत व नागझरी या गावांत देवीच्या खेळ्यांची भोवनी पार पडली. त्यानंतर भाटी मैदानावर रात्री आयोजित धार्मिक कार्यक्रमात संकासुराने पेटत्या होमाभोवती प्रदक्षिणा घालत भक्तांचा पाठलाग करण्याची पारंपरिक प्रथा पार पडली. होमाला अग्नी दिल्यानंतर संकासुराने ज्वलंत निखाऱ्यांतून धावत उपस्थितांमध्ये थरार निर्माण केला. यावेळी 'जय देवी सुंकाई'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. संकासुराला चिडवणाऱ्या भक्तांचा तो पेटत्या होमातून पाठलाग करतो आणि पकडल्यावर भक्त नमस्कार करून त्याचा आशीर्वाद घेतात, अशी आगळीवेगळी



परंपरा पाहण्यासाठी जिल्हा व परजिल्ह्यातून मोठी गर्दी उसळली होती. पिढ्यान्‌पिढ्या सुरू असलेल्या या परंपरेत आजवर कोणतीही अपघाताची घटना घडलेली नसल्याने ग्रामदेवतेवरील श्रद्धा अधिक दृढ होत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. संकासुराचा पारंपरिक वेश, कंबरेतील घुंगरांचा नाद आणि मृदुंग चकव्याच्या तालावर सादर होणारी लोककला यामुळे कार्यक्रमाला वेगळेच आकर्षण लाभले.

# एसआरए कार्यालय खासगी टॉवरमध्ये! दरमहा ४० लाखांचे भाडे

■ मुंबई

**वांद्र्यातील** एसआरए कार्यालयाने कार्यालयीन कामकाजासाठी येथील एचडीआयएल टॉवरमध्ये दरमहा ४० लाख रुपये भाडेतत्त्वावर जागा घेतली आहे. त्यामुळे गेले काही महिन्यांपासून प्राधिकरणाच्या तिजोरीला आर्थिक भार सोसावा लागत आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण अर्थात एसआरए कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सध्याची कार्यालयीन जागा अपुरी पडू लागली आहे. परिणामी शेजारी असलेल्या खासगी मालकाच्या एचडीआयएल टॉवरच्या तिसऱ्या मजल्यावर भाडेतत्त्वावर जागा घेण्यात आलेली आहे. या ठिकाणी एसआरएचे बारा उपजिल्हा अधिकारी बसतात. दरमहा अंदाजे ४० लाख रुपये जागेचे भाडे प्राधिकरणाला भरावे लागत असल्याने आर्थिक भुर्दंडाचे ओझे आणखी किती वर्षे सहन करायचे, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. या संदर्भात एसआरएस कार्यालयातील एका उपजिल्हा अधिकाऱ्याने सांगितले की, एचडीआयएल टॉवरमध्ये भाडेतत्त्वावर असलेले कार्यालयाची जागा विकत घेण्याचा एसआरए प्राधिकरणाचा विचार आहे. तसा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला आहे.

# आफ्रिकेतून खास हेलिकॉप्टरने कुनोमध्ये आणले! आता ९ चित्ते

भोपाळ



**चित्ता** स्थलांतर प्रकल्पाअंतर्गत दक्षिण अफ्रिकेतील बोत्सवाना येथून भारतात ९ चित्ते दाखल झाले आहेत. त्यांना मध्य प्रदेशातील शोपूर जिल्ह्यातील कुनो राष्ट्रीय उद्यानातील खुल्या कुंपणात सोडण्यात आले. या चित्त्यांना खास हेलिकॉप्टरने आणण्यात आले होते. त्यांच्या आगमनाने आता देशातील चित्त्यांची संख्या ३९ वरून ४८ झाली आहे. यापूर्वी सप्टेंबर २०२२ मध्ये नामिबिया येथून पहिल्या तुकडीत

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

भारतात आठ (पाच मादी, तीन नर) आणि फेब्रुवारी २०२३ मध्ये दुसऱ्या तुकडीत दक्षिण अफ्रिकेतून बारा चित्ते (सात नर, पाच मादी) आणले होते. केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांनी या चित्त्यांना क्वारंटाईन भागात मुक्त केले. उर्वरित चित्त्यांना वनविभागाच्या प्रशिक्षित पथकाने नियमानुसार त्यांच्या कक्षात हलविले आहे. सध्या मादी चित्त्यांचे प्रमाण वाढल्याने भविष्यात प्रजननाचा दर वाढेल आणि चित्त्यांमधील प्रादेशिक संघर्ष कमी होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.आता कुनोमध्ये एकूण ३५ वयस्क चित्ते असून त्यामध्ये १८ मादी तर १७ नर चित्ते आहेत. नवे ९ चित्ते पुढील एक महिना तज्ज्ञांच्या देखरेखीखाली क्वारण्टाईन राहणार आहेत. त्यांच्या आरोग्याची, वागणुकीची आणि येथील वातावरणाशी जुळवून घेण्याच्या क्षमतेची काळजीपूर्वक पाहणी केली जाणार आहे.

**देश विदेश**

# यंदा गोव्यात होळीसाठी झाडांऐवजी फांदी वापरणार

**भगवती देवस्थानचा निर्णय**

पणजी

**उत्तर** गोवा जिल्ह्यातील पेडणे शहराजवळ असलेल्या पार्से येथील श्री भगवती देवस्थान येथे शिगमोत्सवानिमित्त यंदा प्रथमच होळी सणाच्या पारंपरिक प्रथेत बदल करण्यात आला आहे. याठिकाणी आंब्याच्या पूर्ण झाडाची होळी घालण्याची परंपरा चालत आली होती. मात्र यावर्षी पर्यावरणाचे भान ठेवत देवस्थान समितीने यंदा पूर्ण आंब्याचे झाड तोडण्याऐवजी केवळ त्याची एक फांदी होळी म्हणून वापरली जाणार आहे.

देवस्थान समितीचे अध्यक्ष प्रदीप देसाई व अन्य पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, पारंपरिक पद्धतीनुसार होळी साजरी करण्यासाठी दरवर्षी गावातील एक आंब्याचे झाड पूर्णपणे कापावे लागत होते. त्यामुळे दरवर्षी एक झाड नष्ट होत असल्याने पर्यावरणाची मोठ्या प्रमाणावर हानी होत होती. ही बाब लक्षात घेऊन समितीने परंपरा कायम ठेवत पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. शेकडो वर्षांची परंपरा जपत असताना पर्यावरणाचेही रक्षण व्हावे, हा आमचा प्रयत्न आहे. त्यामुळे यापुढे पूर्ण झाड न कापता त्याची एक फांदी होळी म्हणून वापरण्यात येईल. तालुक्यातील इतर देवस्थानांनीही हा निर्णय योग्य वाटल्यास अशाच प्रकारे झाडांची तोड टाळून फांदीचा वापर करावा, जेणेकरून परंपराही टिकेल आणि पर्यावरणाचे संवर्धनही होईल, असे आवाहनही त्यांनी केले.

# २५ लाख बक्षीस असलेल्या सुदर्शनसह १५ नक्षलवादी शरण

**रायपूर** - छत्तीसगडच्या महासमुंद जिल्ह्यात बालनगीर-बारगड-महासमुंद (बीबीएम) डिव्हिजन कमिटीशी संबंधित १५ माओवाद्यांनी बालोदा पोलीस ठाण्यात आत्मसमर्पण करुन आपली शस्त्रे पोलिसांना दिली. आत्मसमर्पण करणाऱ्यांमध्ये ९ महिला आणि ६ पुरुष नक्षलवादी होते. त्यात ओडिशाचा पश्चिम उप-क्षेत्रीय ब्युरो सचिव विकास उर्फ सुदर्शनचाही समावेश आहे. त्याच्यावर २५ लाख रुपयांचे मोठे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. केंद्र सरकारच्या धोरणांवर विश्वास व्यक्त करत या नक्षलवाद्यांनी हिंसाचाराचा मार्ग सोडून शांततापूर्ण जीवन स्वीकारण्याचा निर्णय घेतला.

# नॉर्वेचे माजी पंतप्रधान जगलँड यांच्या आत्महत्येच्या प्रयत्नानंतर रुग्णालयात

ओस्लो

**नॉर्वेचे** माजी पंतप्रधान थोरब्योर्न जगलँड यांना आत्महत्येच्या प्रयत्नानंतर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हे पूर्ण प्रकरण अत्याचार गुन्हेगार जेफ्री एपस्टी नसोबतच्या त्यांच्या संबंधांवरून सुरू असलेल्या चौकशीशी निगडित आहे. जगलँड यांच्यावर गंभीर भ्रष्टाचाराचाही आरोप असून याकरता त्यांना कमाल १० वर्षांची शिक्षा होण्याची शक्यता आहे.

ओकोक्रिम ही आर्थिक गुन्हे तपास संस्था याप्रकरणी तपास करत आहे. जगलँड विरोधात तपास करण्यासाठी ठोस पुरावे आहेत. चौकशी अंतर्गत ओस्लो येथील त्यांचे निवासस्थान आणि दोन अन्य मालमत्तांची झडती घेण्यात आल्याची माहिती ओकोक्रिमचे संचालक पॉल लोनसेथ यांनी दिली. पंतप्रधानपदावर असताना जगलँड यांना भेटवस्तू, कर्ज किंवा अन्य लाभ मिळाले होते का याचाही तपास केला जात आहे.

# ईस्टर संडे बॉम्बस्फोट प्रकरणी माजी गुप्तचर प्रमुखाला अटक

कोलंबो

**श्रीलंकेत** २०१९ मधील ईस्टर संडे बॉम्बस्फोटांप्रकरणी गुप्तचर खात्याचे माजी प्रमुख मेजर जनरल सुरेश सैली यांना अटक करण्यात आली आहे. या कारवाईमुळे श्रीलंकेच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. बॉम्बस्फोटाच्या अनेक आठवड्यांपूर्वीच भारताने श्रीलंकेच्या गुप्तचर यंत्रणांना इनपूट देण्यास सुरुवात केली होती, असा खुलासा या कारवाईमुळे झाला आहे. भारतीय यंत्रणांच्या माहितीकडे दुर्लक्ष करत श्रीलंकेच्या गुप्तचर यंत्रणांनी बॉम्बस्फोट होऊ दिले होते. भारताने बॉम्बस्फोटाच्या अनेक आठवड्यांपूर्वीच कटाच्या सूत्रधाराची ओळख आणि संभाव्य टार्गेटविषयी माहिती श्रीलंकेच्या गुप्तचर यंत्रणेला पुरविली होती. तरीही कुठलीच कारवाई करण्यात आली नव्हती. या बॉम्बस्फोटांमध्ये २५० हून अधिक जणांचा बळी गेला होता.

हे बॉम्बस्फोट स्थानिक कट्टरवादी संघटना नॅशनल तौहीद जमात आणि जमीयतुल मिलथु इब्राहिमने मिळून घडवून आणले होते. बॉम्बस्फोटात सामील हल्लेखोर कट्टरवादी मानसिकता आणि इस्लामिक स्टेटच्या विचारसरणीने प्रेरित होते. श्रीलंकेत त्यावेळी रानिल विक्रमसिंघे यांचे सरकार होते आणि बॉम्बस्फोटानंतर गुप्तचर खात्याच्या अपयशावरून त्यांच्यावर टीका करण्यात आली होती.

# चिनी वर्चस्वाला अमेरिकेचे आव्हान! ट्रम्प यांची २ लाख कोटींची खनिज मोहीम

वॉशिंग्टन



**जगातील** महत्त्वाच्या दुर्मीळ खनिजांवरील चीनचे वाढते वर्चस्व कमी करण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मोठी आर्थिक आणि औद्योगिक मोहीम सुरू केली आहे. सुमारे २ लाख कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या खाण आणि खनिज प्रकल्पांना चालना देत अमेरिका जागतिक पुरवठा साखळीमध्ये चीनवरील अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न करत आहे.

तंत्रज्ञान, संरक्षण आणि ऊर्जा क्षेत्रासाठी आवश्यक असलेल्या रेअर अर्थ्स आणि धातूंमध्ये चीन सध्या आघाडीवर आहे. संगणक, इलेक्ट्रिक वाहने, एरोस्पेस उपकरणे, लष्करी तंत्रज्ञान तसेच डेटा सेंटर आणि स्मार्टफोन निर्मितीसाठी लागणाऱ्या सुमारे ३० ते ६० महत्त्वाच्या धातूंच्या उत्पादन व शुद्धीकरणात चीनचे वर्चस्व आहे. त्यामुळे जागतिक बाजारपेठेत चीनला आर्थिक आणि सामरिक आघाडी मिळाल्याचे मानले जाते. या पार्श्वभूमीवर अमेरिकेने अर्जेंटिनापासून उझबेकिस्तानपर्यंत जवळपास २० देशांशी आवश्यक खनिजांच्या उत्खनन आणि पुरवठ्यासंदर्भात करार केले आहेत. चीनकडून स्वस्त दरात होणाऱ्या खनिज डम्पिंगमुळे पाश्चात्त्य देशांतील खाणी बंद पडू नयेत यासाठी ट्रम्प प्रशासनाने या मोहिमेसाठी तीन प्रमुख धोरणांवर लक्ष केंद्रित केले आहे. यामध्ये नवीन खाणींसाठी थेट गुंतवणूक व सबसिडी, उत्पादित खनिजांच्या खरेदीची हमी आणि चीनच्या स्वस्त पुरवठ्याविरोधात बाजार हस्तक्षेप या घटकांचा समावेश आहे.

# मालवणमध्ये पोलिसांची 'नेपोलियन' नौका बुडाली

मालवण

**सर्व कर्मचारी सुरक्षित**



**सिंधुदुर्ग** किल्ल्याच्या मागील बाजूस समुद्रात काल दुपारी सोसाट्याचा वारा आणि अजस्त्र लाटांच्या तडाख्याने पोलिसांची 'नेपोलियन' ही गस्तीनौका बुडाली. सुदैवाने या नौकेवरील सर्व कर्मचारी सुरक्षित असून मोठा अनर्थ टळला आहे.

'नेपोलियन' ही पोलीस गस्तीनौका सिंधुदुर्ग किल्ल्याच्या पाठीमागील भागात नियमित गस्त घालत होती. त्यावेळी समुद्रात सोसाट्याचा वारा वाहत असल्याने लाटांचा जोर प्रचंड वाढला. गस्त घालत असतानाच एकापाठोपाठ एक आलेल्या अजस्त्र लाटांनी नौकेला जोरदार धडक दिली. या धडकेमुळे नौकेत पाणी शिरले आणि पाहता पाहता नौका समुद्रात बुडू लागली. नौका बुडत असल्याचे लक्षात येताच नौकेवरील पोलीस कर्मचारी आणि खलाशांनी प्रसंगावधान राखत बचावासाठी प्रयत्न सुरू केले. पोलीस निरीक्षक मारुती जगताप यांनी तत्काळ मदतकार्य सुरू केले. त्यांनी स्थानिक मच्छीमार योगेश तोडणकर यांची नौका घेऊन समुद्रात धाव घेतली. या बचावकार्यात विली डिसोझा, नॉवेल फर्नांडिस, होमगार्ड जॉयल फर्नांडिस, खलाशी रॉनी, कुमार, लॉरेन्स, बेंडिट आणि इतर मत्स्य व्यावसायिक तरुणांनी सहभाग घेतला होता.

# मुंबई-गोवा महामार्गावर कोंडी ४ ते ५ किमीपर्यंत वाहनांच्या रांगा

रायगड

**मुंबई-गोवा** महामार्गावर रायगड जिल्ह्यातील माणगाव आणि इंदापूर परिसरात प्रचंड वाहतूक कोंडी झाली. कोलाड, इंदापूर आणि माणगाव भागात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. काही ठिकाणी ४ ते ५ किलोमीटरपर्यंत वाहने अडकली होती. होळी म्हणजे कोकणातील प्रमुख सण असल्याने दरवर्षीप्रमाणे रत्नागिरी, रायगड आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत राहणारे मुंबईतील चाकरमानी मोठ्या संख्येने गावी जात आहेत. यंदा सलग तीन दिवसांची सुट्टी आल्याने शुक्रवारी रात्रीपासूनच कोकणाच्या दिशेने जाणाऱ्यांची गर्दी वाढली. माणगाव आणि इंदापूर दरम्यान काळ परिसरात मोठी वाहतूक कोंडी झाली.

# पिंपरी-चिंचवडच्या इंदिरा विद्यापीठाचे ८० विद्यार्थी व ४ शिक्षक दुबईत अडकले

दुबई

**अमेरिका,** इस्त्रायल आणि इराण यांच्यात निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीचा फटका पिंपरी-चिंचवडमधील विद्यार्थ्यांना बसला आहे. ताथवडे येथील इंदिरा इन्स्टिट्यूट ऑफ स्कूल ऑफ बिझनेसचे ८० विद्यार्थी आणि ४ शिक्षक असे एकूण ८४ जण सध्या दुबई येथे अडकले आहेत. सध्या दुबई हवाई मार्ग बंद झाल्याने या विद्यार्थ्यांचा परतीचा प्रवास लांबला आहे. विद्यार्थ्यांनी व्हिडिओ पोस्ट करत आपण सुरक्षित असल्याचे सांगत पालकांनी चिंता करू नये, असेही कळवले आहे.

हे सर्व विद्यार्थी अभ्यास दौरा निमित्त दुबईला गेले होते. नियोजित वेळापत्रकानुसार ते शनिवारी आणि रविवारी दोन टप्प्यांत भारतात परतणार होते. याबाबत महाविद्यालयाचे अधिष्ठाता जनार्दन पवार यांनी सांगितले की, सर्व विद्यार्थी आणि शिक्षक दुबईच्या मध्य भागात असून ते पूर्णपणे सुरक्षित आहेत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत पालकांनी घाबरून जाऊ नये. केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याशी संपर्क साधून त्यांना निवेदन देण्यात आले आहे.

# एल्फिन्स्टन पुलबाधितांची घरे बदलून द्या एमएमआरडीएची म्हाडाकडे मागणी

मुंबई

**एल्फिन्स्टन** पुलाच्या कामामुळे प्रकल्पबाधित होणाऱ्या यातील १२ रहिवाशांनी भायखळा व अ‍ॅण्टॉप हिल येथील घरांना विरोध दर्शविला आहे. त्यामुळे या भागातील घरे बदलून द्या, अशी मागणी एमएमआरडीएने म्हाडाच्या मुंबई इमारत दुरूस्ती पुनर्रचना मंडळाकडे केली आहे.

या कार्यालयातील एका अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार, एल्फिन्स्टन पुलाच्या बांधकामामुळे या लगत असलेल्या लक्ष्मी निवास व हाजी नुरानी या चाळीतील ८३ रहिवासी प्रकल्पबाधित होणार आहेत. या रहिवाशांना दादर, प्रभादेवी, वडाळा, वरळी, भायखळा, अ‍ॅण्टॉप हिल परिसरात मालकी हक्काने घरे देण्यासाठी एमएमआरडीएने म्हाडाकडून येथील ८३ घरे ८९ कोटी रुपयांना विकत घेतली आहेत. मात्र यातील १२ रहिवाशांनी अ‍ॅण्टॉप हिल रामबाग सोसायटी, भायखळा जेकब सर्कल येथील एमएमआरडीकडून दिली जाणारी घरे ताब्यात घेण्यास नापसंती दर्शवली आहे. आम्हाला दादर आणि प्रभादेवीत घरे द्या, अशी मागणी केली आहे. त्यामुळे एमएमआरडीएने दोन पावले मागे येत भायखळा व अ‍ॅण्टॉप हिलमधील घरे बदलून देण्याची मागणी म्हाडाच्या संबंधित मंडळाकडे केली आहे.

# मडगावात खासगी दुचाकी भाड्याने दिल्याने संताप

मडगाव

**दक्षिण** गोवा जिल्ह्यातील मडगाव शहरात टॅक्सी चालकांनी दुचाकी गाड्यांच्या बेकायदेशीर व्यावसायिक वापरांविरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. मडगाव परिसरात खासगी नोंदणी असलेल्या दुचाकी भाड्याने देणाऱ्या रॅकेटचा टॅक्सी चालकांनी पर्दाफाश केला.

हे चालक पर्यटकांना रीतसर परवाना नसतानाही आपल्या खासगी दुचाकी भाड्याने देऊन टॅक्सी व्यवसायाचे आर्थिक नुकसान करत असल्याचा आरोप टॅक्सी युनियनने केला आहे. या कारवाईवेळी टॅक्सी चालकांनी या तिन्ही दुचाकी पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. प्रशासनाने अशा अनधिकृत भाडेतत्त्वावरील गाड्यांवर कडक कारवाई करावी. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा मडगाव टॅक्सी चालकांनी दिला आहे. या घटनेमुळे मडगावात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

# मुलांना खेळता-खेळता सापडला चांदीचा खजिना

बीड



**जिल्ह्यातील** आष्टी तालुक्यातील सांगवी (पाटण) या गावात एका घराच्या बांधकामासाठी काढलेल्या मातीच्या ढिगाऱ्यावर खेळणाऱ्या लहान मुलांना १८८२ सालची जुनी चांदीची नाणी भरलेला हंडा सापडला आहे.

शनिवारी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास शाळा सुटल्यानंतर काही मुले पायासाठी खोदलेल्या मातीच्या ढिगाऱ्यावर खेळत होती. खेळता खेळता अचानक माती बाजूला झाली आणि मुलांना एक मातीचे गाडगे दिसले. त्यातून नाणी बाहेर पडल्याने मुलांनी ती खेळण्याचे पैसे समजून खिशात भरली आणि आनंदात मुले घरी निघाली. दरम्यान, ही बाब संबंधित जागा मालकाला समजताच त्यांने मुलांना थांबवून दमदाटी करत त्यांच्याकडील नाणी एकत्र करून पुन्हा गाडग्यात भरून तो खजिना सुरक्षित ठिकाणी ठेवला. पुरातत्त्व विभागाने या घटनेची तत्काळ दखल घेऊन घटनास्थळाची पाहणी करावी आणि संबंधित नाणी शासनदरबारी जमा करावीत,अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. सापडलेली नाणी ही चांदीची असून त्यावर 'वन रूपी इंडिया १८८२' असा उल्लेख असल्याचे सांगण्यात येत आहे. तसेच त्याचे वजन ४ ते ५ किलो असावे,असा अंदाज वर्तविण्यात येत आहे.

# संत बाळूमामांच्या पालखीवर एक टन भंडाऱ्याची उधळण

कोल्हापूर

**गेल्या** सहा दिवसांपासून राधानगरी तालुक्यातील कौलव गावात मुक्कामाला असलेल्या संत बाळूमामा पालखीचे काल हसुर गावाकडे अभूतपूर्व उत्साहात प्रस्थान झाले. यावेळी हजारो भाविकांनी पालखीवर तब्बल १ टन भंडाऱ्याची उधळण केली. या पालखी सोहळ्याने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता.

काल शनिवारी पालखी प्रस्थान मिरवणुकीला सुरुवात होताच संत 'बाळू मामा की जय' च्या घोषणांनी वातावरण दुमदुमले. पालखी मार्गावर पुष्पवृष्टी करण्यात आली. तसेच फुलांच्या पायघड्या अंथरून पालखीचे स्वागत करण्यात आले. ठिकठिकाणी अन्नदात्यांकडून पाणी व नाश्ता वाटप करण्यात आले.भंडारा उधळत कौलव, घोटवडे, भोगावती, परिते आणि राशिवडे गावांच्या वेशीवरून जल्लोषात मार्गक्रमण करत पालखी हसुर येथे दाखल झाली.

# अल्पवयीन चालकामुळे अपघात! घाटकोपरमध्ये मेणबत्ती मोर्चा

**आरोपींना योग्य शिक्षेची मागणी**

मुंबई

**गेल्या** ५ फेब्रुवारी रोजी सोमय्या कॉलेजजवळ झालेल्या रस्ता अपघातात घाटकोपरमधील ३३ वर्षीय ध्रुमिल पटेल यांचा मृत्यू झाल्याने संतप्त झालेल्या स्थानिक रहिवाशांनी आज मेणबत्ती मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला. अपघाताच्या वेळी वाहन चालवणारा आरोपी अल्पवयीन असल्याने त्याच्यावर केवळ बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) कायद्याअंतर्गत कारवाई केली जात आहे. गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या अल्पवयीन आरोपींवर प्रौढांप्रमाणे खटला चालवून योग्य शिक्षा व्हावी, यासाठी कायद्यात बदल करण्याची मागणी होत आहे.

ध्रुमिल आणि त्यांची पत्नी मीनल (३२) रात्री घरी परतत असताना १७ वर्षीय मुलाने चालवलेल्या एसयूव्हीने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. ध्रुमिल यांनी घाटकोपर (प.) येथील खासगी रुग्णालयात दहा दिवस मृत्यूशी झुंज दिली. मात्र अखेरीस त्यांचा मृत्यू झाला. मीनल गंभीर जखमी आहेत. भावनिक व्हिडिओ संदेशात मीनल यांनी सांगितले की, संबंधित अल्पवयीन चालक परवान्याविना बेदरकारपणे वाहन चालवत होता. माझ्या पतीची कोणतीही चूक नव्हती. या प्रकरणी नागरिकांनी आज दुपारी ४ वाजता कपोलवाडी, एम.जी. रोड, घाटकोपर (प.) येथील एलचीवाडी कंपाऊंड या ध्रुमिलच्या राहत्या घरावरून निघून सोमय्या कॉलेजच्या गेट क्रमांक ३ पर्यंत मोर्चा काढला. हा अपघात तेथेच झाला होता.

# बाळगंगा धरणग्रस्तांचे पेणमध्ये बेमुदत उपोषण आंदोलन सुरू

रायगड

**जिल्ह्यातील** पेण तालुक्यातील बाळगंगा धरण प्रकल्पग्रस्तांनी पुनर्वसनयोग्य मोबदला आणि संपादित जमिनींचे सातबारा उतारे परत मिळण्याच्या मागणीसाठी बेमुदत उपोषण सुरू केले आहे. १६-१७ वर्षांपासून रखडलेले काम आणि प्रशासनाच्या उदासीनतेमुळे प्रकल्पग्रस्त संतप्त असून, त्यांनी यापूर्वी जलसत्याग्रह व मतदानावर बहिष्काराचे हत्यार उपसले आहे. पेण तालुक्यातील बाळगंगा धरण प्रकल्पासाठी २०१० सालापासून जमिनी संपादित करण्यात आल्या. या प्रकल्पामुळे ९ गावे व १३ आदिवासी वाड्यांतील सुमारे ३८०० हून अधिक कुटुंबे बाधित झाली असून, एकूण १२४० हेक्टर जमीन अधिग्रहित करण्यात आली आहे. 'न्याय्य नुकसानभरपाई व पारदर्शकतेचा हक्क अधिनियमनुसार, पाच वर्षांत वापरात न आणलेली संपादित जमीन मूळ मालकांना परत देण्याची तरतूद आहे. १६ वर्षे उलटून गेली असून अनेक जमिनीचे सातबारा उतारे कोरे झाल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. या उपोषणाला शेकापचे अतुल म्हात्रे, काँग्रेसचे पेण तालुका अध्यक्ष अशोक मोकल, महासचिव नंदा म्हात्रे, आदींनी भेट देऊन पाठिंबा दर्शविला.

# भिवंडीच्या 'नीलेश डाईंग'ला आग तीन मजली पूर्ण इमारत खाक

**आगीचे कारण अद्याप अस्पष्ट**

भिवंडी



**शहरातील** अत्यंत गजबजलेल्या खोका कंपाऊंड परिसरातील 'नीलेश डाईंग' या धाग्यावर प्रक्रिया करणाऱ्या कंपनीला मध्यरात्री भीषण आग लागली. आगीचे स्वरूप इतके रौद्र होते की, पाहता पाहता संपूर्ण तीन मजली इमारत आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मध्यरात्रीच्या सुमारास लागलेल्या या आगीमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. आगीची माहिती मिळताच भिवंडी आणि कल्याण अग्निशमन दलाच्या एकूण पाच गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. आगीने रौद्ररूप धारण केल्यामुळे अग्निशमन जवानांना आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करावे लागले. सुमारे पाच तासांच्या अथक परिश्रमानंतर त्यांना आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. या आगीत कंपनीतील मोठ्या प्रमाणावरील कच्चा माल आणि महागडी यंत्रसामग्री खाक झाली असून, लाखो रुपयांचे नुकसान झाले. आग लागण्याचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट असले तरी प्राथमिक अंदाजानुसार शॉर्टसर्किटमुळे ही आग लागली असावी.

# लासलगावात ३ दिवस कांदा लिलाव बंद

नाशिक

**होळी** व धुळवडीच्या पार्श्वभूमीवर मजूर टंचाई आणि रेल्वे रॅक उपलब्ध नसल्यामुळे लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत तीन दिवस कांद्याचे लिलाव बंद ठेवण्याचा निर्णय कांदा व्यापाऱ्यांनी घेतला आहे.

सोमवार २ मार्च, मंगळवार ३ मार्च आणि बुधवार ४ मार्च या कालावधीत लिलाव प्रक्रिया स्थगित राहणार असल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. सध्या कांद्याच्या बाजारभावात चढ-उतार सुरू असताना शेतकरी आपला माल विक्रीसाठी बाजार समितीत आणत आहेत.


# भूता हायस्कूलमध्ये होळी उत्सव रंगला!

मुंबई



**विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग**

**अंधेरी** पूर्व येथील श्री नागरदास धारसी भुता हायस्कूलमध्ये पूर्व-प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांसाठी होळी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. स्वर्गीय श्री जयसुखलाल नागरदास भूता स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे झालेल्या या कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या स्वागताने व दीपप्रज्वलनाने झाली. सरस्वती मातेस प्रार्थना अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. शाळागीताच्या सुरेल सादरीकरणाने वातावरण भारावून गेले. व्यवस्थापकीय विश्वस्त कमलेशजी भुता यांनी विद्यार्थ्यांना सकारात्मकता, शिस्त आणि जबाबदारी जपण्याचे आवाहन केले. दिशा यादव यांनी खरे रंग हे हृदयातील गुणांमध्ये असतात, असे सांगत विद्यार्थ्यांना प्रेरित केले, तर दीपा कुलकर्णी यांनी धैर्य, दयाळूपणा आणि चिकाटीचे महत्त्व अधोरेखित केले. प्राथमिक व माध्यमिक विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नाटिकेला उपस्थितांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रंगोत्सवाच्या वेळी विद्यार्थ्यांनी गुलाल उधळत नृत्याचा आनंद लुटला आणि क्रीडांगण रंगांनी उजळून निघाले. पालकांसाठीही स्वतंत्र वेळ ठेवण्यात आल्याने उत्सवात आपुलकीचे वातावरण निर्माण झाले.




संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# विकृतीच्या संहारासाठी होलिकोत्सव

**भारतीय** कालगणनेचा शेवटचा महिना असलेल्या फाल्गुनात पौर्णिमेला येणारा होळीचा सण म्हणजे सामाजिक संस्कृतीचे संवर्धन करणारा महत्त्वपूर्ण सण ठरतो. आजच्या दिवशी देशभर वेगवेगळ्या पद्धतीने होळी साजरी होते. उत्तर भारतात त्याचे विशेष प्रस्थ पाहायला मिळते. तर महाराष्ट्रात कोकणात 'शिमगा' या नावाने या सणाचे आगळेवेगळेपण रूढ झालेले दिसून येते. आजचे विज्ञान तंत्रज्ञान युग किंवा आता कृत्रिम बुद्धिमत्तेच्या उंबरठ्यावर सगळं जग असताना भारतासारख्या देशात ही सणपरंपरा कायम टिकवून ठेवण्याचा अट्टाहास अतिशय मोलाचा ठरतो. विज्ञानाने अनेक शोध लावले. तंत्रज्ञानातून अनेक सुखसाधने मनुष्याच्या दिमतीला आली. परंतु मनाचे समाधान मिळवून देण्याचे काम विज्ञान किंवा तंत्रज्ञान करू शकलेले नाही. त्यासाठीच सण, उत्सव, व्रतवैकल्य किंवा परंपरांच्या माध्यमातून जपले गेलेले संस्कार महत्त्वाचा आधार ठरले आहेत. आजचा होळीचा सण अशीच प्राचीन परंपरेची एक अखंड संस्कारधारा म्हणावी लागेल. होळीच्या सणामागचे पौराणिक संदर्भ वेगवेगळ्या प्रकारे सांगितले जातात. मग अगदी हिरण्यकश्यपूने आपला मुलगा प्रल्हाद हा सतत नारायणाचे स्मरण करतो. या द्वेषातून त्याचा वध करण्याचा प्रयत्न केला. यासाठी त्याची बहीण होलिका जिला अग्नीपासून अभय मिळाले होते. तिच्या मांडीवर बसून प्रल्हादाला नाहीसे करण्याचा प्रयत्न झाला. परंतु त्यात होलिका जळून खाक झाली. प्रल्हाद मात्र जिवंत राहिला. कथानक अतिशय साधे आहे. अनेकांना ते भाबडेपणाचे लक्षण वाटू शकेल. परंतु अनेक कथापुराणांमधून समाजाचे मन ओळखून अतिशय महत्त्वाचा संदेश दिला जातो. ईश्वराची आराधना करणाऱ्यांना सर्व प्रकारचे संरक्षण मिळते किंवा सद्विचार आणि सद्भावना जोपासणाऱ्यांना कोणताही त्रास होत नाही. हे कथाबीज लक्षात घेतले तर होळीचा सण सद्भाव आणि सद्विचारांना संवर्धित करणारा विकृत विचारांना मूठमाती देणारा ठरतो. या दिवशी पेटवली जाणारी होळी समाजातल्या अनेक घटकांना एकत्र आणते. अग्नी ही देवता मानली गेल्याने सार्वजनिक स्वरूपात तिची केली जाणारी पूजाअर्चा हीदेखील समृद्धीचेच वरदान देणारी ठरते.

**मतभेदांना मूठमाती**

भारतात प्राचीन काळापासून यज्ञ संस्कृती नांदत आली आहे. प्राचीन काळी दुष्ट शक्तींचा नायनाट करण्यासाठी यज्ञ होत असत. एवढेच नव्हे तर घरात रोज लावला जाणारा दिवा हासुद्धा शुभविचारांचे दान देणारा आणि अज्ञानाचा अंधःकार दूर करणारा मानला जातो. सार्वजनिक स्वरूपात जेव्हा अशा प्रकारे ठिकठिकाणी होळी पेटवली जाते आणि तिला दाखवला जाणारा नैवेद्य या गोष्टीसुद्धा विकृती, दुष्टविचार, याचा विनाश करण्यासाठी केलेले आवाहन ठरते. या दिवशी केले जाणारे गोडाधोडाचे जेवण विशेषतः महाराष्ट्रातच होळी आणि पुरणपोळी हे समीकरण अतिशय घट्ट आहे. पूर्वी गावाची एकच होळी साजरी व्हायची. परंतु आता वस्ती वाढल्याने अगदी शहरातही छोट्या स्वरूपात चौकाचौकात होळ्या पेटवल्या जातात. कोकणात किंवा ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर लाकडांच्याऐवजी गोवऱ्यांचा वापर होतो. परंतु ही होळी पेटवताना अग्नीच्या साक्षीने मतभेदांचा किंवा मनभेदांचा अंधार दूर व्हावा असाच विचार असतो. कोकणामध्ये परंपरेने ही कथा रूढ आहे. त्यात मुलं पळवून नेणाऱ्या ढुंढा राक्षशीणीचा वध करण्याकरीता किंवा तिला पळवून लावण्याकरीता पेटवली गेलेली होळी शुभ आणि कल्याणकारी मानली गेली. आणि म्हणून आजही गाऱ्हाणं घालण्यापासून ते पालख्यांपर्यंत मोठ्या उत्साहात हा सण साजरा होतो. या निमित्ताने तिथल्या ग्रामदेवतेची होणारी पूजा आणि सामूहिकरित्या आपापल्या गावाविषयी व्यक्त होणारा शुभसंकल्प सामाजिक सद्भाव टिकवून ठेवणारा ठरला आहे. दिवाळीपेक्षाही होळीचा सण अधिक उत्साहात साजरा करून एका सशक्त परंपरेला आकंठ प्रवाहित ठेवण्याचं काम होत आलेलं आहे. वर्षाच्या अखेरीला येणारा हा एकमेव सण म्हणजे वर्षभरातल्या अनेक चुकांना किंवा मतभेदांना मूठमाती देण्यासाठी निमित्त ठरते. म्हणजेच विज्ञान युगातही मनाच्या आरोग्यासाठी आवश्यक असलेली ही सणपरंपरा भौतिक साधनांपेक्षाही समाधानाचं मोठं धन देणारी ठरते. हेच सामाजिक संस्कृतीचे फार मोठे निदर्शक ठरते.

**समाजाची स्वयंस्फूर्तता**

सर्वात महत्त्वाचा भाग असा आहे की, जवळपास सगळेच सण हे आपापल्या घरात किंवा सार्वजनिक स्वरूपात स्वयंस्फूर्तीने साजरे होतात. परंपरेने चालत आलेले नियम पाळून या सणवारांची रचना होते, व्यवस्था होते. सामाजिक स्तरावरची ही स्वयंस्फूर्तता अधिक उत्साह निर्माण करते. होळीलासुद्धा लाकडे गोळा करण्यापासून ते दुसऱ्या दिवशींच्या धुळवड किंवा रंगपंचमीपर्यंत या सणाच्या विविध रंगछटा व्यक्त होत असतात. व्यक्तिगत स्तरावर मनुष्यजन्माची ईश्वरी देणगी तितक्याच सन्मानाने जपण्याचे सण हे अतिशय प्रभावी माध्यम ठरले आहे. चाकोरीबद्ध आयुष्य हे निरस आणि नैराश्य निर्माण करणारे ठरते. त्यातही विकृतीचे लवकर अनुकरण करणारा मानवी स्वभाव जपायचा असेल तर अशा प्रकारची सणसंस्कृती अत्यंत मोलाची ठरते. यानिमित्ताने कौटुंबिक किंवा सामाजिक स्तरावर एकत्र येण्याची एक विलक्षण प्रक्रिया सहजपणे घडून येते. अगदी एकमेकांची ओळखपाळख नसताना होळीसाठी एकत्र येणारे लोक म्हणजे नैसर्गिकरित्या मानवी स्वभावाला प्रगल्भ करून जातात. ही गोष्ट खरी आहे की, काळाच्या ओघात अशा सणांचा गैरअर्थ काढून गैरवर्तन करण्याचेही प्रकार होत आहेत. या काळात काही ठिकाणी होणारी व्यसनाधिनता दुर्दैवीच म्हणावी लागते. परंतु होळीचा मूळ संदेश लक्षात घेतला तर वर्षाच्या अखेरीला या सर्वच वाईट विचारांची अखेर करायची त्याला निरोप देऊन चैत्रापासून सुरू होणाऱ्या नववर्षाचे स्वागत करायचे. म्हणजेच आपल्याच आयुष्याकडे तटस्थपणे पाहून त्याचा ताळेबंद किंवा लेखाजोखा घेता येत असतो.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

संवादात होणारी सर्वात मोठी चूक म्हणजे आपण समजून घेण्यासाठी ऐकत नाही तर उत्तर देण्यासाठी ऐकतो.

## पंचांग

**सोमवार, ०२ मार्च २०२६**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**



*** फाल्गुन शुक्ल चतुर्दशी**
**नक्षत्र - आश्लेषा**

**-: जन्मराशी :-**
००-०१ ते ०७-५१ **कर्क**
०७-५२ ते २४-०० **सिंह**

**रवी उदय- ०६-५९**
**रवी अस्त- १८-४३**

**हुताशनी पौर्णिमा, होळी; होलिका प्रदीपन,**
**संत दामाजी पुण्यतिथी-मंगळवेढे; श्री दत्त महाराज कवीश्वर पुण्यतिथी**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande**
On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### व्हेज बिर्याणी

**साहित्य:-**
३,४ जणांसाठी, १/२ किलो तांदूळ आंबे मोहर, १ वाटी बारीक चिरून भाजी -, फ्लॉवर, बटाटा, कांदा, सिमला मिरची, श्रावण घेवडा, १/२ वाटी काजू, १ पातळ चिरलेला कांदा, २ चमचे तूप, २ तेज पान,१ चक्री फुल,२ वेलची, ५-७ मिरे, दालचिनी तुकडा लवंग, २ मोठे चमचे दही, ५० ग्रॅम पनीर, २ चमचे हळद, २ चमचे तिखट, चमचे काळा मसाला, २ चमचे धने जिरे पावडर, २ पळी तेल, मीठ चवीनुसार, १ वाटी कांदा पेस्ट, १ चमचा किसलेले आले

**कृती :-**
तांदूळ स्वच्छ पाण्याने धुऊन घ्या. थोडा वेळ पाण्यात ठेवावे. मसाल्याचे पदार्थ तयार ठेवा. सर्व भाज्या, पनीर चिरून काप करून घ्या. भाज्यांना वरील सर्व मसाले दही एकत्र करून घ्या. सर्व नीट चमच्याने मिक्स करावे. मीठ थोडेच घालावे. हे भाज्यांचे मिश्रण झाकून ठेवावे. (आपण हे १ तास आधीच



तयार करून ठेवावे), भांड्यात तेल घालून गरम करून त्यात कांदा, काजू तळून घ्यावेत. बाजूला काढून ठेवावे. मोठ्या भांड्यात तूप घालून गरम करायला ठेवावे. तूप गरम झाले की, त्यात तेजपाल, चक्री फुल, मिरे, दालचिनी, लवंग घालून परतून घ्यावे. त्यात आता धुतलेले तांदूळ घालावे. गरम पाणी घालून भात अर्धवट शिजवावा.झाकण ठेवावे. दुसऱ्या भांड्यात तेल गरम करून त्यात कांदा पेस्ट किसलेला आद्रक घालून परतून घ्यावे. आत्ता सर्व **marinate** केलेली भाजी घालावी. थोडे पाणी घालून भाजी शिजवावी. झाकण ठेवावे. तेल सुटू लागेल तेव्हा गॅस बंद करावा.

# ऑस्ट्रेलियाचा भारतीय महिलांना ३-० ने क्लीन स्वीप

## एलिसा हिलीचा शतकासह क्रिकेटला अखेरचा निरोप

**होबार्टच्या बेलेरिव्ह ओव्हल मैदानावर आज ऑस्ट्रेलिया महिला संघाविरुद्ध खेळल्या गेलेल्या एकदिवसीय मालिकेतील तिसऱ्या आणि शेवटच्या सामन्यात भारतीय महिला संघाला १८५ धावांनी पराभव स्वीकारावा लागला. या विजयासह ऑस्ट्रेलियाने मालिकेत भारताला ३-० ने क्लीन स्वीप दिली. प्रथम फलंदाजी करताना कर्णधार एलिसा हिली आणि बेथ मुनी यांनी शानदार शतके ठोकल्यामुळे ऑस्ट्रेलियाने ५० षटकांत ७ बाद ४०९ धावांची मोठी धावसंख्या उभारली. या सामन्यात हिलीने क्रिकेटला अरवेरचा निरोप दिला**



■ होबार्ट

या प्रत्युत्तरात भारताला २२४ धावांपर्यंत मजल मारता आली. परिणामी भारतीय महिला संघ ऑस्ट्रेलियाविरुद्ध एकदिवसीय मालिका जिंकण्यात सलग १२ व्यांदा अपयशी ठरला. भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. मात्र हा निर्णय पूर्णपणे चुकीचा ठरला. एलिसा हिलीने सुरुवातीपासून भारतीय गोलंदाजांची धुलाई सुरू केली. तिची साथीदार फोबी लिचफिल्ड १४ धावा करून बाद झाल्यानंतर तिने धावगती कमी होऊ दिली नाही. त्यानंतर तिला जॉर्जिया व्होलने चांगली साथ दिली. त्यांनी संघाची धावसंख्या २१ षटकांत १३६ वर पोहोचवली. मात्र जॉर्जिया ५२ चेंडूंत ६२ धावा करून स्नेह राणाच्या गोलंदाजीवर झेलबाद झाली. त्यानंतर बेथ मूनी आणि एलिस हिली यांची जोडी चांगलीच जमली आणि भारतीय गोलंदाजांनी सळो की पळो केले. हिलीने ७९ चेंडूंत शतक पूर्ण केले. त्यानंतर तिने आणखी आक्रमक फलंदाजी केली. त्यामुळे ऑस्ट्रेलियाची धावसंख्या ३६.२ षटकांत २ बाद २८१ वर नेली. मग पुढील चेंडूवर स्नेह राणाने एलिसा हिलीचा त्रिफळा उडवला. हिलीने ९८ चेंडूंवर २ षटकार आणि २७ चौकारांसह १५८ धावा केल्या. मग ॲनाबेल सदरलँड २३, गार्डनर ४, ताहलिया मॅकग्रा २, जॉर्जिया वेअरहॅम १ धावा करून बाद झाली. मात्र मुनीने दुसऱ्या बाजूने फटकेबाजी सुरुच ठेवली. त्याने ८२ चेंडूंत १०० धावा पूर्ण केल्या. त्यामुळे ऑस्ट्रेलियाने ७ बाद ४०९ धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना एकाही भारतीय फलंदाजाने अर्धशतक झळकावले नाही. या सामन्यात भारताकडून स्नेह राणाने सर्वाधिक धावा केल्या. तिने ७४ चेंडूंत ४४ धावांची खेळी केली. जेमिमा रॉड्रिग्जने २९ चेंडूंत ४२ धावांची खेळी केली. त्यामुळे भारताला २२४ धावा केल्यामुळे ऑस्ट्रेलियाचा १८५ धावांनी विजय झाला.

## परेलमध्ये शनिवारी बुद्धिबळ स्पर्धा

■ मुंबई

**आनंदराव** अडसूळ चॅरिटेबल ट्रस्ट व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी-ग्रुपतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त ज्येष्ठ समाजसेविका स्व. मंगलताई अडसूळ स्मृती चषक ८,११,१४ वर्षांखालील मुलामुलींच्या स्वतंत्र एकूण ६ वयोगटामध्ये जलद बुद्धिबळ स्पर्धा ७ मार्च रोजी दुपारी २ वा. परेलच्या आरएमएमएस वातानुकूलीन सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. प्रत्येक वयोगटात २० बक्षिसे असून एकूण १२० पुरस्कार दिले जाणार आहेत.

को-ऑपरेटिव्ह बँक एम्प्लॉईज युनियन व मुंबई शहर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या सहकार्याने ही स्पर्धा स्विस लीग पध्दतीच्या किमान ४ फेऱ्यांमध्ये रंगणार आहे. प्रत्येक साखळी फेरी १५ मिनिटे अधिक ३ सेकंद इन्क्रिमेंटची राहील. संयोजकांतर्फे स्पर्धकांना बुद्धिबळ पट व घड्याळ दिली जाणार आहेत. प्रत्येक गटातील प्रथम पुरस्कार विजेत्या स्पर्धकांच्या मातांचा देखील सन्मान होणार आहे. स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या खेळाडूंनी प्रवेश अर्जासाठी अथवा अधिक माहितीसाठी संयोजक प्रमोद पार्टे अथवा मुंबई शहर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे सेक्रेटरी राजाबाबू गजेंगी यांच्याकडे ३ मार्चपर्यंत संपर्क साधावा.

## पीएम बाथ कॅरम स्पर्धेत कोळी व चिपळूणकर उपांत्य फेरीत

■ मुंबई

**मुंबई** जिल्हा कॅरम असोसिएशनच्या मान्यतेने पी. एम. हिंदू स्विमिंग बाथ अँड बोट क्लब, चर्नी रोड येथे सुरू असलेल्या मुंबई जिल्हा मानांकन कॅरम स्पर्धेच्या पुरुष एकेरी गटाच्या उपउपांत्य लढतीत मुंबई महापालिकेच्या भरत कोळीने ओएनजीसीच्या संदीप देवरूखकरला १९-२१, २५-९ व २५-६ असे हरवून उपांत्य फेरीत प्रवेश केला. तर दुसऱ्या उपउपांत्य लढतीत ए. के. फाऊंडेशनच्या नीलांश चिपळूणकरने डीकेसीसीच्या सिद्धांत वाडवलकरवर ३ सेटपर्यंत चालेल्या रंगतदार लढतीत १४-२०, २१-१६, २५-१६ अशी मात करून आपले उपांत्य सामन्यातील स्थान पक्के केले.

पुरुष एकेरी उपउपांत्य फेरीत इंडियन ऑईलच्या महम्मद घुफ्रानने सलमान



खानवर २४-१२, २५-६, मुंबई महापालिकेच्या विकास धारियाने दिलेस खेडेकरवर २५-१५, २५-८ असा विजय मिळत उपांत्य फेरीत धडक मारली. महिला एकेरी उपउपांत्य फेरीत मिताली पाठकने नेहा कुमारीवर २५-१, २५-०, अंजली सिरीपुरमने रोझिना गोदादवर २५-०, २५-१०, ऐशा साजिद खानने गौरी सावंतवर २५-०, २५-०, सोनाली कुमारीने शैला जाधववर २५-०, २५-० असा विजय मिळवला आणि उपांत्य फेरीत प्रवेश मिळवला.

## रा. फ. नाईक शाळेला हिंद ट्रॉफी स्पर्धेत दुहेरी मुकुट

■ मुंबई

**वडाळ्यातील** शारीरिक शिक्षण मंडळाच्या मैदानावर झालेल्या हिंद ट्रॉफी स्पर्धेतील मुलांच्या आणि मुलींच्या गटात रा. फ. नाईक शाळेने अव्वल स्थान मिळवत दोन्ही ट्रॉफीवर आपले नाव कोरले.

या शाळेतील मुलींच्या संघाने राणी लक्ष्मीबाई हिंद ट्रॉफी जिंकली तर मुलांच्या संघाने टोपीवाला हिंद ट्रॉफी पटकावली.



या स्पर्धेतील कबड्डी मुली गटाच्या अंतिम सामन्यात रा. फ. नाईक आणि आंध्र एज्युकेशन सोसायटी यांच्यात लढत झाली. त्यात रा. फ. नाईक संघाने आंध्र एज्युकेशन सोसायटीवर २०-१७ ने विजय मिळवून अंतिम सामना जिंकला. मुलींच्या खो-खो अंतिम फेरीत रा. फ. नाईक शाळा आणि वांद्र्याच्या महात्मा गांधी विद्यालय भिडले. त्यात रा. फ. नाईक शाळेने महात्मा गांधी विद्यालयावर १२-७ गुणांनी विजय मिळवला.

लंगडी मुलींच्या गटात अंतिम सामन्यात श्री गणेश विद्यालय मराठी माध्यमाने श्री गणेश विद्यालय इंग्रजी माध्यमावर ३२-९ गुणांनी विजय मिळवला. मुलांच्या कबड्डी अंतिम सामन्यात रा. फ. नाईक संघाने श्री गणेश विद्यालयावर ५२-२६ गुणांनी विजय मिळवला.

## श्रीलंकन प्रशिक्षकपदावरून जयसूर्या पायउतार होणार

■ कोलंबो

**आयसीसी** टी-२० विश्वचषकामध्ये श्रीलंकन संघाच्या खराब कामगिरीनंतर श्रीलंकेचे माजी क्रिकेटपटू आणि संघाचे मुख्य प्रशिक्षक सनथ जयसूर्या यांनी आपल्या पदावरून पायउतार होण्याचा निर्णय घेतला. पाकिस्तानविरुद्ध निसटता पराभव झाल्यानंतर जयसूर्या यांनी स्पष्ट केले की, माझा मुख्य प्रशिक्षकपदाचा करार



जून २०२६ पर्यंत आहे. मात्र मला वाटते की, आता ही जबाबदारी दुसऱ्या कोणाला तरी सोपवण्याची योग्य वेळ आली. मी २ महिन्यांपूर्वी इंग्लंड मालिकेदरम्यानच ठरवले होते की, मी जास्त काळ या पदावर राहणार नाही.

## चेन्नईच्या नव्या जर्सीचे अनावरण

■ चेन्नई

आयपीएल हंगामापूर्वी चेन्नई सुपर किंग्जने नवीन जर्सी अनावरण केली. याबाबतचा व्हिडिओ अनावरण फ्रँचायझीने पोस्ट केला. या व्हिडिओमध्ये कर्णधार ऋतुराज गायकवाड, सरफराज खान आणि आयुष म्हात्रे अभिनय करताना दिसत आहेत. त्यानंतर गायकवाड बॅगमधून जर्सी काढतो. या जर्सीवर महेंद्रसिंग धोनीचे नाव आणि त्याचा आवडता क्रमांक ७ मागे छापलेला आहे. त्यानंतर धोनीची एन्ट्री शानदार आहे. व्हिडिओमध्ये धोनी प्रथम बाईक चालवताना आणि नंतर कारमध्ये जाताना दिसत आहे.

आयपीएल लिलावासाठी चेन्नईने आपल्या संघात अनेक नवीन खेळाडूंचा समावेश केला. चेन्नईने प्रशांत वीरला १४.२० कोटी रुपयांना आणि कार्तिक शर्माला १४.२० कोटी रुपयांना विकत घेतले. याव्यतिरिक्त संघाने सरफराज खानला ७५ लाख रुपयांना आणि राहुल चहरला ५.२० कोटी रुपयांना विकत घेतले. लिलावापूर्वी एक मोठे पाऊल उचलत संघाने रवींद्र जडेजाच्या बदल्यात संजू सॅमसनला राजस्थान रॉयल्सकडे सोपवले.

## भैरवनाथ मंडळ आणि गुड मॉर्निंग स्पोर्ट्सला विजेतेपद

■ मुंबई

**भैरवनाथ** मंडळाने स्पर्श फाऊंडेशनने आयोजित केलेल्या तृतीय श्रेणी पुरुषात विजेतेपद पटकाविले. १४ वर्षांखालील गटात हा मान गुड मॉर्निंग स्पोर्ट्सने मिळविला. लोअर परेल येथील मॅरेथॉन मैदान येथे संपन्न झालेल्या तृतीय श्रेणी पुरुषांच्या अंतिम सामन्यात भैरवनाथ मंडळाने श्री दत्त मंडळावर ३२-०६ अशी सहज मात करीत स्वर्गीय सामनाधिकारी चषकावर आपले नाव कोरले.

आक्रमक खेळ करत लोण




देत भैरवनाथने विश्रांतीला १५-०५ अशी भक्कम आघाडी घेतली. दुसऱ्या डावात त्याच तडफेने खेळ करीत श्री दत्तला पुरते नामोहरण केले. तन्मय कदम, सतीश जाधव यांच्या चढाई पकडीच्या झंझावाती खेळाला या विजयाचे श्रेय जाते. श्री दत्तचा शिवम रायभान बरा खेळला. १४ वर्षांखालील गटाच्या अंतिम सामन्यात गुड मॉर्निंग स्पोर्ट्सने सार्थ बागडे, शिव शर्मा, श्रेयस यादव यांच्या चतुरस्त्र खेळाने श्री संस्कृती मंडळावर ४७-२८ अशी मात करीत स्वर्गीय सामनाधिकारी चषक मिळविला. संस्कृतीचा सचिन तिवारीने एकाकी लढत दिली. भैरनाथचा तन्मय कदम तृतीय श्रेणी गटातील स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरला. सतीश जाधव (भैरवनाथ), शिवम रायभान (श्री दत्त) स्पर्धेतील उत्कृष्ट पकड व चढाईचे खेळाडू ठरले. या सर्वांना चषक देऊन सन्मानित करण्यात आले. १४ वर्षांखालील गटात गुड मॉर्निंगचा सार्थक बागडे स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरला.



होलिका दहन आणि पूजा करण्याचे महत्त्व पुराणातसुद्धा आहे. होळीला नारळ अर्पण करून नैवेद्य दाखवतात. महाराष्ट्रात पुरणपोळीचा नैवेद्य दाखविण्याची परंपरा आहे. गावच्या ठिकाणी होळीनंतर ५ दिवसांनी रंगपंचमी हा सण साजरा केला जातो. हिंदू पंचांगानुसार होळी फाल्गुन महिन्याच्या पौर्णिमेला साजरी केली जाते. फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी येणारा होळी हा सण भारतामध्ये, विशेषत: उत्तर भारतामध्ये उत्साहाने साजरा होणारा एक सण आहे. दोन दिवस साजरा केल्या जाणाऱ्या या सणात पहिल्या दिवशी होलिका दहन तर दुसऱ्या दिवशी धुलिवंदन अर्थात होळी खेळतात. होळी या उत्सवाला होळी पौर्णिमा, होलिकोत्सव, होलिकादहन, अशी विविध नावे आहेत. कोकणात शिमगो म्हणतात. होळी जीवनातील काही संकटांवर मात करण्यासाठी श्रेष्ठ सण असल्याचे मानले गेले आहे. या दरम्यान काही उपाय करून संकटांना मात करता येते.

# सुख शांती समाधान

## होळीला हे उपाय करा...

'होळी रे होळी पुरणाची पोळी'..! असे आजही आवर्जून म्हटले जाते. होलिका दहन हे अध्यात्मिक दृष्टीने महत्त्वाचे आहे. भाविक एकत्र येऊन होलिका दहन करतात. प्रल्हाद आणि होलिकाच्या प्राचीन आख्यायिकेचे स्मरण करण्यासाठी पवित्र अग्नि पेटवतात. हा विधी भक्ती आणि सद्गुणांच्या विजयाचे प्रतिनिधित्व करतात. ही परंपरा आपल्याला आठवण करून देते की, श्रद्धा आणि चांगुलपणा नेहमीच अहंकार आणि द्वेषावर विजय मिळवतात.

२०२६ या वर्षामध्ये चंद्रग्रहण ३ मार्च रोजी दुपारी ३.२० वाजता सुरू होईल आणि सायंकाळी ६:४७ पर्यंत ते राहील. ज्योतिषशास्त्रानुसार, ग्रहणापूर्वी सकाळी ६.२० पासून सुतक काळ सुरू होईल आणि ग्रहण संपेपर्यंत त्याचा प्रभाव राहील. ग्रहणाच्या वेळेत भारतातील दिल्ली, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि पूर्वोत्तर राज्यांमध्ये सुमारे ३०-३५ मिनिटे ग्रहण दृश्य असेल. या परिस्थितीत मंदिरांची कपाटे बंद राहतील आणि पूजापाठ करणाऱ्यांवर दोष लागू होण्याची शक्यता असते, असे मानले जाते.

होलिका दहनाचा शुभ मुहूर्त काही पंचांगांनुसार ३ मार्च सकाळी ६.४८ ते ८.५० पर्यंत आहे; तर काही पंचांगांनुसार २ मार्चच्या पौर्णिमेच्या प्रदोष काळात होलिका दहन करण्याचे निर्देश आहेत. मात्र, २ मार्चच्या रात्री भद्राचा प्रभाव राहील. ज्योतिषशास्त्रज्ञांच्या मते, भद्र आणि सुतक यांचा विचार करूनच होलिका दहन आणि होळी पूजन केले पाहिजे. होलिका दहन विधी रात्रीच्या वेळी अग्नि पेटवून केला जातो, जो नकारात्मकतेचे शुद्धीकरण आणि सकारात्मकता आणि समृद्धी आणण्याचे प्रतीक आहे. कुटुंबे आणि समुदाय वाईट प्रभावांपासून आशीर्वाद आणि संरक्षण मिळविण्यासाठी अग्नीभोवती जमतात.

होलिका दहन पूजा करण्याची विधी- लाकूड, वाळलेली पाने आणि शेणाच्या गोळ्यांचा ढीग मोकळ्या जागेत ठेवला जातो, जो होलिकाचे प्रतीक आहे. अग्नि पेटवण्यापूर्वी, भक्त तीन किंवा सात वेळा लाकडाच्या ढिगाऱ्याला पांढऱ्या पवित्र धाग्याने गुंडाळतात, जे संरक्षण आणि पावित्र्य दर्शवते.

पवित्र पाणी (गंगाजल), कुंकू, फुले आणि हळदीने अग्नीची पूजा केली जाते, ज्यामुळे दैवी आशीर्वाद मिळतो.

वाईटावर चांगल्याचा विजय दर्शविणारे पवित्र स्तोत्रे आणि मंत्र जपताना अग्नि प्रज्वलित केला जातो.

हिरवे धान्य, गव्हाचे अंकुर आणि नारळ अग्नीत भाजले जातात, जे नंतर कुटुंब आणि मित्रांमध्ये प्रसाद म्हणून वाटले जातात.

भाविक आनंद, समृद्धी आणि नकारात्मक उर्जेपासून संरक्षणासाठी प्रार्थना करताना अग्नीभोवती फिरतात.

गंगाजल किंवा शुद्ध पाणी, गाईच्या गोवऱ्याची माळ, अक्षता (अखंड तांदूळ), फुले, कुंकू आणि मोळी, गूळ, हळद, मूग डाळ, बताशे, गुलाल, नारळ, गव्हाचे कणसे,

होलिका दहन हा विधी योग्य आणि आदराने पार पडावा यासाठी काही पद्धती पाळल्या पाहिजेत, तर काही टाळल्या पाहिजेत.

होलिका दहन मुहूर्ताच्या वेळी त्याचे अध्यात्मिक फायदे जास्तीत जास्त व्हावेत यासाठी विधी करा. खुल्या जागेत शेकोटी पेटवली जाईल आणि त्यामुळे धोका निर्माण होणार नाही याची खात्री करा.

शुद्ध हेतूने प्रार्थना करा आणि समृद्धी, आनंद आणि संरक्षणासाठी आशीर्वाद मागा.

कुटुंब आणि मित्रांसोबत सद्भावना आणि आशीर्वादाचे प्रतीक म्हणून भाजलेला प्रसाद वाटून घ्या. शेकोटीभोवती परिक्रमा करताना विष्णू मंत्र आणि प्रार्थना म्हणा.

अग्नीत प्लास्टिक किंवा हानिकारक पदार्थांचा वापर टाळा. कारण ते अनादरकारक आणि पर्यावरणाला धोकादायक आहे. विधी दरम्यान भांडण करू नका किंवा नकारात्मक वर्तन करू नका. कारण हा एकता आणि सकारात्मकतेचा काळ आहे.

पूजेदरम्यान काळा किंवा अशुभ रंग घालणे टाळा.

पवित्र भेटवस्तूंचा अनादर करू नका आणि पूजा शुद्धता आणि भक्तीने केली जाईल याची खात्री करा.

होळीच्या दुसऱ्या दिवशी धुळवड असते. या दिवशी सर्वजण रंगांची उधळण करतात.

होळी दहनादिवशी पुढील काही उपाय करावेत-

- होलिका दहनाच्या दिवशी सकाळी अंघोळ करण्यापूर्वी अंगाला उटणे लावा आणि त्यातून निघालेल्या मळाची गोळी ठेवा आणि पूजा करताना ती होलिकेत जाळून टाकावी. यामुळे शरीरातील आजार दूर होतात आणि आरोग्य सुधारते.
- एका विड्याच्या पानावर तुपात भिजवलेल्या २ लवंगा, १ बत्ताशा ठेवावा. ही सर्व सामग्री होळीमध्ये दहन केल्याने यामुळे घरात कायम सुख समृद्धी राहील.
- होळीच्या निमित्ताने कोणत्याही व्यक्तीबद्दल मनात शत्रुत्वाची भावना ठेवू नका. हा बंधुभाव आणि आपुलकीचा सण आहे. या दिवशी घरात येणाऱ्या पाहुण्यांना एका जातीची बडीशेप आणि साखरेची मिठाई खायला द्या. त्यामुळे प्रेमाची भावना वाढते.
- होळीच्या रात्री मोहरीच्या तेलाचा चौमुखी दिवा घराच्या मुख्य प्रवेशद्वाराबाहेर लावून त्याची पूजा करावी. त्यानंतर लक्ष्मी नारायणांना सुख समृद्धीसाठी प्रार्थना करावी. या उपायामुळे धनहानी थांबते.
- होळीच्या सणाच्या दिवशी घराची नीट स्वच्छता करावी आणि भगवान विष्णूच्या नरसिंह अवताराची पूजा करावी.

## रंगपंचमीला हे करा...

रंगपंचमीच्या दिवशी भगवान विष्णू आणि माता लक्ष्मीची दोघांची एकत्र पूजा करावी आणि लक्ष्मी बीज मंत्र 'ॐ श्रीं श्रीये नमः' किंवा कनकधारा स्तोत्राचा पाठ करावा. यामुळे आर्थिक कमतरता दूर होते आणि जीवनात धनधान्याची प्राप्ती होते.

रंगपंचमीच्या दिवशी देवी लक्ष्मीला खीर, साखर, मिठाई, श्रीखंड इत्यादी पांढऱ्या वस्तू अर्पण कराव्यात. भोग अर्पण केल्यानंतर प्रथम घरातील ज्येष्ठ महिलेला प्रसाद द्यावा आणि नंतर प्रसाद संपूर्ण घरामध्ये व आजूबाजूला वाटावा. असे केल्याने अडकलेले पैसे मिळतात. या दिवशी भगवान विष्णू आणि माता लक्ष्मी यांना गुलाब किंवा कमळाचे फूल अर्पण करून त्यांचे ध्यान करावे. असे केल्याने आर्थिक चणचण दूर होण्यास मदत होते.








## होळीच्या पौराणिक कथा

लहान मुलांना पीडा देणाऱ्या होलिका, ढुंढा, पुतना ह्यांसारख्या राक्षसींच्या दहनांच्या कथांमधे ह्या उत्सवाच्या परंपरेचा शोध काही लोक घेतात. एका पौराणिक कथेनुसार भगवान विष्णूचा भक्त असलेल्या प्रल्हादाला मारण्यासाठी हिरण्यकश्यपूने धाडलेल्या होलिकादेवतेचा श्रीविष्णू देवाने वध केला होता. होलिकेला वर होता की तिला अग्नि जाळू शकणार नाही. परंतु प्रल्हादाला जाळण्यासाठी तिने त्याला मांडीवर घेऊन अग्निकुंडात प्रवेश केला. प्रल्हाद बचावला व होलिकेचे दहन झाले अशी आख्यायिका प्रचलित आहे. अशाप्रकारे, हिंदूंच्या इतर सणांप्रमाणे होलिका दहनदेखील वाईटावर चांगल्याचा विजयाचे चांगले प्रतीक आहे. वाईट गोष्टींवर विजय मिळवणे ही या सणाची व्याख्या आहे. राधा आणि कृष्ण यांच्या प्रेमाचे वर्णन असणारे होळी सणाचे संदर्भ दिसून येतात. गर्ग संहिता या ग्रंथात कृष्णाने होळी साजरी केल्याचा उल्लेख आहे असे मानले जाते. होळीच्या जोडीने रंग उधळून राधा, गोपी यांनी कृष्णासह रंगाचा उत्सव साजरा केला, अशीही आख्यायिका प्रचलित आहे.



टीप- या लेखात सांगितलेले उपाय, सल्ले हे केवळ धार्मिक श्रद्धांवर आधारित असून दै. 'नवाकाळ' त्याचे समर्थन करत नाही.

# आमदार धस धमकीप्रकरणी पोलिसांकडे लेखी निवेदन

■ बीड

**मराठा** आंदोलक नेते मनोज जरांगे-पाटील आणि आष्टी मतदारसंघाचे भाजपा आमदार सुरेश धस यांना फेसबुकवरील पोस्टद्वारे धमकी दिल्याचा आरोप परळी येथील व्यक्तीवर करण्यात आला आहे. परळीचे आमदार धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय आणि परळी बाजार समितीचे माजी सभापती गोविंद फड यांनी ही पोस्ट केल्याचे सांगितले जात आहे.

या प्रकरणी भाजपा प्रमुख व माजी सरपंच अनिल ढोबळे यांनी गोविंद फड यांच्या विरोधात कडा पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली आहे. संबंधित व्यक्ती परळी येथील रहिवासी असून, त्यांच्यावर गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. आमदार धस यांच्या समर्थकांनी कडा पोलीस ठाण्यात जाऊन लेखी निवेदन दिले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सोशल मीडियावर टाकण्यात आलेल्या पोस्टमुळे आमदार धस यांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे अशा प्रकारांवर तत्काळ कारवाई करून संबंधित व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदवावा आणि कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.



# इंग्रजीची उत्तरपत्रिका सोडवून आणल्या अमरावतीत दोन अधिकारी अटकेत

■ अमरावती

**अमरावती** जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी येथे दहावीच्या इंग्रजी विषयाच्या दोन उत्तरपत्रिका बाहेरून सोडवून आणल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी गटशिक्षण अधिकारी आणि विस्तार अधिकारी शिक्षण या दोन अधिकाऱ्यांना पोलिसांनी अटक केली आहे. या घटनेमुळे राज्याच्या शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

२७ फेब्रुवारी रोजी दहावीचा इंग्रजी विषयाचा पेपर पार पडत असताना उत्तरपत्रिका बाहेरून सोडवून आणल्याची बाब उघडकीस आली. हा पेपर सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत झाला होता. त्यानंतर अमरावतीच्या उपशिक्षण अधिकाऱ्यांच्या भरारी पथकाने दुपारी साडेतीनच्या सुमारास अंजनगाव सुर्जी येथील सीताबाई संगई विद्यालय येथील पेपर संकलन केंद्रावर धाड टाकली. तपासणीदरम्यान त्या दिवशी परीक्षेला किती विद्यार्थी बसले आणि किती उत्तरपत्रिका जमा झाल्या याची पडताळणी करण्यात आली. त्यावेळी विद्यार्थ्यांच्या संख्येच्या तुलनेत एक इंग्रजी आणि एक उर्दू विषयाची अशा दोन उत्तरपत्रिका कमी आढळून आल्या. याबाबत गटशिक्षण अधिकारी सुधीर खोडे आणि विस्तार अधिकारी सुनील अभ्यंकर यांना विचारणा करण्यात आली. पण त्यांना समाधानकारक उत्तर देता आले नाही. त्याच वेळी पेपर कस्टडी सेंटरमध्ये एक संशयित व्यक्तीही आढळून आली. या प्रकरणी गटशिक्षण अधिकारी सुधीर खोडे, विस्तार अधिकारी सुनील अभ्यंकर, हमाल अनिल हाडोळे तसेच दोन अज्ञात विद्यार्थ्यांविरुद्ध अंजनगाव सुर्जी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी गटशिक्षण अधिकारी सुधीर खोडे आणि अनिल हाडोळे यांना ताब्यात घेतले.


### Lost and Found

I have lost my **share certificate No. 43, Allotment Letter & Tax Receipt** for my property Flat No. 709, 7th Floor, A-Wing, **Ghatkopar Sahayadri Nagar CHS Ltd.**,90 Feet Road, Near Ganesh Mandir, Ghatkopar (East), Mumbai, Maharashtra - 400075. If anybody found mentioned documents please return on below Address

Sd/-
Achchholal Arjun Yadav
Mobile : 8416813460

Flat No. 709, 7th Floor, A-Wing, Ghatkopar Sahayadri Nagar CHS Ltd.,90 Feet Road, Near Ganesh Mandir, Ghatkopar (East), Mumbai, Maharashtra - 400075.

### सार्वजनिक सूचना

याद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की श्री. जावेद कुरेशी यांचा जन्म दिनांक 13/03/1986 रोजी बिल्डिंग क्रमांक N - 15/C, ग्राउंड फ्लोअर, रूम क्रमांक 2, चारनुल, डोंगरी, मुंबई – 400009 येथे झाला होता. मात्र त्यावेळी जन्म नोंद करण्यात आलेली नव्हती.

सदर जन्म नोंदणीबाबत कोणास काही हरकत असल्यास, या सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून 15 दिवसांच्या आत लेखी आक्षेप नोंदवावा.

**संपर्क: श्री. जावेद कुरेशी**
**मोबाईल: 09540919396**
**Qureshijaved61@gmail.com**

### नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अन्वये ई-लिलाव विक्री सूचना

### सी. महेंद्रा एक्सपोर्ट्स लिमिटेड (परिसमापनामध्ये)

नोंद. कार्यालय: टॉवर 'सी', कार्यालय क्र. सीसी-६०११, भारत डायमण्ड बोर्स, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.

सी. महेंद्रा एक्सपोर्ट्स लिमिटेड (परिसमापनामध्ये) च्या मालमत्तेची ई-लिलाव विक्री "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे आहे", "तेथे जे आहे तत्त्वावर" आणि "कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर" करण्यात येईल.

**ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ: शुक्रवार, २० मार्च, २०२६, स. ११.३० पासून दु. १२.३० पर्यंत**

| ब्लॉक | मालमत्ता | राखीव किंमत (रु.) | इसारा रक्कम अनामत (ईएमडी) (रु.) | बोली विस्तार मूल्य (रु.) |
|---|---|---|---|---|
| १. | ६१२ आणि ६१२-ए प्रसाद चेंबर्स, स्वदेशी मिल्स कंपाऊंड, ऑपेरा हाऊस, मुंबई -४००००४ येथील कार्यालय परिसर | ३,८०,००,००० | ३८,००,००० | ४,००,००० |
| २. | प्लॉट क्रमांक २६/९-ए आणि ए/२६/१०, उधना उद्योगनगर सहकारी संघ लिमिटेड, उधना, सुरत - ३९४२१०, गुजरात येथे स्थित जमीन, इमारत व त्यासह विविध प्लांट आणि यंत्रसामग्री (जमीन क्षेत्रफळ १२९६ चौरस मीटर; इमारत क्षेत्रफळ २४,१८३ चौरस फूट) | ७,३८,००,००० | ७३,८०,००० | ७,००,००० |
| ३. | सर्व्हे क्रमांक ४७४ व ४७६ गाव तिसंगी, तालुका: कवठे - महाकांळ, जि. सांगली - ४१६४०५, महाराष्ट्र येथे स्थित नापीक जमीन, काही अंशी जिरायत व सडा-पड जमीन. (सर्व्हे क्र. ४७४ - ५,९०० चौ. मीटर्स आणि सर्व्हे क्र. ४७६ - २२०० चौ. मीटर्स) | १४,८०,००० | १,४८,००० | १,००,००० |
| ४. | महसूल सर्व्हे नं. २८६/पी, गाव शिंदोडी मोती, तालुका - अबडासा, जिल्हा कच्छ-भुज, गुजरात - ३७०६४५ येथे भाडेतत्वावर दिलेली जमीन; मोजमाप १०,००० चौ.मीटर्स | १,६०,३८० | १६,०३८ | १०,००० |
| ५. | सी. महेंद्रा इंटरनॅशनल लिमिटेडचे समभाग (रु. १० चे पूर्णत: भरणा केलेले १,१२,८०० समभाग) | १०,००,००,००० | १,००,००,००० | १०,००,००० |

**ई-लिलावाच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणे:**

१. ई-लिलाव विक्री वेबसाईट https://ibbi.baanknet.com ("लिलाव पोर्टल") मार्फत बँकनेटद्वारे करण्यात येईल.
२. इच्छुक बोलीदारांनी त्यांचे इसारा रक्कम अनामत ("ईएमडी") लिलाव पोर्टलद्वारे दि. १९ मार्च, २०२६ रोजी सायं. ६.०० वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे.
३. संभाव्य बोलीदारांनी नादारी आणि दिवाळखोरी संकेताच्या कलम २९ए अन्वये पात्रतेची उद्घोषणा समाविष्ट असलेले आवश्यक दस्तऐवज फक्त लिलाव पोर्टलद्वारे सादर करावे. उच्चतम बोलीदाराची ईएमडी, प्रक्रियेदरम्यान कोणत्याही समयी अपात्र आढळल्यास जप्त करण्यात येईल.
४. मालमत्ता आणि लिलावाशी संबंधित सर्व शर्ती, अटी, माहिती प्रक्रिया ज्ञापनामध्ये देण्यात आले आहे आणि लिलाव पोर्टलवर उपलब्ध आहेत. माहिती / डेटा रूमची मागणी ईमेल आयडी: cirpcmel@gmail.com द्वारे पाठवावी लागेल.
५. इच्छुक बोलीदारांनी फक्त लिलाव पोर्टलद्वारे नोंदणी करावी, त्यांचे पात्रता दस्तऐवज, बोली अपलोड करावी आणि त्यांच्या बोलीची पुष्टी प्राप्त करावयाची आहे.
६. परिसमापक कोणतेही कारण न दर्शविता कोणतीही बोली स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे किंवा रद्द करण्याचे किंवा प्रक्रिया ज्ञापन/ई-लिलावाच्या कोणत्याही अटी आणि शर्ती सुधारित करण्याचे हक्क राखून ठेवीत आहेत. परिसमापक कोणतेही कारण न दर्शविता कोणत्याही समयी ई-लिलाव रद्द करण्याचे हक्क देखील राखून ठेवीत आहेत.

सही/-
दिनांक: ०२ मार्च, २०२६ | क्रिष्णा चमाडिया
ठिकाण: मुंबई | परिसमापक - सी. महेंद्रा एक्सपोर्ट्स लिमिटेड
आयबीबीआय नोंदणी क्रमांक: IBBI/IPA-001/IP-P00694/2017-18/11220


# संत एकनाथ साखर कारखान्यात घोटाळा!

## सचिन घायाळांवर गुन्हा

■ छत्रपती संभाजीनगर

**पैठण** तालुक्यातील श्री संत एकनाथ सहकारी साखर कारखाना येथे आधुनिकीकरण व विस्तारीकरणासाठी घेतलेल्या कर्जातील १६ कोटी ६२ लाख रुपयांच्या अपहाराचा गंभीर प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणी सचिन घायाळ शुगर प्रा. लि.चे संचालक व उबाठाचे नेते सचिन विक्रमराव घायाळ आणि त्यांच्या भागीदारांविरुद्ध एमआयडीसी पैठण पोलिस ठाणे येथे फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हा विशेष लेखापरीक्षणात निधीचा विनियोग उद्देशबाह्य झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

जिल्हा विशेष लेखापरीक्षक सुरेश पंडितराव काकडे यांच्या तक्रारीनुसार, संबंधित कंपनीने बुलढाणा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी कडून ३० कोटींचे कर्ज घेतले होते. त्यातील १३.१७ कोटी रुपये महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे जमा करण्यात आले. मात्र उर्वरित १६.६२ कोटी रुपये खासगी खात्यांकडे वळवण्यात आल्याचे लेखापरीक्षणात निष्पन्न झाले. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे.


### फॉर्म ए
### जाहीर उद्घोषणा

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (ऐच्छिक परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१७ च्या विनियमन १४ अन्वये)

**ट्रान्सओशन सपोर्ट सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता**

| | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट व्यक्तीचे नाव | ट्रान्सओशन सपोर्ट सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट व्यक्तीच्या स्थापनेचा दिनांक | ०७.०५.२००४ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट व्यक्तीची स्थापना/नोंदणीकरण झाले | कंपनी निबंधक, मुंबई। |
| ४. | कॉर्पोरेट व्यक्तीचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | U74120MH2004FTC146137 |
| ५. | कॉर्पोरेट व्यक्तीच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | वन बुलेव्हर्ड, कार्यालय क्र. ०२, ४था मजला, लेक बुलेव्हर्ड स्ट्रीट, हिरानंदानी बिझनेस पार्क, पवई, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००७६. |
| ६. | कॉर्पोरेट व्यक्तीचे परिसमापन सुरू होण्याचा दिनांक | २६ फेब्रुवारी, २०२६ |
| ७. | परिसमापकाचे नाव, पत्ता, ईमेल पत्ता, दूरध्वनी क्रमांक आणि नोंदणीकरण क्रमांक | श्री. प्रणव जे. दमानिया<br>IBBI/IPA-001/IP-P00079/2017-18/10164<br>पत्ता: ४०७, संजर एन्क्लेव्ह, मिलाप सिनेमासमोर, एस. व्ही. रोड, कांदिवली पश्चिम, मुंबई - ४०००६७.<br>ईमेल आयडी: pranav@winadvisors.co.in<br>संपर्क क्र.: +९१ ९८२०४ ६९८२५ |
| ८. | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | २८ मार्च, २०२६ |

याद्वारे सूचना देण्यात येते की, ट्रान्सओशन सपोर्ट सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडने दि. २६ फेब्रुवारी, २०२६ रोजी ऐच्छिक परिसमापन सुरू केले आहे.

ट्रान्सओशन सपोर्ट सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांना याद्वारे त्यांच्या दाव्यांचे पुरावे दि. २८ मार्च, २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी परिसमापक यांच्याकडे नोंद क्र. ७ मध्ये नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.

वित्तीय धनको (जर असल्यास) यांनी दाव्याबाबतचे त्यांचे दाव्यांचे पुरावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व भागधारक त्यांचे दाव्यांचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.

दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

सही/-
प्रणव दमानिया
एमजीएम प्रोग्रामिंग सर्व्हिसेस इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रकरणामध्ये परिसमापक
नोंद. क्र.: IBBI/IPA-001/IP-P00079/2017-18/10164
अभिहस्तांकनाकरिता प्राधिकृतता ("एएफए"): AA1/10164/02/300627/109139
एएफए वैधता: दि. ३० जून, २०२७
दिनांक : ०२.०३.२०२६
ठिकाण: मुंबई

### कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

**निविदा अधिसूचना**

उप मुख्य अभियंता (कार्य), कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा द्वारे सिंगल पॅकेट बिड प्रणाली अंतर्गत पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी खुल्या निविदा मागवित आहेत: **कामाचे नाव:** महाराष्ट्र राज्यातील कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील राजापूर रोड (आरएजेपी) स्थानकाच्या प्लॅटफॉर्म - 1 वर प्रवासी लिफ्टची तरतूद करणे. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-डिव्हायसीईडब्ल्यू-आरएजेपीएलआयएफटी-42ए. दिनांक: 02/03/2026 एकूण अंदाजित किंमत:** ₹60,19,537.60 (जीएसटी वगळून). बोली सुरू होण्याची दिनांक: 10/03/2026. **बंद होण्याची दिनांक/वेळ:** 24/03/2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाइन ऑफर/बोली सादर करण्यासाठी. **पूर्णत्व कालावधी:** 6 महिने. मॅन्युअल ऑफर स्वीकारल्या जाणार नाहीत. तपशील/सहभागासाठी कृपया https://www.ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या व दुरुस्तीपत्रक/परिशिष्ट केवळ याच संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.

### कामगारांसाठी जाहीर सुचना/नोटीस

या जाहिरातीद्वारे कळविण्यात येते की, **१. श्री. रश्मिन लालजी शाह, २. श्री. संदिप लालजी शाह ३. श्रीम. कोमल रश्मिन शाह व ४. श्रीम. कृपाली संदिप शाह, सी. टी. एस. नं. ४६/३०, फ्लॉट नं. १०, महल इंडस्ट्रिअल इस्टेट, महाकाली केव्हस रोड, अंधेरी, पुर्व, मुंबई ४०००९३.** सदर जागेवर मे. फ्ले पांडा ही आस्थापना कार्यरत होती. तथापि, सदरची आस्थापना सतत मंदित असल्यामुळे दि. ३१.०३.२०२५ रोजी बंद झालेली आहे. सदर जागेचे क्षेत्रफळ **१९६४.६१ चौ. मी.** असून तत्सम डिव्हीजन विलेपार्ले नगर भुमापन कार्यालयातील नोंदीनुसार मिळकतीचे मालक आहोत तसेच सदर मिळकतीचा विद्यमान वापर बदलुन मिळकत विकसित व विक्री करण्याचे आम्ही प्रस्तावित करीत आहोत. तरी देखील **१. श्री. रश्मिन लालजी शाह, २. श्री. संदिप लालजी शाह ३. श्रीम. कोमल रश्मिन शाह व ४. श्रीम. कृपाली संदिप शाह, सी. टी. एस. नं. ४६/३०, फ्लॉट नं. १०, महल इंडस्ट्रिअल इस्टेट, महाकाली केव्हस रोड, अंधेरी, पुर्व, मुंबई ४०००९३.** या आस्थापनेत पूर्वी काम केलेल्या सर्व कायम कामगार, कर्मचारी, तात्पुरते, कंत्राटी तसेच प्रशिक्षणार्थी कामगारांची व त्यांच्या संघटनेची कामगारांच्या कायदेशीर देण्याबाबत, विवादाबाबत दावे/तक्रारी जागेचे व्यवस्थापक व विकासकाच्या विरुद्ध असल्यास त्याबाबतची लेखी तक्रार कागदपत्रांच्या पुराव्यासहित कामगार उप आयुक्त मुंबई उपनगर (पश्चिम) यांचे कार्यालय, कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन, सी/२०, ई ब्लॉक, बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा (पुर्व), मुंबई - ४०००५१ यांच्याकडे जाहिर नोटीस/सुचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत सादर करावी. या कालावधीनंतर दाखल केलेली तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही, व त्यासंदर्भात आम्ही कायदेशीररित्या जबाबदार राहणार नाही.

स्थळ-मुंबई | सहि-
दिनांक-०२.०३.२०२६ | श्री. रश्मिन लालजी शाह

# चंदेरी चौगम

www.http://navakal.in | Email- contact@navakal.in
पुणे | सोमवार २ मार्च, २०२६




## 'हैवान'ची प्रदर्शनापूर्वीच ८० कोटींची कमाई

बॉलिवूडमधील दोन दिग्गज अभिनेते अक्षय कुमार आणि सैफ अली खान यांची मुख्य भूमिका असलेला आणि प्रियदर्शन यांच्या दिग्दर्शनाखाली साकारलेला 'हैवान' हा चित्रपट सध्या चित्रपटसृष्टीत चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. २०२६ मधील अत्यंत प्रतीक्षित चित्रपटांच्या यादीत असलेल्या या चित्रपटाने प्रदर्शनापूर्वीच आर्थिक गणिते जुळवत मोठी मजल मारली आहे. मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार, या चित्रपटाचे 'नॉन-थिएट्रिकल' हक्क म्हणजेच उपग्रह, डिजिटल आणि संगीत हक्क तब्बल ८० कोटी रुपयांना विकले गेले आहेत. या व्यवहारामुळे निर्मात्यांनी चित्रपटाच्या एकूण गुंतवणुकीपैकी ७० टक्क्यांहून अधिक रक्कम आधीच वसूल केली आहे. 'सोनी नेटवर्क'ने या चित्रपटाचे हक्क मिळवण्यासाठी सर्वाधिक बोली लावली होती. बाजारपेठेत या चित्रपटाची प्रचंड क्रेझ असून, अनेक मोठ्या कंपन्या हे हक्क मिळवण्यासाठी शर्यतीत होत्या. मात्र अखेर सोनी नेटवर्कने बाजी मारली. हा चित्रपट ऑगस्ट २०२६ मध्ये प्रदर्शित होण्याची शक्यता आहे. अक्षय कुमारच्या बाजारपेठेतील प्रतिमेला या व्यवहारामुळे पुन्हा एकदा मोठी बळकटी मिळाली आहे.

## सलमान खानचे दातृत्व



बॉलिवूडचा सुपरस्टार सलमान खान हा त्याच्या पडद्यावरील अभिनयासोबतच खऱ्या आयुष्यातील त्याच्या दानशूर स्वभावासाठीही ओळखला जातो. ज्येष्ठ अभिनेत्री सुधा चंद्रन यांनी एका मुलाखतीदरम्यान सलमान खानच्या माणुसकीचा एक हृदयस्पर्शी किस्सा सांगितला आहे. सुधा यांच्या मातोश्री जेव्हा कर्करोगाशी झुंज देत होत्या, तेव्हा सलमानने कोणत्याही प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता त्यांना मदतीचा हात दिला होता. सुधा सांगतात की, त्याकाळात सलमान खान स्वतःहून त्यांच्यापर्यंत पोहोचला आणि त्याने आवश्यक ते सर्व सहकार्य केले. विशेष म्हणजे, या मदतीबाबत त्याने कुठेही वाच्यता केली नाही किंवा प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न केला नाही. सलमानचे हे वागणे अत्यंत निःस्वार्थी होते, असे सुधा यांनी नमूद केले. संकटाच्या वेळी शांतपणे कोणाच्या पाठीशी उभे राहावे, हे सलमानकडून शिकण्यासारखे आहे, अशा शब्दांत त्यांनी त्याचे कौतुक केले. सलमानच्या 'बीईंग ह्युमन' या संस्थेच्या माध्यमातून तो अनेकांना मदत करत असतोच, पण वैयक्तिक स्तरावरही तो किती सहृदयी आणि दातृत्वशील आहे, हे या घटनेवरून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

## मार्चमध्ये 'ओटीटी'वर काय पाहाल?

मार्च महिना ओटीटी प्रेक्षकांसाठी मनोरंजनाची मोठी मेजवानी घेऊन येत आहे. आजपासून 'मेड इन कोरिया' हा तमिळ चित्रपट नेटफ्लिक्सवर उपलब्ध झाला आहे; तर अनिल कपूर यांची मुख्य भूमिका असलेला 'सुभेदार' हा चित्रपट ५ मार्चला ॲमेझॉन प्राईमवर प्रदर्शित होणार आहे. शिक्षक अलख पांडे यांच्या जीवनावर आधारित 'हॅलो बच्चों' ही मालिका आणि पंकज कपूर-डिंपल कपाडिया यांचा 'जब खुली किताब' हे दोन्ही प्रकल्प ६ मार्चला अनुक्रमे नेटफ्लिक्स आणि झी ५ वर प्रदर्शित होतील. याच दिवशी म्हणजेच ६ मार्चला कोरियन नाटक 'बॉयफ्रेंड ऑन डिमांड' आणि ॲक्शनने परिपूर्ण असलेला 'पीकी ब्लाइंडर्स: द इमॉर्टल मॅन' हे चित्रपट नेटफ्लिक्सवर पाहता येतील. स्टीव्ह कारेल यांची कॉमेडी मालिका 'रूस्टर' ९ मार्चला जिओ हॉटस्टारवर येईल, तर १९ मार्चला 'जॅझ सिटी' ही बंगाली थ्रिलर मालिका सोनी लिव्हवर दाखल होईल. महिन्याच्या शेवटी, म्हणजेच २५ मार्चला चार्ली कॉक्स यांची बहुप्रतीक्षित मालिका 'डेअरडेव्हिल: बॉर्न अगेन सीझन २' जिओ हॉटस्टारवर प्रदर्शित होणार आहे.

## 'स्प्लिट्सविला १६' मध्ये रुरु ठाकूरची वाईल्ड कार्ड एन्ट्री



लोकप्रिय डेटिंग रिॲलिटी शो 'एमटीव्ही स्प्लिट्सविला १६' सध्या त्याच्या रंजक वळणांमुळे चर्चेत आहे. ताज्या वृत्तानुसार, या शोमध्ये रुरु ठाकूर हिने वाईल्ड कार्ड स्पर्धक म्हणून प्रवेश केल्याचे संकेत मिळत आहेत. विशेष म्हणजे, शोचा सूत्रसंचालक करण कुंद्रा याने एका व्हायरल क्लिपमध्ये या वृत्ताला दुजोरा दिल्याचे बोलले जात असून, यामुळे चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.


रुरु ठाकूर यापूर्वी 'स्प्लिट्सविला १५' मध्ये दिसली होती आणि आता १६ व्या पर्वात तिच्या पुनरागमनाने शोमधील समीकरणे बदलण्याची शक्यता आहे. अलीकडेच रुरु आणि या पर्वातील स्पर्धक योगेश रावत यांचे काही व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाले होते, ज्यामुळे त्यांच्यातील मैत्री किंवा नात्याबद्दल चर्चा सुरू झाली होती. योगेशने यावर प्रतिक्रिया देताना प्रेक्षकांना संयम राखण्याचे आवाहन केले असून, आगामी भागांमध्ये सत्य समोर येईल असे सांगितले आहे. रुरु ठाकूरच्या एन्ट्रीमुळे योगेश आणि आकांक्षा चौधरी यांच्यातील नात्यावर काय परिणाम होतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

## चिमुकल्या ताराचे आईवरचे प्रेम

प्रसिद्ध टीव्ही अभिनेत्री माही विज हिने नुकताच तिच्या मुलीचा, ताराचा एक अत्यंत हृदयस्पर्शी प्रसंग चाहत्यांसोबत शेअर केला आहे. आई आणि मुलीच्या अतूट नात्याची साक्ष देणारी ही छोटीशी, पण गोड घटना सध्या समाजमाध्यमांवर चर्चेचा विषय ठरली आहे. माहीने सांगितले की, तिची मुलगी तारा एका वाढदिवसाच्या पार्टीसाठी गेली होती. तिथून परतल्यानंतर तिने माहीला एक सुखद धक्का दिला. ताराने त्या पार्टीत आपल्या हातावर आईच्या नावाचा एक तात्पुरता टॅटू काढून घेतला होता. आपल्या चिमुकल्या हातावर आईचे नाव अभिमानाने मिरवणाऱ्या ताराचा हा अंदाज पाहून माही भारावून गेली. मुलीने दिलेली ही प्रेमळ भेट माहीसाठी अत्यंत खास ठरली आहे. तारा आणि माही यांच्यातील बंध नेहमीच चाहत्यांचे लक्ष वेधून घेत असतात. मात्र या ताज्या प्रसंगामुळे त्यांच्यातील प्रेमाची एक वेगळीच बाजू समोर आली आहे. चाहत्यांनीही या माय-लेकीच्या जोडीवर प्रेमाचा वर्षाव केला असून, ताराच्या या निरागस कृतीचे सर्वत्र कौतुक होत आहे.



## 'एनधय्या सामी' गीताचे वेगळेपण काय?




नुकताच विवाहबंधनात अडकलेल्या विजय देवरकोंडा आणि रश्मिका मंदाना यांच्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. त्यांच्या आगामी 'रणबाली' या चित्रपटातील एनधय्या सामी हे विशेष गाणे प्रदर्शित करण्यात आले असून, यात विवाहाची संकल्पना गुंफण्यात आली आहे. या गाण्यामुळे चित्रपटाच्या भावनिक बाजूची झलक प्रेक्षकांना पाहायला मिळत आहे.

या गाण्याची सुरुवात पारंपारिक वधूच्या स्वागत विधींच्या दृश्यांनी होते, ज्यामुळे लग्नाच्या उत्सवाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यानंतर चित्रपटातील विजय देवरकोंडा आणि रश्मिका मंदाना यांच्यातील रोमँटिक क्षण पाहायला मिळतात. विशेष म्हणजे, या व्हिडिओमधील एका चौकटीत हॅपी मॅरिड लाईफ विजय आणि रश्मिका असा संदेश झळकला आहे. कलाकारांच्या खऱ्या आयुष्यातील लग्नाचे औचित्य साधून निर्मात्यांनी दिलेली ही मानवंदना सध्या चर्चेचा विषय ठरली आहे. राहुल सांकृत्यान यांच्या दिग्दर्शनाखाली साकारलेला हा चित्रपट ब्रिटिशकालीन भारताच्या पार्श्वभूमीवर आधारित असून, यात बंडखोरी आणि सूडाची कथा मांडण्यात आली आहे. विजय आणि रश्मिका यांची एकत्रित काम करण्याची ही तिसरी वेळ आहे. हा चित्रपट ११ सप्टेंबर २०२६ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. खऱ्या आयुष्यातील जोडीला पडद्यावर पाहण्यासाठी प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता आहे.


---

# हेल्दी Me


## हेल्दी टिप्स



कफ प्रकृतीच्या व्यक्तींनी शक्तिवर्धक रस म्हणून मोसंबीचा रस घ्यावा. ग्लासभर रसात दोन चमचे आल्याचा रस टाकून घ्यावा. यामुळे कफाचा प्रादुर्भाव होणार नाही.



सीताफळांच्या बियांची पूड रात्री झोपताना केसांना चोळून लावल्याने डोक्यातील कोंडा जातो. बियांच्या या पुडीमध्ये शिकेकाई घालून केस धुतल्यास केस स्वच्छ आणि चमकदार होतात.



मोसंबीची साल सावलीत वाळवून त्याची मडक्यात घालून राख करावी. उलटी होत असेल तर अर्धा चमचा राख मधातून उलटी थांबेपर्यंत एकेक तास अंतराने चाटावी.

## मोबिलिटी ट्रेनिंगच्या अंतरंगात...



बहुतांश लोक जिममध्ये जातात ते ताकद वाढवण्यासाठी. जास्त वजन उचलणे, वेगाने धावणे किंवा शरीर जास्त फिट दिसणे हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट असते. पण ताकद एकटी पुरेशी नसते. सक्रिय जिम-गोअर्सपैकी तब्बल साठ टक्के जणांना वारंवार सांधेदुखी जाणवते. कारण त्यांना मोबिलिटी आणि फ्लेक्सिबिलिटी ट्रेनिंगचे महत्त्व समजत नाही. योग्य मोबिलिटी विकसित केली तर लिफ्टिंग परफॉर्मन्स जवळपास २० टक्क्यांनी वाढू शकतो आणि दुखापतींचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होतो.

**मोबिलिटी ट्रेनिंग म्हणजे नेमके काय? :** शरीरातील सांध्यांची हालचाल मर्यादा वाढवणे हे मोबिलिटीचे मुख्य उद्दिष्ट असते. हालचालीत अडथळा, ताण किंवा कडकपणा कमी करून शरीर नैसर्गिकपणे हलू शकावे यासाठी हे प्रशिक्षण आवश्यक असते. हे केवळ स्ट्रेचिंग नसते. ताकद, नियंत्रण आणि लवचिकता यांचा एकत्रित समावेश यात असतो. साध्या भाषेत सांगायचे झाले तर शरीर जे नैसर्गिकपणे करू शकते. त्या हालचाली मुक्तपणे, वेदनाशिवाय आणि संकोचाशिवाय करता याव्यात हा यामागचा हेतू असतो.

**मोबिलिटी आणि फ्लेक्सिबिलिटी इतकी महत्त्वाची का?**

सर्वात मोठा फायदा म्हणजे दुखापत टाळणे. मजबूत सांधे आणि संतुलित स्नायू शरीराला चुकीच्या हालचालीपासून वाचवतात. मोबिलिटी वाढल्यावर शरीर अनावश्यकपणे एखाद्या भागावर भार टाकत नाही आणि दुखापत होण्याची शक्यता कमी होते. दुसरा फायदा म्हणजे परफॉर्मन्स सुधारतो. वर्कआऊटचा फायदा अधिक मिळतो.


**रिकव्हरी जलद :** मोबिलिटी एक्सरसाईजमुळे रक्तप्रवाह सुधारतो. स्नायू सैल होतात आणि शरीर व्यायामानंतर पटकन सावरते. याखेरीज दैनंदिन जीवनातील हालचाली सहज होतात. मुलांबरोबर खेळणे, जिना चढणे, ऑफिसमध्ये बसणे किंवा उठणे, हे सर्व हलके वाटते. योग्य मोबिलिटी असलेले शरीर वय वाढले तरी कार्यक्षम राहते.

**काय करावे?**

यामध्ये प्रत्येक वर्कआऊटपूर्वी डायनॅमिक वॉर्म-अप करून सांधे आणि स्नायू सक्रिय केले जातात. प्रशिक्षक सदस्यांना मोबिलिटी-केंद्रित ड्रिल्स शिकवतात आणि फ्लेक्सिबिलिटी ट्रेनिंगला महत्त्व देतात. प्रत्येक सत्राच्या शेवटी स्ट्रेचिंग किंवा फोम रोलिंग करून स्नायूंचा समतोल आणि लवचिकता टिकवली जाते. तसेच ॲपद्वारे पोषण, रिकव्हरी आणि मोबिलिटीची प्रगती ट्रॅक केली जाते.

एकूणात मोबिलिटी आणि फ्लेक्सिबिलिटी हे केवळ व्यायाम नाहीत. ते संयम, जागरूकता आणि संतुलन शिकवणारी सवय आहेत.

## चिंता मिलेनियल पिढीची



मिलेनियल पिढीत हृदयरोगाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे आणि आधीच्या पिढीपेक्षा कमी वयात हृदयविकाराचे झटके येत आहेत. भारतातील मोठ्या विमा कंपन्यांनी दिलेल्या आकडेवारीनुसार, ३५ वर्षांखालील लोकांमधील हृदयरोगाशी संबंधित विमा दाव्यांत अलिकडच्या वर्षांत ४० टक्क्यांची वाढ झाली आहे. डॉक्टरांच्या दैनंदिन अनुभवातही हेच दिसते. तिशीतील तरुण रुग्ण अँजिओप्लास्टी किंवा बायपास करण्याएवढ्या गंभीर स्थितीत रुग्णालयात दाखल होताना दिसतात, जे याआधी ५० किंवा ६० च्या वयोगटातील लोकांत जास्त दिसत होते.

**नेमके बदलले काय?**

मागील पिढ्यांनाही ताणतणाव होते, पण मिलेनियल पिढीत जीवनशैलीचे अनेक जोखीम घटक वाढले आहेत. कमी व्यायाम, वाढता स्थूलपणा, कामाचा आणि सामाजिक जगाचा ताण, आर्थिक दडपण, धूम्रपान व मद्यार्काचे वाढते प्रमाण, झोपेचे अपुरे तास आणि एकाकीपणाची भावना हे सर्व घटक हृदयाच्या आरोग्याला गंभीरपणे बाधक ठरतात. तंत्रज्ञानामुळे सुविधा वाढल्या, काम सोपे झाले, पण त्याचबरोबर शरीराची नैसर्गिक हालचाल कमी झाली आणि दिवसेंदिवस बसून राहण्याची सवय वाढली. अशी जीवनशैली शरीरात चरबी वाढवते आणि हृदयरोगाचा धोका आणखी तीव्र करते. ताण हा मनुष्याच्या जीवनाचा कायमस्वरूपी भाग आहे, पण आजच्या पिढीसाठी तो वेगवेगळ्या स्तरावर वाढला आहे. या सगळ्यातून बाहेर पडण्याचा मार्ग मोठे निर्णय घेण्यात नाही. लहान बदल सातत्याने केल्यास शरीर हळूहळू सुधारायला सुरुवात होते. दिवसभर व्यायामासाठी वेळ मिळत नसेल तर अधूनमधून जिना चढणे, चालत फोनवर बोलणे किंवा लहान अंतर पायी जाणे यासारख्या कृती उपयुक्त ठरतात. पावलांची संख्या मोजणारे गॅजेट वापरले तर चालण्याची सवय वाढते. मद्यार्क आणि सिगारेटचे सेवन हळूहळू कमी केल्याने शरीराचा ताण कमी होतो. आहारात सलाड, कमी मीठ, कमी साखर आणि कमी कॅलरीचे पदार्थ घेतल्याने पचन सुधारते आणि वजन नियंत्रित राहते. पण व्यस्त तरुणपिढी हे बदल अंगिकारेल?

## टेस्टिक्युलर कॅन्सरच्या अंतरंगात...



डेन्व्हर ब्रॉन्कोजचा लाईनबॅकर ॲलेक्स सिंगल्टन याला वयाच्या ३१ व्या वर्षी अंडकोषाचा कर्करोग म्हणजेच टेस्टिक्युलर कॅन्सर असल्याचे निदान झाले आणि त्याची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. एका चाचणीमध्ये त्याच्या शरीरात एचसीजी हार्मोनचे प्रमाण अनियमितरीत्या वाढलेले आढळले. या तपासणीनंतर त्याने डॉक्टरांना भेट दिली आणि त्याला अंडकोषात गाठ दिसत असल्याचे सांगण्यात आले. अल्ट्रासाऊंड केल्यानंतर कर्करोगाचे निदान निश्चित झाले. पुढील दिवशी त्याने सामना खेळल्यानंतर तात्काळ शस्त्रक्रिया करण्यात आली आणि गाठ काढून टाकण्यात आली. वेळेवर निदान झाल्यामुळे उपचार सहज आणि यशस्वी झाले. अंडकोषात होणारा कर्करोग म्हणजे टेस्टिसमध्ये सुरू होणारी कर्करोगीय वाढ. तो सामान्यतः १५ ते ४९ वयोगटातील पुरुषांमध्ये दिसतो. कर्करोगाचा प्रकार, त्याचा आकार आणि शरीरात किती पसरला आहे यावर त्याचे गांभीर्य अवलंबून असते. या कर्करोगावरील उपचारांमधील यशाचा दर ९० टक्क्यांपर्यंत असू शकतो, परंतु हे फक्त लवकर निदान झाल्यासच शक्य होते. त्यामुळे लक्षणे ओळखणे आणि नियमित तपासणी करणे खूप महत्त्वाचे आहे.

सामान्य लक्षणांमध्ये अंडकोषात गाठ जाणवणे, सूज दिसणे, वृषण मोठे होणे किंवा त्यात बोथट वेदना जाणवणे यांचा समावेश होतो. अंडकोशात जडपणा किंवा कडकपणा जाणवला तरी तेही सूचक लक्षण ठरू शकते. इतर लक्षणांत कंबरदुखी, पोटाच्या खालच्या भागात वेदना, अनपेक्षित वजन घटणे, खोकला, श्वास घेण्यास त्रास किंवा छातीत सूज दिसणे यांचा समावेश होऊ शकतो. ही लक्षणे दिसल्यास तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे अत्यंत आवश्यक असते. या आजाराचे निदान लवकर लावण्यासाठी स्व-तपासणी उपयुक्त ठरते. किशोरावस्थेनंतर नियमित तपासणी केल्याने शरीरातील बदल लगेच लक्षात येतात. अंडकोश हातात धरून बोटांनी हलक्या दाबाने फिरवून पाहावे. दोन्ही अंडकोषांमागे असलेली छोटी नरम नलिका (epididymis) सूजलेली किंवा दुखरी वाटू शकते. काहीही असामान्य बदल जाणवला तर विलंब न करता डॉक्टरांना भेटणे आवश्यक असते.

(डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतेही उपचार करू नयेत.)




## टाळूया पाणी पिण्यातील चुका



पाणी किती प्यायचे हे सर्वांना माहीत असते, पण पाणी कसे पिणे चुकीचे ठरू शकते हे मात्र फार कमी लोकांना समजते. पाणी पिण्याच्या काही सवयी आरोग्यास हानी पोहोचवू शकतात.

**ओठ फुटणे, डोळ्याखालील काळी वर्तुळे, त्वचा कोरडी होणे, केस तुटणे, पिंपल्स, वारंवार लघवी होणे किंवा जळजळ होणे अशा त्रासांमागे चुकीच्या पद्धतीने पाणी पिण्याचाही मोठा वाटा असू शकतो.**


**गटागट पाणी पिणे :** अनेक जण एकदम पाणी गिळतात किंवा बाटली तोंडापासून अंतरावर धरून पितात. अशा प्रकारे पाणी थेट घशातून पोटात जाते. पोटातील आम्लीय द्रवांवर अचानक येणाऱ्या जास्त प्रमाणातील पाण्याचा परिणाम होऊन वायू, फुगणे किंवा ॲसिडिटी वाढते. त्याउलट पाणी हळूहळू, छोट्या घोटांनी प्यायले असता ते सर्वप्रथम जिभेला स्पर्श करते. जिभेवरील क्षारीय लाळ पाण्यात मिसळून पोटातील आम्लीय वातावरणाशी संतुलन साधण्यास मदत करते. यामुळे पचन सुधारते आणि अनावश्यक त्रास कमी होतो.

**तापमान दुर्लक्षित करणे :** ऋतूनुसार पाणी कसे प्यावे हे महत्त्वाचे आहे. थंड पाणी उन्हाळ्यात ताजेतवाने वाटते, पण सतत फ्रिजमधील पाणी पिण्याने घसा बसणे, सर्दी, ॲलर्जी अशा समस्यांचा धोका वाढतो. काही संशोधनांनुसार थंड पाण्याने मायग्रेन वाढू शकतो किंवा नाकातील श्लेष्म साचण्याचा त्रास वाढतो. काही वैद्यकीय स्थितींमध्ये, थंड पाणी वेदना वाढवू शकते. दुसरीकडे, कोमट पाणी पचन सुधारते, कॅलरी बर्न करण्यास मदत करते आणि शरीराला आराम देते.

जेवणाच्या अगदी आधी किंवा जेवणानंतर लगेच पाणी पिणे या दोन्ही क्रिया चुकीच्या आहेत. असे केल्याने पचनक्रियेत अडथळा निर्माण होतो. पाण्यामुळे पोटामध्ये पचनासाठी आवश्यक एन्झाइम्स पातळ होतात, अन्न एकत्रित होण्याची प्रक्रिया मंदावते आणि त्यामुळे गॅस, फुगणे, जडपणा अशा समस्या उद्भवू शकतात. जेवणाच्या ३० मिनिटे आधी किंवा ३० मिनिटे नंतर पाणी घेणे योग्य मानले जाते.

**व्यायामानंतर पाणी पिणे :** व्यायामादरम्यान शरीरातील पाणी कमी होते आणि घसा कोरडा पडतो; पण व्यायामानंतर मोठ्या घोटांनी थंड किंवा जास्त पाणी पिणे धोकादायक ठरू शकते. श्वासोच्छ्वास वेगाने चालू असल्याने ठसका लागण्याची शक्यता वाढते. त्यामुळे व्यायामानंतर शरीर शांत झाल्यावर हळूहळू पाणी पिणे अधिक सुरक्षित असते.

# नवाकाळ शब्दकोडे-१५३५



## आडवे शब्द –

२. खतरनाक, अविश्वसनीय ५. स्वकीय ७. मृत्यू, निधन ११. कुशल १२. जागेपणी पाहिलेले स्वप्न १४. वस्ती, कॉलनी १६. घर, सदन १७. ज्ञानेश्वरांनी देवाला केलेली प्रार्थना १९. चिन्ह २०. टिप्पणी, मल्लीनाथी २१. जाजम, सतरंजी २२. ध्वनिवर्धक २३. न्याहारीतला स्वस्त व लोकप्रिय पदार्थ २४. सरपणविक्रीचे दुकान २६. क्षालन, मार्जन २७. अतिशय जड २८. लाकडी जिना ३१. पिठी साखरेचा प्रकार ३२. फणसाची एक जात ३३. विद्येची देवता ३४. आरमारातील लढाऊ जहाज ३७. प्रवास, यात्रा ३८. घरातील सर्व छोटीमोठी कामे ४०. हाताने केलेली कच्ची शिलाई ४२. निकस अन्न ४३. फोडणीतला मुख्य घटक ४४. अनावश्यक झालेले काढून टाकणे ४५. स्त्रीचे सौंदर्य ४७. प्रतिपक्षाचा मुद्दा खोडून काढणे ४८. जीभ, रसना ४९. राघू, पोपट ५०. बाळाच्या कपाळावर काजळाचा ठिपका ५१. छपराची उतरती बाजू; खिडकीची एक बाजू ५३. चांदण्या, नक्षत्रे ५४. पडदा ५५. अर्जुन ५६. प्रमाण देऊन सिद्ध केलेले ५८. पायांचा आवाज ६०. साधा ६१. ओष्ठ ६२. हत्यार, आयुध ६३. आर्थिक दुरवस्था ६४. मकर संक्रांतीचा हलवा ६६. विनय, संकोच ६८. दुधाचा एक पदार्थ ६९. साळुंकी ७०. साखरेचा उकळलेले पाणी ७२. टरफलासहित तांदूळ ७४. डोक्यावरील ओझ्याखालची कापडाची गुंडाळी ७६. उपकारांखाली दबलेला, लाचार ७८. सुंदर तरुणी ७९. ठेकेदार ८१. भांडण, वैर ८३. भक्षण ८४. खोल्यांची रांग, चाळ, छावणी ८६. अलमारी ८७. अगदी थोडे ८९. क्षमता ९०. रागाची तिडीक ९२. दंत ९३. बोटाच्या टोकाकडचा कठीण भाग ९५. दिवा ९७. रमलेला ९८. घडा, ज्योतिषातली एक रास ९९. चर्या १०२. पारंपरिक लग्नाच्या पंगतीतील गोड पदार्थ १०३. चोळीचा प्रकार १०४. तांबूल १०५. वांगी भाजून केलेली भाजी १०६. अकरावी तिथी १०७. आडाखा

## उभे शब्द –

१. उलगडा, आकलन २. कुस्तीचा एक डाव ३. पाटाच्या पाण्यावर नगदी पिके घेणारा ४. दळलेली हळद; पोपट ५. झोपेत असताना दिसणारे दृश्य ६. नवी पालवी, तारुण्याचा बहर ७. शरीर ८. मदतीचा हात ९. सामान्य १०. झुकवणे, आपल्या मनाप्रमाणे वागायला भाग पाडणे १२. सूर्य १३. ध्वनी १५. ओंडक्यांचा कामचलाऊ पूल १८. मलई १९. कूटप्रश्न, उखाणा, शब्दकोडे २१. पुनर्विवाहेच्छु विधुर २५. खोल दरी २६. धूप जाळण्याचे पात्र २९. कमतरता ३०. संतप्त ३२. काम, सत्कर्म ३३. ठाणवई ३४. जोडपे, युग्म ३५. आरमारातील सैनिक ३६. क्रिकेटमधील 'रन' ३७. दुसऱ्यावर अवलंबून ३८. ढग, मेघ ३९. देवळातील पहाटेची आरती ४०. युद्धभूमी ४१. झोका ४३. त्या वेळी ४६. कोरडा व रुक्ष प्रदेश ४८. सुगंधी तांदळाची एक जात ४९. पांढरा ५२. अमर्याद ५४. इतर ठिकाणी ५५. समर्थन, पुष्टी ५६. विज्ञान ५७. तलवारीचे म्यान ५९. फेरा, लांबचा रस्ता ६२. ओशाळलेला ६५. उसापासून तयार केला जातो ६७. पाच पेंढ्यांची जुडी ७१. दुबळा ७३. श्वान ७५. उत्कर्ष, चलती ७७. लहान प्राण्यांचे बीळ, भुयार ७९. हस्तभूषण ८०. चौकोनी भांडे ८१. फिरणे ८२. तोशीस ८३. एक चपळ प्राणी, चानी ८५. गाढव ८८. उग्र वास ८९. चरण्याची जागा ९१. कार्यालय ९२. पत्नी ९४. बोटीवरचा मुख्य सेवक ९६. हुलगे ९८. लहान पसरट भांडे १००. मारला गेलेला १११. पौर्णिमा

### नवाकाळ कोडे क्रमांक १५३४ चे उत्तर

**आडवे शब्द** : १. सदाशिव ५. जगरहाटी ८. बाहू १०. जपा १२. भाता १३. टकमक १६. मसलत १९. वीरगती २२. महान २३. मोसंबी २४. दशग्रीव २८. जवान २९. नल ३०. सह ३१. कवडी ३२. फलक ३४. तेजस्वी ३६. रमारमण ३८. कोट ३९. लगोलग ४१. खराटा ४२. साहस ४४. तराजू ४६. यूप ४८. पामर ५०. अनवरत ५३. जरब ५५. लाह्या ५६. परीक्षित ५७. व्यग्र ५८. मानस ६०. कलश ६२. घट ६३. कान ६४. गधडा ६५. झुंबड ६६. थरकाप ६८. लाजरा ६९. प्रबल ७१. कराटे ७२. रिघाव ७४. चौथरा ७५. कंथा ७६. टर ७८. मसूर ७९. प्रणव ८०. नाच ८१. उपवन ८२. संजय ८४. सविता ८७. नीला ८९. टीका ९१. पतन ९२. सट्टा ९३. सबब ९४. गवत ९६. घोडेस्वार ९७. नहर ९८. कोरड ९९. पणन १००. मंडल १०१. वधू १०२. बस १०३. तोकडा १०५. वंश १०६. साजरा १०८. लकब १०९. वन्य ११०. कवडसा १११. तार ११२. साईस

**उभे शब्द** : १. सभासद २. दाता ३. वट ४. ठाम ६. गवगवा ७. हार्द ८. बासन ९. हूल ११. पारंबी १४. कल्ला १५. कवी १६. महाल १७. तमोहर १८. सुग्रीव २०. रजक २१. तीनतेरा २२. मनस्वी २५. शकट २६. वडील २७. सफल ३०. समास ३३. लगत ३५. जटायू ३६. रहस्य ३७. मधुमक्षिका ३८. कोळी ४०. गोचर ४१. खजूर ४३. जीन ४५. राजस ४७. पलाश ४८. पारी ४९. रतनबाव ५०. अग्र ५१. वसुंधरा ५२. तमा ५४. बकबक ५६. पटका ५७. व्यथा ५९. नशीब ६१. लड ६२. घरटे ६४. गजरा ६६. थरार ६७. परिणय ६८. लाथ ६९. प्रथा ७०. लटपटीत ७१. कसूर ७३. घाव ७४. चौकस ७५. कंचनी ७७. रवका ७९. प्रजनन ८२. संत ८३. बट्टा ८५. विसर ८६. ताबडतोब ८८. लागण ९०. अडेल ९१. परवशता ९२. सरबराई ९५. वन ९६. घोडदौड ९८. कोमल ९९. पडाव १०४. झोक १०७. जसा

# शिया मुस्लीम भडकले! लाखोंचे रस्त्यावर उग्र आंदोलन



कराचीत अमेरिकेच्या दुतावासावर हल्ला

पान १ वरून

यांनी खामेनी यांच्या निधनानिमित्त तीन दिवसांचा शोक जाहीर केला. या काळात दुकाने व व्यावसायिक आस्थापने बंद ठेवण्याचे आवाहन करून नागरिकांना काळे झेंडे लावण्यास सांगितले. ऑल इंडिया शिया पर्सनल लॉ बोर्ड आणि शिया धर्मगुरू मौलाना यासुब अब्बास यांनीही या घटनेचा निषेध करत मोठ्या प्रमाणात शांततापूर्ण आंदोलन करीत इराणला जाहीर पाठिंबा दिला. तुर्कीएने इराणला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे अमेरिका आता तुर्कीएवर हल्ला करणार असल्याची चर्चा सुरू आहे. भारत आणि पाकिस्तानने मात्र अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.

इस्त्रायल-अमेरिका- इराण युद्धाच्या दुसऱ्या दिवशीही दोन्ही बाजूंकडून एकमेकांवर हल्ल्यांचे सत्र सुरू राहिले. इस्त्रायलच्या जेट विमानांनी २४ तासांत इराणवर २,००० बॉम्ब फेकले. याव्यतिरिक्त ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी हल्ले करण्यात आले. इस्त्रायलने इराणच्या तेहरानमधील अनेक सरकारी इमारतींना लक्ष्य केले आहे. या हल्ल्यात २०० हून अधिक इराणी नागरिक मृत्युमुखी पडले, तर ८०० हून अधिक जण जखमी झाले. आज तेहरानमध्ये ठिकठिकाणी धुराचे लोट आणि आगीचे लोळ पाहायला मिळत होते. इराणनेही प्रत्युत्तर म्हणून इस्त्रायलसह अमेरिकेचे तळ असलेल्या आखाती देशात हल्ले केले. इस्त्रायलची राजधानी तेल अवीववर हल्ला करण्यात आला. यात सर्वाधिक हल्ले दुबईवर करण्यात आले. इराणने दुबईवर १३७ क्षेपणास्त्र आणि २०९ ड्रोनने मारा केला. दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळालाही लक्ष्य करण्यात आले. विमानतळाच्या काही भागात आगही लागली. बुर्ज अल अरब हॉटेल आणि अमेरिकन नागरिक राहत असलेल्या इमारतीवरही हल्ला करण्यात आला. शारजा येथील एका शॉपिंग मॉलवर ड्रोन हल्ला करण्यात आला. कतारची राजधानी दोहामध्ये ११ वेळा सायरन वाजले. ओमान बंदर आणि बहारिनच्या दुकम बंदरावरही इराणने क्षेपणास्त्रे सोडली. सौदी अरेबियाची राजधानी रियाधमधूनही स्फोटांचे आवाज ऐकू आले. ओमानच्या किनाऱ्याजवळ एका तेल टँकरवर हल्ला करण्यात आला. स्काय लाईट नावाचा हा तेल टँकर मुसंदम किनाऱ्यापासून सुमारे १० किलोमीटर अंतरावर होता. त्याच्यावर पलामूचा झेंडा होता. या हल्ल्यात चार जण जखमी झाले. जहाजावरील २० जणांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले.

आज इराणने इस्त्रायल-अमेरिकेला धमकी दिली की, त्यांनी यापूर्वी कधीही पाहिला नसेल, असा हल्ला आम्ही करू. यानंतर अमेरिकेने अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी याला उत्तर देत म्हटले की, त्यांनी (इराणने) असे करू नये. कारण जर इराणने असे केले तर आम्ही त्यांच्यावर अतिशय शक्तिशाली हल्ला करू की, ज्याची इराणने कधीही कल्पना केली नसेल.



जम्मूमध्ये लोक रस्त्यावर उतरले.

करण्याचे आवाहन केले. खामेनी यांचे वडिलोपार्जित घर असलेल्या उत्तर प्रदेशातील किंतूर परिसरातही नागरिकांनी मजलिस व प्रार्थनासभांचे आयोजन केले होते. तर राजस्थानातील अजमेरच्या तारागड येथील शिया समुदायाचे नेते सय्यद आसिफ अली यांनी तीन दिवसांचा शोक जाहीर केला. त्यांनी समुदायातील लोकांना उत्सव टाळण्याचे आणि शोक पाळण्याचे आवाहन केले. दोराई दर्गा येथेही शोकसभा पार पडली.

इराणने आज ४० दिवसांचा दुखवटा जाहीर केला. अत्यंत तातडीने अयातोल्लाह अराफी यांनी नेता म्हणून निवडले आणि माघार न घेण्याचा निर्धार केला. आज चीनने परराष्ट्र मंत्री वांग यी यांनी या हल्ल्याबद्दल अमेरिका व इस्त्रायलचा जाहीर निषेध



इराणची राजधानी तेहरानमध्ये इस्त्रायल-अमेरिकेच्या हवाई हल्ल्यात सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या निधनाबद्दल लोकांनी रस्त्यावर उतरून जोरदार निदर्शने केली.

## अत्यंत सुरक्षित परिसरात सर्वोच्च नेते खामेनी यांची हत्या कशी झाली?

पान १ वरून

करण्यात आला. शनिवारी सकाळी तेहरानमधील एका प्रमुख सरकारी परिसरात वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक होणार असल्याची माहिती मिळाली. विशेष म्हणजे खामेनी स्वत: उपस्थित राहणार असल्याचे स्पष्ट झाले. ही माहिती तत्काळ इस्त्रायलला कळविण्यात आली. मूळ योजना रात्रीच्या अंधारात हल्ला करण्याची होती. मात्र, सर्व वरिष्ठ नेतृत्व एकाच परिसरात उपस्थित असणार असल्याचे समजताच वेळ बदलून शनिवारी सकाळी हल्ला करण्यात आला, जेणेकरून एकाच वेळी मोठे लक्ष्य साध्य करता येईल. अयातुल्ला अली खामेनी (सर्वोच्च नेते),मोहम्मद पाकपूर (आयआरजीसी कमांडर-इन-चीफ),अजीज नासिरजादेह (संरक्षण मंत्री),ॲडमिरल अली शमखानी (लष्करी परिषदेचे प्रमुख),सय्यद माजिद मौसावी (एयरोस्पेस फोर्स कमांडर),मोहम्मद शिराझी (उप गुप्तचर मंत्री) व इतर प्रमुख व्यक्तींची ही बैठक होती. या कारवाईत इराणच्या गुप्तचर यंत्रणेच्या वरिष्ठ नेतृत्वाला मोठा फटका बसला. ॲडमिरल शमखानी आणि मेजर जनरल पाकपूर हल्ल्यात ठार झाले.

इस्त्रायलमध्ये सकाळी सुमारे ६ वाजता लढाऊ विमानांनी उड्डाण केले. दोन तास पाच मिनिटांनंतर तेहरानच्या वेळेनुसार सकाळी ९.४० वाजता क्षेपणास्त्रांनी अत्यंत सुरक्षित अशा इराणच्या सरकारी परिसरात मारा सुरू केला . त्या परिसरातील एका इमारतीत वरिष्ठ सुरक्षा अधिकारी होते, तर खामेनी जवळच असलेल्या दुसऱ्या इमारतीत होते. हे ठिकाण निश्चित होताच क्षेपणास्त्र माऱ्यासह सुमारे ३० बॉम्बही टाकण्यात आले. मागील वर्षी झालेल्या १२ दिवसांच्या संघर्षादरम्यान खामेनेई आणि आयआरजीसी कशाप्रकारे संवाद साधतात, हालचाल करतात याचा अभ्यास अमेरिका करत होती. त्यातूनच त्यांच्या हालचालींचे अचूक अंदाज बांधणे शक्य झाले. इतक्या संवेदनशील काळात वरिष्ठ अधिकाऱ्यांचे एकाच ठिकाणी एकत्र येणे आणि खामेनी यांची त्याच परिसरात उपस्थिती ही गंभीर चूक ठरली.

## खामेनींच्या वडिलांचे आजोबा मूळचे उत्तर प्रदेशातील किंतूरचे

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

**लखनऊ -** इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनींची हत्या आणि पश्चिम आशियातील तणावाच्या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशातील बाराबंकी जिल्ह्यातील किंतूर हे छोटे गाव पुन्हा चर्चेत आले आहे. या गावाचा इराणच्या धर्माधारित राजवटीशी ऐतिहासिक संबंध आहे. अली खामेनींच्या वडिलांचे आजोबा सैयद अहमद मुसावी हे मूळचे भारतातील उत्तर प्रदेशातील बाराबंकी जिल्ह्यातील किंतूर या गावातील आहेत. हे गाव लखनौपासून सुमारे ५० किमी अंतरावर असून या युद्धाच्या पाश्वभूमीवर किंतूर या गावाकडे विशेष लक्ष वेधले जात आहे.

किंतूर हे शिया परंपरेतील विद्वत्तेचे केंद्र मानले जाते आणि ते आयातोल्ला रुहोल्ला मुसावी खोमेनी यांचे आजोबा सैयद अहमद मुसावी यांचे जन्मस्थान आहे. सैयद अहमद मुसावी यांचा जन्म सुमारे १८०० च्या सुमारास किंतूर येथे झाला. १८३० च्या दशकात त्यांनी भारतातून इराकमधील नजफ येथे स्थलांतर केले. नजफ हे शिया शिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र मानले जाते. त्यानंतर १८३४ मध्ये ते इराणमधील खोमेन शहरात स्थायिक झाले. त्यांनी आपल्या नावामध्ये हिंदी ही उपाधी कायम ठेवली. ती त्यांचे भारतीय मूळ असल्याची ओळख दर्शवते. इराणी नोंदींमध्येही ही बाब नमूद आहे. पुढे त्यांच्या कुटुंबाने इराणमध्ये धार्मिक आणि राजकीय पातळीवर मोठा प्रभाव निर्माण केला.

किंतूर आणि उत्तर प्रदेश १८ व्या शतकात पर्शियन व शिया विद्वानांचे केंद्र होते. इराण आणि भारतातील सांस्कृतिक व धार्मिक देवाणघेवाणीचे हे एक महत्त्वाचे उदाहरण मानले जाते. ही भारताशी जोडलेली ऐतिहासिक कडी १९७९ च्या इराणी क्रांतीच्या नेत्याशी संबंधित असल्याने आजही संशोधक आणि इतिहासप्रेमींसाठी अभ्यासाचा विषय आहे.

# नागपूरजवळ स्फोटक कारखान्यात स्फोट

पान १ वरून

इतर साहित्य तयार केले जाते. स्फोट झालेले डिटोनेटर हे नॉन - इलेक्ट्रिक प्रकारातील होते. या प्रकारात विद्युत प्रवाहाऐवजी धक्क्यामुळे (शॉक इफेक्ट) स्फोट होतो. आज सकाळी सुमारे ७ वाजताच्या सुमारास हे काम सुरू असताना कारखान्याच्या एका विभागात अचानक मोठा स्फोट झाला. त्या वेळी सुमारे ३२ कामगार आणि पर्यवेक्षक त्या ठिकाणी उपस्थित होते.

या अपघातानंतर पालकमंत्री बावनकुळे यांनी प्रशासनाकडून घटनेची माहिती घेत तातडीने मदत आणि बचावकार्य करण्याचे निर्देश दिले. या घटनेवर प्रतिक्रिया देताना काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार म्हणाले की, या भीषण स्फोटात १७ कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. जखमींना तातडीने उपचार मिळावेत आणि मृतांच्या कुटुंबियांना भरीव आर्थिक मदत द्यावी. कंपनीचे सुरक्षा ऑडिट नियमितपणे होते का आणि जबाबदारांवर कारवाई होणार का? महाराष्ट्र बारूद कामगार संघटनेचे उपाध्यक्ष पीयूष फिस्टे यांनीही या घटनेबद्दल दु:ख व्यक्त करत कारखान्यात मूलभूत सुविधा नसल्याचा आरोप केला. पीयूष फिस्टे म्हणाले की, घटनास्थळी रुग्णवाहिका उपलब्ध नव्हती आणि अग्निशमन दलाची गाडी वेळेत पोहोचली नाही, असेही त्यांनी सांगितले. काही कर्मचारी गेटजवळ असल्याने बाहेर पडू शकले, मात्र आत असलेले अनेक जण बाहेर पडू शकले नाहीत. येथे सुरक्षा व्यवस्थेचा गंभीर अभाव आहे.

फॉर्म जी
स्वारस्य अभिव्यक्तीकरिता निमंत्रण
**श्री सिद्धनाथ कॉटेक्स प्रायव्हेट लिमिटेड (सीआयआरपी अंतर्गत)**
क्रिष्णाकुंज येथे स्थित कताई कापसाच्या धाग्याच्या व्यवसायात कार्यरत
प्लॉट क्र.११, श्रीराज रेसिडेन्सी, राजश्रृंगार पार्टी प्लॉटच्या मागे, १५० फूट रिंग रोड, राजकोट, गुजरात - ३६०००५.
(इन्सॉल्व्हन्सी ॲण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तिंकरिता दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियम, २०१६ चे विनियम ३६ए चे उप-विनियम (१) अन्वये)

संबंधित तपशिल

| | | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव पॅन आणि सीआयएन/ एलएलपी क्रमांकासह | श्री सिद्धनाथ कॉटेक्स प्रायव्हेट लिमिटेड सीआयएन: U01405GJ2008PTC053324 पॅन: AALCS7584F |
| २ | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | कृष्णकुंज, प्लॉट क्र. ११, श्री राज रेसिडेन्सी, राजश्रृंगार पार्टी प्लॉटच्या मागे, १५० फूट रिंग रोड, राजकोट, गुजरात – ३६०००५. |
| ३. | वेबसाइटची युआरएल | |
| ४ | ज्या ठिकाणी बहुसंख्य स्थिर मालमत्ता आहेत त्या ठिकाणाचे तपशील | **फॅक्टरी प्रिमायसेस :** टेक्सटाईल मिल, जीजे एसएच ११९, रुपावती, चोटिला, गुजरात - ३६३५२० |
| ५ | मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता | ४९,२०० सिंगल स्पिंडल्ससह वार्षिक १४,४०० मेट्रिक टन स्थापित क्षमतेसह कापूस कातण्यासाठी १ युनिट. याव्यतिरिक्त, ३.० मेगावॅटची स्थापित पवनचक्की क्षमता. |
| ६ | मागील आर्थिक वर्षात विकल्या गेलेल्या मुख्य उत्पादनांचे/सेवांचे प्रमाण आणि मूल्य | २०२३-२०२४ च्या आर्थिक विवरणानुसार, कार्यचलनातून मिळणारा महसूल रु. ४,८६,५४,७९,३४२/- होता. |
| ७ | कर्मचारी/कामगारांची संख्या | निरंक |
| ८ | दोन वर्षांचे शेवटचे उपलब्ध आर्थिक विवरणपत्रे (अनुसूचीसह), धनकोंच्या याद्या, प्रक्रियेच्या त्यानंतरच्या घटनांसाठी संबंधित तारखा यासह अधिक तपशील येथे उपलब्ध आहेत: | संभाव्य निराकरण अर्जदारांना cirp.shreescotexlimited@gmail.com या ईमेलवर विनंती करून मेलद्वारे तपशील मागवता येतील. |
| ९ | संहितेच्या कलम २५(२)(एच) अंतर्गत रिझोल्यूशन अर्जदारांची पात्रता येथे उपलब्ध आहे: | संभाव्य निराकरण अर्जदारांना cirp.shreescotexlimited@gmail.com या ईमेलवर विनंती करून मेलद्वारे तपशील मागवता येतील. |
| १० | अभिव्यक्ती स्वारस्य प्राप्त करण्याची शेवटची तारीख | १७.०३.२०२६ |
| ११ | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी जारी करण्याची तारीख | २७.०३.२०२६ |
| १२ | तात्पुरत्या यादीवर हरकती सादर करण्याची शेवटची तारीख | ०१.०४.२०२६ |
| १३ | संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी जारी करण्याची तारीख | ११.०४.२०२६ |
| १४. | संभाव्य रिझोल्यूशन अर्जदारांना माहिती ज्ञापन, मूल्यांकन मॅट्रिक्स आणि रिझोल्यूशन प्लॅनची विनंती जारी करण्याची तारीख | १६.०४.२०२६ |
| १५. | ठराव योजना सादर करण्याची अंतिम तारीख | १६.०५.२०२६ |
| १६. | स्वारस्य अभिव्यक्ती सादर करण्यासाठी ईमेल आयडीची प्रक्रिया करा | cirp.shreescotexlimited@gmail.com |
| १७ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या एमएसएमई म्हणून नोंदणी स्थितीची माहिती. | नाही |

सही/-
अखिल आहुजा (प्राधिकृत प्रतिनिधी)
**मार्व्हेंट रिस्ट्रक्चरिंग सर्व्हिसेस एलएलपी**
रिझोल्यूशन प्रोफेशनल
आयबीबीआय नोंद. क्र.- IBBI/IPA-0154/IPA-3/2023-2024/50058
एएफए वैध क्र.- ३१.१२.२०२६
**दिनांक: ०२.०३.२०२६**
**ठिकाण: नवी दिल्ली**
**नोंदणीकृत आणि संपर्क पत्ता:** एस ब्लॉक, ३७६, पंचशील पार्क, नवी दिल्ली- ११००१७
**तसेच,**
मजला क्र.८, फ्लॅट क्र.८०३, चांडक कॉर्नरस्टोन, डेव्हिड एस बॅरेटो रोड, अपर वरळी, मुंबई, महाराष्ट्र - ४०००१८
संपर्क ईमेल आयडी- cirp.shreescotexlimited@gmail.com
नोंदणीकृत ईमेल आयडी: caakhilahuja@gmail.com
मोबाईल: +९१- ९९११३३१५९९

शुद्ध व नैसर्गिक
फोंडाघाट मध
ॲगमार्क
फोंडाघाट फार्मसी
मुंबई - १६. फोन : २४३० ८५४२

# नवाकाळ



नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
इराण-इस्रायलच्या युद्धात आपल्या खिशाला फटका?
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

## इराण... एक गूढ देश

*आजच्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर पुन्हा जाग्या झालेल्या आठवणी.*

**विशाल चव्हाण**

इराण, इस्त्रायल, अमेरिका या तणावपूर्ण परिस्थितीच्या बातम्या आज जगभरात झळकत आहेत. त्या ऐकताना नकळत माझ्या ईराण प्रवासाच्या काही थरारक, गूढ आणि विसरता न येणाऱ्या आठवणी पुन्हा जिवंत झाल्या. काही महिन्यांपूर्वी मी माशाद आणि तेहरान या शहरांमध्ये फिरत होतो आणि पहिल्याच दिवसापासून इराण मला एक वेगळ्याच दुनियेतला आणि काहीसा गूढ देश वाटू लागला. सुरुवात झाली माझ्या वसतीगृहापासून. इराणमध्ये एक गोष्ट खूप धक्कादायक वाटली. हॉटेल आणि हॉस्टेल ऑनलाईन शोधताच येत नाहीत. बुकिंग करता येत नाही. तुम्हाला स्वतः तिथे पोहोचूनच हॉटेल शोधावे लागते. माझा वसतिगृह मालक एक माजी लष्कर अधिकारी होता. त्याने इराणबद्दल आणि विशेषतः इराण-इस्त्रायल-अमेरिका संघर्षाबद्दल कॅमेऱ्यावर आणि बाहेर खूप काही सांगितलं. काही गोष्टी तर इतक्या संवेदनशील होत्या की, त्या ऐकताना अंगावर काटा आला

सीम कार्ड घेतल्यानंतर जे घडलं ते अजूनही आठवतं. ते मिळवण्यासाठी मला खूप शोधाशोध करावी लागली. शेवटी जेव्हा सीम मिळालं आणि मी वसतिगृहावर परत आलो तेव्हा मला एक गोष्ट दिसली ज्यामुळे मी थक्क झालो. माझ्या फोनमध्ये एक पर्शियन ॲप इन्स्टॉल झालं होतं. मी ते इन्स्टॉल केलं नव्हतं. जेव्हा मी मालकाला विचारलं तेव्हा त्याने शांतपणे सांगितलं हे इराणचं शासकीय नेटवर्क आहे आणि त्याशिवाय सीम card कामच करत नाही. मी क्षणभर थांबलो. कारण त्याचा अर्थ एकच होता... तुम्ही काय सर्च करता, कोणाशी बोलता काय पाहता हे सगळं नियंत्रित केलं जाऊ शकतं. त्या क्षणी विचित्र वाटलं... असं वाटत होत जणू कोणीतरी आपल्यावर सतत नजर ठेवून आहे

पण दुसरी बाजू ती पूर्णपणे वेगळी होती. इराण मधील लोक, खूप प्रेमळ, खूप स्वागत करणारे होते. मी भारतीय आहे कळल्यावर तर ते अजूनच आनंदी व्हायचे. त्यांचा




पाहुणचार आणि वर्तन खरंच प्रेमळ होतं.

आणि सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे विकास, इतक्या वर्षांपासून निर्बंध असून सुद्धा माशाद आणि तेहरान ही शहरं खूप प्रगत आणि विकसित वाटली. प्रचंड महामार्ग, आधुनिक दळणवळण, स्वच्छ शहर, आणि खास करून भुयारी मेट्रोचे जाळे.

एका सीमेवरील राष्ट्रामध्ये इतक्या उच्च दर्जाचा विकास पाहून मी थक्क झालो. खरे सांगायचं तर माझा इराणचा अनुभव खूपच खास होता. माहीत नाही भविष्यात पुन्हा इराणला जाण्याची संधी मिळेल की नाही, पण जर संधी मिळाली तर मी नक्कीच पुन्हा इराणला जाईन. आजच्या या युद्धाच्या पार्श्वभूमीवर हे सगळं पुन्हा आठवलं म्हणून वाटलं तुमच्यासोबत share करावं.

तुम्हाला काय वाटतं? इराण खरंच एक गुप्त राहणारा देश आहे का? की बाहेरून दिसतं त्यापेक्षा वेगळं आहे?

## बागराम एअरबेसवर पाकिस्तानी हल्ला
### अफगाणचा नकार

**काबूल** - आज पहाटे पाकिस्तानी लष्कराने अफगाणिस्तानच्या बागराम लष्करी विमानतळावर हवाई हल्ला केला. त्यात अफगाणिस्तानाचे २२१ सैनिक ठार झाले, असा दावा पाकिस्तानने केला. मात्र आम्ही हल्ल्याचा प्रयत्न हाणून पाडला. कोणतीही हानी झाली नाही, असा दावा अफगाणिस्तानने केला. पहाटे पाकिस्तानच्या विमानांनी बाग्राम एअरबेसवर कारवाई केली. त्यानंतर पोलिस मुख्यालयाने स्पष्ट केले की, बाग्रामच्या हवाई व संरक्षण दलांच्या कारवाई करत 'झिको वन' आणि 'टू माइल' संरक्षण प्रणालींचा वापर करून पाकिस्तानचा हल्ला निष्प्रभ केला.

## युद्धाच्या तणावामुळे सुरत-दुबई उड्डाण रद्द! हिरे व्यापारावर परिणाम

■ सुरत

**इराण** आणि अमेरिका-इस्त्रायल यांच्यातील युद्धामुळे पश्चिम आशियापलीकडे त्याचे परिणाम दिसू लागले आहेत. सुरक्षेच्या कारणास्तव एअर इंडिया एक्स्प्रेसने पुढील सध्या २४ तासांसाठी सुरत-दुबई उड्डाणे रद्द केली आहेत. त्यामुळे प्रवासी तर अडचणीत सापडले आहेतच, पण शहरातील हिरे उद्योगात चिंतेचे वातावरण पसरले आहे.

भारत डायमंड बोर्सचे उपाध्यक्ष मेहुल शाह यांनी म्हटले की, ही गंभीर अडचण आहे. इस्त्रायल, अमेरिका आणि इराण-इराक यांच्यातील वाढत्या तणावामुळे विमान कंपन्यांनी उड्डाणे रद्द केली आहेत. दुबई आणि मध्य पूर्वेतील उड्डाण सेवा बंद झाल्याने महत्त्वाच्या व्यावसायिक बैठका रद्द कराव्या लागल्या आहेत. व्यापाऱ्यांना अडकून पडावे लागले आहे. दुबईमध्ये हिरे व्यापारासाठी संरचित टेंडर पद्धती आहे. त्यात भेटी पूर्वनियोजित आणि वेळेच्या काटेकोर चौकटीत होतात. टेंडरची तारीख चुकल्यास कोट्यवधी रुपयांच्या व्यवहारांपासून वंचित राहावे लागू शकते. ज्यांचे आज किंवा उद्या टेंडर ठरले होते, त्यांची संधी हुकणार आहे. पुढील संधी कधी मिळेल हे सांगता येत नाही. या अडथळ्यामुळे व्यवहार ठप्प होऊ शकतात.

## दुबईत शहापूरचे २३ जण अडकले

**दुबई** - इराण, इस्त्रायल आणि अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या तणावपूर्ण युद्धस्थितीमुळे ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुका येथील २३ नागरिक दुबई येथे अडकले आहेत. अडकलेल्या नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात वयोवृद्धांचा समावेश आहे. हे २३ जण पर्यटनासाठी पर्यटन कंपन्यांमार्फत दुबईला गेले होते. त्यांचा परतीचा प्रवास २८ फेब्रुवारी रोजी रात्री १२.४५ वाजताच्या विमानाने होणार होता. मात्र युद्धजन्य परिस्थितीमुळे हे उड्डाण रद्द करण्यात आले. सध्या हे सर्व नागरिक दुबईतील ए-१ फहादी स्ट्रीटवरील ग्रँड ॲस्टोरिया हॉटेलमध्ये थांबले आहेत. त्यांच्याजवळील पैसे संपले असून

## दुबई-अबुधाबीत कोल्हापूरचे १०० हून अधिक नागरिक

**दुबई** - इराणने आपली हवाई हद्द बंद केल्यामुळे दुबई आणि अबुधाबी विमानतळांवर कोल्हापुरातील १०० हून अधिक नागरिक अडकून पडले आहेत. यामध्ये उच्च शिक्षणासाठी परदेशात जाणारे विद्यार्थी तसेच पर्यटकांचा समावेश आहे. कोल्हापूरमधील विश्व एज्युकेशन या संस्थेमार्फत जॉर्जिया येथील विद्यापीठात वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश घेतलेले सहा विद्यार्थी केअरटेकरसह सध्या दुबईत अडकले आहेत. हे विद्यार्थी दुबईहून पुढील विमानाने जॉर्जियाला जाणार होते. मात्र इराणची हवाई हद्द बंद झाल्यामुळे त्यांचे पुढील उड्डाण होऊ शकले नाही. संस्थेचे ज्ञानेश्वर भस्मे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या राहण्याची तसेच खाण्या-पिण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. पर्यायी मार्ग म्हणून पाकिस्तानमार्गे त्यांना जॉर्जियाला पाठविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. कोल्हापुरातील हेवन हॉलिडेज या ट्रॅव्हल एजन्सीचा ४४ जणांचा पर्यटकांचा गट दुबई-

## श्रीनगर व काश्मीर भागात निदर्शने! खामेनींच्या मृत्यूनंतर संताप

■ श्रीनगर

**इराणचे** सर्वोच्च नेते अली खामेनी यांच्या मृत्यूनंतर काश्मीर आणि श्रीनगर येथे शेकडो शिया मुस्लीम बांधवांनी रस्त्यावर उतरून निषेध आंदोलन केले. आंदोलकांनी खामेनेई यांचे फोटो, पोस्टर आणि इराणला पाठिंबा दर्शवणारे बॅनर हातात घेत निषेध नोंदवला. अमेरिका मुर्दाबाद आणि इस्त्रायल विरोधात घोषणाबाजी केली.

श्रीनगरमध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्यालयाबाहेर मोठे निदर्शन करण्यात आले. या निदर्शनादरम्यान आंदोलकांनी काळे झेंडे फडकवत पारंपरिक शोकगीतांचे पठण केले. परिस्थिती तणावपूर्ण होऊ नये यासाठी प्रशासनाने श्रीनगरमध्ये पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. मात्र सुरुवातीला हे आंदोलन शांततापूर्ण पद्धतीने पार पडल्याची माहिती



पोलिसांनी दिली. परंतु या आंदोलनाला दगडफेक झाल्याने हिंसक वळण लागले.

काश्मीरमधील शिया समुदायामध्ये खामेनेई यांना धार्मिक आणि राजकीय नेतृत्वाचे प्रतीक मानले जात होते. त्यांच्या मृत्यूमुळे संताप आणि शोकाची भावना व्यक्त केली जात आहे. समुदायातील नेत्यांनी हा हल्ला मुस्लीम जगतावरील आघात असल्याची प्रतिक्रिया देत न्यायाची मागणी केली. काश्मीरच्या लाल चौकात शेकडो शिया बांधवांनी अमेरिका आणि इस्त्रायलचा निषेध करीत आंदोलन केले.

## इराण-इस्त्रायल संघर्षामुळे पीव्ही सिंधू दुबईत अडकली

■ दुबई

**ऑलिम्पिक** पदक विजेती भारतीय बॅडमिंटनपटू पीव्ही सिंधू इराणवर झालेल्या हल्ल्यामुळे दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर अडकली आहे. ती ऑल इंग्लंड ओपन खेळण्यासाठी बर्मिंगहॅमला जात होती. दुबईतून तिचे कनेक्टिंग विमान होते. ते या हल्ल्यामुळे रद्द झाले.

सिंधूने सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर व्हिडिओ पोस्ट करून तिथली परिस्थिती सांगितली. त्यात ती म्हणते की, विमानतळावर मोठ्या संख्येने प्रवासी अडकले असून, तिथे भीतीचे वातावरण आहे. पुढील सूचनेपर्यंत सर्व उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. ऑल इंग्लंड ओपन ३ मार्चपासून सुरू होणार आहे. प्रवासात उशीर झाला, तर सिंधूच्या तयारीवर परिणाम होऊ शकतो, ज्याचा थेट तिच्या कामगिरीवर परिणाम होऊ शकतो. सिंधू दुबईतून कधी रवाना होऊ शकेल आणि स्पर्धा सुरू होण्यापूर्वी ती बर्मिंगहॅममध्ये पोहोचू शकेल की नाही याबाबत सध्या स्पष्टता नाही.

## इराणमध्ये मुलींच्या शाळेवर हल्ला! १४८ ठार

■ मिनाब

**दक्षिण** इराणमधील मिनाब शहरात मुलींच्या प्राथमिक शाळेवर झालेल्या भीषण बॉम्बहल्ल्यात मृतांची संख्या १४८ वर पोहोचली आहे. या हल्ल्यात सुमारे ९५ जण जखमी झाल्याची माहिती आहे. या घटनास्थळाचे व्हायरल व्हिडिओ अत्यंत हृदयद्रावक आहेत. यामध्ये परिसरात विद्यार्थिनींच्या बॅगा, पुस्तके आणि उद्ध्वस्त वर्गखोल्या दिसतात.

मिनाब येथील शजारे तैयबेह या मुलींच्या प्राथमिक शाळेवर अमेरिका-इस्त्रायलकडून हवाई हल्ला करण्यात आला. हल्ल्याच्या वेळी शाळेत मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या. स्फोटानंतर शाळेच्या दुमजली इमारतीचा मोठा भाग कोसळला तर उर्वरित भागाला आग लागली. बचाव पथकांनी ढिगाऱ्याखालून विद्यार्थिनींना बाहेर काढण्यासाठी अनेक तास मदतकार्य राबवले. या हल्ल्यात सुरुवातीला ८५ विद्यार्थिनींच्या मृत्यूची माहिती होती. मात्र जखमींपैकी अनेकांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याने मृतांचा आकडा १४८ पेक्षा जास्त झाला. इराण मिलिटरीकडून मिनाबमधील



मुलींच्या मृत्यूबद्दल इराणी राष्ट्राध्यक्षांचा संदेश पोस्ट करण्यात आला. त्यात राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी म्हटले की मिनाब प्राथमिक शाळेवरील हल्ल्याला शोकांतिका म्हटले.

## खामेनींच्या मृत्यूवरून राऊतांचा मोदी सरकारवर निशाणा

■ मुंबई

**इराण,** इस्त्रायल आणि अमेरिकेदरम्यान सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनी यांच्या मृत्यूनंतर जागतिक राजकारणात खळबळ उडाली. या घटनेवर उबाठा खासदार संजय राऊत यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. संजय राऊत म्हणाले की, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी नुकतेच इस्त्रायल दौऱ्यावरून परतले होते. अशा संवेदनशील काळात इराणमध्ये घडलेली ही घटना भारताच्या परराष्ट्र धोरणासाठी धक्का मानली जाते. इराण हा भारताचा जुना मित्रदेश आहे. संकटकाळात इराणने भारताला अनेकदा मदत केली. काश्मीर प्रश्नावरही इराणने भारताच्या भूमिकेला उघडपणे पाठिंबा दिला होता. भारताला स्वस्त दरात तेल पुरवठा करून दोन्ही देशांमध्ये मजबूत मैत्रीचे संबंध कायम ठेवले होते. संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारताने स्पष्ट आणि संतुलित भूमिका घेणे आवश्यक होते.

## दुबईत जोधपूरचे भाविक अडकले

**दुबई**- जोधपूर येथील सुमारे १२० भाविक दुबईमध्ये अडकले आहेत. हे सर्व भाविक दुबईतील राम मंदिरात दर्शनासाठी गेले होते. अचानक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यामुळे त्यांना परतता आले नाही. अडकलेल्या भाविकांचे वय साधारणतः ५५ ते ६० वर्षांच्या दरम्यान असून, सध्याच्या परिस्थितीत त्यांना दुबईतच थांबावे लागले आहे. या भाविकांनी केंद्र सरकारकडे तत्काळ मदत करण्याचे आवाहन केले आहे. आम्हाला अनपेक्षित अडचणींना सामोरे जावे लागत असून, सुरक्षित भारतात परतण्याची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी भाविकांनी केली आहे.

## बसच्या फ्लोरिंगचा पत्रा कोसळला! मुलीचा मृत्यू

■ अलीगढ

**उत्तर** प्रदेशातील अलीगढ-कासगंज मार्गावर काल घडलेल्या भीषण अपघातात माउंट इंटरनॅशनल स्कूलच्या बसमधील फ्लोरिंगचा पत्रा अचानक तुटल्याने यूकेजीमध्ये शिकणारी ८ वर्षांची विद्यार्थिनी अनन्या चालत्या बसमधून खाली पडली. त्यानंतर ती थेट बसच्या मागील चाकाखाली आल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. उत्तर प्रदेशातील अलीगढ-कासगंज मार्गावर काल माउंट इंटरनॅशनल स्कूलच्या बसमधील फ्लोरिंगचा पत्रा तुटल्याने अनन्या चालत्या बसमधून खाली पडली.

## ४ वर्षांच्या आयेशावर कुत्र्यांचा हल्ला चिमुकलीच्या अंगावर १०० जखमा

■ छत्रपती संभाजीनगर

**छत्रपती** संभाजीनगरमधील नारेगाव परिसरात चार भटक्या कुत्र्यांनी ४ वर्षांच्या आयेशा मुनावर शेख या चिमुकलीवर हल्ला केला. कुत्र्यांनी तिच्यावर झडप घालत अक्षरशः लचके तोडल्याने तिच्या शरीरावर हात, पाय, पाठ आणि डोक्यावर मिळून सुमारे १०० जखमा झाल्या आहेत. सध्या तिच्यावर घाटी रुग्णालय येथे उपचार सुरू आहेत.

मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्यात आयेशाच्या अंगावरील जवळपास प्रत्येक भागावर जखमा झाल्या. रक्तबंबाळ अवस्थेत ती आईच्या कुशीत कोसळली. परिसरातील नागरिकांनी धाव घेत तिला कुत्र्यांच्या तावडीतून सोडवले. त्यानंतर तातडीने तिला उपचारासाठी घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. जखमी मुलीला रुग्णालयात नेल्यानंतर काही वेळ टोलवाटोलवी झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. डॉक्टरांनी एका वॉर्डातून दुसऱ्या वॉर्डात जाण्यास सांगितल्यामुळे जवळपास दोन तास मुलीला घेऊन फिरावे लागल्याचे त्यांनी सांगितले. सुटी झाली असल्याचे सांगून घरी पाठवण्याचा प्रयत्न झाल्याचाही दावा कुटुंबीयांनी केला. या घटनेची माहिती मिळताच विरोधी पक्षनेते समीर बिल्डर, नगरसेवक काकासाहेब काकडे आणि मतीन पटेल यांनी मुलीच्या घरी भेट देऊन तिला तातडीने घाटीत दाखल करण्यात मदत केली. त्यांच्या हस्तक्षेपानंतर आयेशावर उपचार सुरू करण्यात आल्याचे सांगितले जाते. आयेशाची आई पतीपासून विभक्त असून, ती काही दिवसांपासून नारेगाव येथे वडिलांकडे राहते.

## व्यावसायिक सिलिंडरच्या किमतीत ३१ रुपयांची वाढ

■ नवी दिल्ली

**देशातील** तेल कंपन्यांनी महिन्याच्या पहिल्याच दिवशी १९ किलोच्या कमर्शियल एलपीजी सिलिंडरच्या किमतीत ३१ रुपयांची वाढ करण्यात आली असून, नवे दर आजपासून लागू झाले आहेत. त्यामुळे रेस्टॉरंट आणि इतर व्यावसायिक आस्थापनांच्या खर्चात वाढ होणार आहे.

घरगुती वापराच्या १४.२ किलो एलपीजी सिलिंडरच्या दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. दिल्ली येथे घरगुती सिलिंडरचा दर ८५३ रुपये इतकाच कायम राहणार असून, मुंबई येथे तो ८५२.५० रुपये कायम राहणार आहे.

## माळेगाव साखर कारखाना चेअरमनपदाची निवड पुढे

### सुनेत्रा पवारांची कारखान्याला भेट

■ बारामती

**बारामती** तालुक्यातील माळेगाव सहकारी साखर कारखान्याचे आज चेअरमन पदाची निवड होणार होती. मात्र निवडणूक निर्णय अधिकारी वैभव नावडकर आजारी असल्यामुळे ही निवड पुढे ढकलण्यात आली. या पदावर सुनेत्रा पवारांची नियुक्ती होणार असून, त्या 'ब' वर्ग गटातून बिनविरोध निवडून आल्या आहेत. याआधी अजित पवार'ब' वर्ग गटातून निवडून आले होते आणि त्यांच्या निधनामुळे चेअरमन पद रिक्त झाले होते.

सुनेत्रा पवार यांनी आज या साखर कारखान्याला भेट दिली. यावेळी त्या म्हणाल्या की, गेल्या काही वर्षांपासून दादांनी सकाळी कारखान्याचे एमडीला फोन करून कारखान्याची हालचाल पाहिली. मला कारखान्याबाबत सखोल माहिती नसली तरी माझी ओळख आणि अनुभव यामुळे काम



करताना अडचणी आल्या तरी सहकाऱ्यांच्या सहकार्यामुळे काहीही अशक्य होणार नाही. कारखाना कसा चांगला चालेल याकडे माझे लक्ष असेल आणि कुठल्याही प्रकारच्या ना आवडणाऱ्या गोष्टी घडणार नाहीत.

## भाजपा महिला पदाधिकाऱ्याच्या मुलीचे प्रभू श्रीरामांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य

■ बदलापूर

**बदलापुरातील** भाजपाच्या पूर्व मंडळ अध्यक्ष प्रतिभा जाधव यांची मुलगी मृणाल जाधवने प्रभू श्रीरामांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला. त्यानंतर मृणाल जाधववर बदलापूर पूर्व पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मृणाल जाधवने गाडी चालवताना तयार केलेल्या व्हिडिओमध्ये प्रभू श्रीराम यांच्याबद्दल अपमानकारक भाष्य केले होते. हा व्हिडिओ इन्स्टाग्रामवर पोस्ट केल्यानंतर तो वेगाने समाजमाध्यमांवर प्रसारित झाला. याची माहिती मिळताच हिंदुत्ववादी संघटनेसह विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी बदलापूर पूर्व पोलीस ठाण्यात धाव घेतली आणि गुन्हा दाखल करून मृणाल जाधवला अटक करण्याची मागणी केली. याबाबत बदलापूर पूर्व पोलीस उपायुक्त सचिन गोरे म्हणाले की, आक्षेपार्ह वक्तव्य प्रकरणी मृणाल जाधववर गुन्हा दाखल केला आहे. संबंधित व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित करू नये. जर कोणीतरी हा व्हिडिओ प्रसारित केला तर त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला जाईल.

## मुंबई-विजयदुर्ग रो-रो बोट सेवेला सुरुवात

■ मुंबई

**मुंबई** ते विजयदुर्ग दरम्यानची रो-रो बोटसेवा आजपासून सुरू झाली. या प्रकल्पाचे उद्घाटन बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते करण्यात आले.




या सेवेच्या माध्यमातून अवघ्या ६ ते ७ तासांत सागरी मार्गाने मुंबईहून विजयदुर्ग येथे पोहोचता येणार आहे. यावेळी नितेश राणे म्हणाले की, सागरी मार्गाने मुंबई ते विजयदुर्ग प्रवास आता जलदगतीने शक्य होणार आहे. या सेवेसाठी केंद्र व राज्य सरकारकडून आवश्यक परवानगी घेण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्यामुळे हा प्रकल्प सुरू करणे शक्य झाले. जनतेकडून चांगला प्रतिसाद मिळत असून, काही अडचणी आल्यास त्याबाबत मार्गदर्शन करावे. त्यानुसार सुधारणा करण्यात येतील. या सेवेच्या ६२५ तिकिटांपैकी शनिवारी रात्री साडेआठपर्यंत ४४६ तिकिटांची विक्री झाली होती. तिकीट विक्री रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

## बाल लैंगिक शोषण खटल्यात समझोता पीडितेला मॅकबुक लॅपटॉप देणार

■ मुंबई

**मुंबई** हायकोर्टाने अलीकडेच पोस्कोअंतर्गत नोंदवलेल्या प्रकरणातील खटल्यात समझोता झाल्यानंतर आरोपीने जमा केलेल्या दीड लाख रुपयांचा उपयोग अल्पवयीन पीडित मुलीच्या शिक्षणासाठी मॅकबूक खरेदी करण्यासाठी करावा, असा आदेश न्या. अश्विन भोबे यांनी दिला. आरोपपत्र रद्द करण्याच्या याचिकेला मंजुरी देत उच्च न्यायालयाच्या नोंदणी विभागाला संबंधित मुलीच्या शैक्षणिक गरजांनुसार तिच्याशी सल्लामसलत करून मॅकबुकची नवीनतम आवृत्ती खरेदी करण्याचे निर्देश दिले.

न्यायालयाने नमूद केले की, लॅपटॉप खरेदीनंतर शिल्लक राहिलेली रक्कम मुंबईतील उच्च न्यायालय कर्मचारी वैद्यकीय कल्याण निधीकडे वर्ग करावी. हा आदेश पुण्यातील ५२ वर्षीय रहिवाशाने दाखल केलेल्या याचिकेवर देण्यात आला. २०२३ मध्ये चतुःशृंगी पोलीस स्टेशन येथे पोस्को कायदा आणि भारतीय न्यायसंहिता अंतर्गत लैंगिक अत्याचार व छळाच्या आरोपांवरून आरोपपत्र नोंदवण्यात आले होते. सरकारी पक्षाने न्यायालयाला सांगितले की, पक्षकारांमध्ये झालेल्या तडजोडीच्या पार्श्वभूमीवर तसेच अल्पवयीन पीडिता आणि तिच्या पालकांनी दिलेल्या निवेदनांच्या आधारे पुढील कार्यवाही सुरू ठेवण्यात अर्थ नाही. मात्र खर्च आकारला जावा.